आपट्याची पाने, झेंडूची फुले,
घेऊनी आली विजयादशमी,
दसऱ्याच्या आज शुभ दिनी,
सुख समृद्धी लाभो
तुमच्या जीवनी !
विजयादशमीच्या
हार्दिक शुभेच्छा !

• पुणे, शनिवार, १२ ऑक्टोबर २०२४ • RASHTRA SANCHAR-Vol-3-issue 303 • वर्ष ३ रे, अंक ३०३ • किंमत ₹ ६ • पाने : १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com BEYOND THE NEWS






## तब्बल २२० प्रस्तावांना एकाच दिवसात मान्यता

# महापालिकेने रचला इतिहासच

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** विधानसभेची निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्यानंतर महापालिकेला लोकप्रिय निर्णय घेता येत नाहीत. तसेच नवीन कामांना मंजुरी देता येत नाही. सुरू असलेली कामे निधी अभावी बंद पडू नयेत. यासाठी निधी मंजूर करून काम करण्याचे आदेश काढण्यासाठी प्रशासनाची धावपळ उडालेली असते. यासाठी महापालिका प्रशासनाकडून गेल्या आठवड्यात झालेल्या स्थायी समितीच्या बैठकीत ९० कोटींच्या १६० प्रस्तावांना मंजुरी दिली होती. त्यानंतर सलग दुसऱ्या आठवड्यातही महापालिका प्रशासनाने स्थायी समितीची बैठक घेत अधिकाधिक प्रस्तावांना मान्यता देण्याचा झपाटा सुरूच ठेवला.

महापालिका आयुक्त डॉ.राजेंद्र भोसले यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी महापालिकेत स्थायी समितीची बैठक सुरू झाली. ही बैठक सुरू होईपर्यंत विविध कामांचे प्रस्ताव मान्यतेसाठी येत होते. या प्रस्तावामध्ये मलनिस्सारण देखभाल आणि दुरूस्ती, रस्ते, पाणी पुरवठा, समाविष्ट गावांमधील विविध प्रकारची विकास कामे यांचा समावेश होता. स्थायी समितीच्या कार्यपत्रिकेवर २२० हुन अधिक प्रस्ताव मंजुरीसाठी दाखल करण्यात आले होते. शहराच्यादृष्टीने महत्वाच्या असणाऱ्या विषयांना स्थायी समितीच्या बैठकीत आयत्यावेळी दाखल करून त्यांना मान्यता देण्यात येते. स्थायी समितीच्या कार्यपत्रिकेवर महत्वाचे विषय आणले, तर त्याची चर्चा होते. या चर्चेला बगल देण्यासाठी या आयत्यावेळीचा विषय, या नियमाचा चांगलाच फायदा घेण्यात आला. या व्यतिरिक्त स्थायी समितीला ऐनवेळी काही प्रस्ताव मंजुरीसाठी दाखल करण्यात आले. महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या स्थायी समितीच्या या बैठकीत एकूण ४०० कोटींच्या २२० हून अधिक प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली.



### युद्ध पातळीवर केले काम

- हरियाणा आणि जम्मु - काश्मिरच्या निवडणुकांचे निकाल लागल्यानंतर राज्यात विधानसभा निवडणुकीची घोषणाही कोणत्याही क्षणी जाहीर होण्याची शक्यता आहे. निवडणुकीमुळे लागणाऱ्या आचारसंहितेमध्ये शहरातील विकास कामांना तांत्रिकदृष्ट्या अडचण येऊ नये, यासाठी महापालिकेने युद्ध पातळीवर काम करून तब्बल २२० प्रस्तावांना एकाच दिवसांत मान्यता देऊन एक इतिहासच रचला आहे.

- विधानसभा निवडणुकीच्या आचारसंहिता येत्या तीन दिवसात लागण्याची शकता वर्तवली जात आहे.
- या पार्श्वभूमीवर महापालिकेने सुसाट वेगाने स्थायी समितीच्या बैठकीत ४०० कोटी रूपयांच्या २२० हून अधिक विविध कामांच्या प्रस्तावांना मंजुरी दिली आहे.
- एकाच दिवसात एवढ्या मोठे निर्णय महापालिकेने घेतल्याने पुणेकरांनी आश्चर्याचा धक्का बसला असून, चांगलीच चर्चा रंगली आहे.
- महापालिकेच्या स्थायी समितीने उद्यान, पथ, पाणी पुरवठा यांच्यासह इतर विभाग आणि समाविष्ट गावामधील विविध विकास कामांच्या प्रस्तावांना मंजुरी दिली आहे.

## पुणे शहर पोलिसांच्या गुन्हे शाखेला २५ लाखांचे पारितोषिक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे शहर पोलिसांच्या गुन्हे शाखेने अमली पदार्थ विरोधी कारवाईत बजावलेल्या विशेष कामगिरीबद्दल गृह विभागाकडून २५ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आले आहे. पुणे शहर पोलिस दलातील गुन्हे शाखेच्या पोलिस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी कुरकुंभ एमआयडीसी, विश्रांतवाडी, धानोरी, सांगली जिल्ह्यातील कुपवाड तसेच, बिहारमधील पटना, पश्चिम बंगाल आणि दिल्ली या ठिकाणी छापे मारून कोट्यवधी रुपयांचा मेफेड्रोन अमली पदार्थांचा साठा जप्त करण्यात आला होता.

पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली होती. गुन्हे शाखेने केलेल्या प्रभावी आणि उत्कृष्ट कामगिरीची गृह विभागाने नोंद घेत २५ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आले आहे.

» Selected

## दसऱ्याला श्री महालक्ष्मी देवीला सोन्याची साडी व रावणदहन कार्यक्रम

**पुणे :** श्री महालक्ष्मी मंदिर, श्री बन्सीलाल रामनाथ अग्रवाल धार्मिक व सांस्कृतिक ट्रस्टच्यावतीने आयोजित सार्वजनिक नवरात्र उत्सवात दसऱ्याच्या दिवशी आज शनिवारी (दि.१२) श्री महालक्ष्मी देवीला सोन्याची साडी परिधान करण्यात येणार आहे. सकाळपासून भाविकांना सोन्याची साडी परिधान केलेले देवीचे विलोभनीय रुप पाहण्याची व दर्शन घेण्याची संधी मिळणार आहे. तसेच रात्री ९.३० वाजता समाजातील महिला अत्याचाराच्या पार्श्वभूमीवर प्रतिकात्मक रावण दहन कार्यक्रम होणार आहे, अशी माहिती ट्रस्टच्या विश्वस्त व उत्सवप्रमुख डॉ. तृप्ती अग्रवाल यांनी दिली. आयोजनात ट्रस्टचे प्रमुख संस्थापक विश्वस्त राजकुमार अग्रवाल, अमिता अग्रवाल, ॲड. प्रताप परदेशी, भरत अग्रवाल, डॉ.तृप्ती अग्रवाल, प्रवीण चोरबेले, हेमंत अर्नाळकर, नारायण काबरा, निलेश लदद्ड आदींनी सक्रिय सहभाग घेतला.

## एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीतर्फे पद्मविभूषण रतन टाटा यांना श्रद्धांजली


**पुणे :** एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, पुणे व माईर्स एमआयटी शिक्षण संस्था समूह, पुणेतर्फे मानवतेचा अद्वितीय विनम्र सेवक व टाटा समूहाचे माजी अध्यक्ष पद्मविभूषण रतन टाटा यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. यावेळी एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा.डॉ.वश्वनाथ कराड, माईर्स एमआयटीचे संस्थापक विश्वस्त प्रा. प्रकाश बी. जोशी, डब्ल्यूपीयूचे कार्याध्यक्ष राहुल विश्वनाथ कराड, ज्येष्ठ पत्रकार अरूण खोरे, नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. एस. एन. पठाण, आचार्य प्रा. रतनलाल सोनग्रा, डब्ल्यूपीयूचे कुलगुरू डॉ. आर. एम.चिटणीस व कुलसचिव गणेश पोकळे उपस्थित होते.

## पालिकेकडून सहकार्याचे आवाहन

# तांत्रिक बिघाडामुळे जन्म-मृत्यू नोंदणी बंद

**पुणे :** जन्म-मृत्यू दाखले नोंदणीच्या तसेच दाखले वितरणासाठी असलेल्या संगणक यंत्रणेत सातत्याने तांत्रिक बिघाड होत आहेत. परिणामी, नागरिकांना विहीत वेळेत दाखले देण्यास अडचणी निर्माण होत असल्याने नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून करण्यात आले आहे. तसेच, केंद्रशासनाच्या प्रणालीनुसार हे काम सुरू असून त्याबाबत संबधित विभागाकडे तक्रार करण्यात आल्याचा खुलासाही प्रशासनाने केला आहे. जन्म मृत्यू नोंदणी कार्यालयामार्फत जन्म मृत्यू नोंदणीचे कामकाज हे मार्च २०१९ पासून केंद्र शासनाने विकसित केलेल्या सीआरएस नागरी नोंदणी पद्धतीने १५ क्षेत्रिय कार्यालय स्तरावर उपनिबंधक तथा क्षेत्रिय वैद्यकीय अधिकारी यांच्यामार्फत करण्यात येते. केंद्र शासनाने या नोंदणी पध्दतीत जून २०२४ पासून बदल केले आहेत. जन्म मृत्यूचे दाखले हे केवळ संबंधित क्षेत्रिय कार्यालयाकडील उपनिबंधक तथा क्षेत्रिय वैद्यकीय अधिकारी यांच्या कार्यालयाकडूनच वितरीत करण्यात येतात.

ही प्रणाली संपूर्ण देशासाठी एकच आहे. सदर संगणक प्रणाली बंद पडणे, मंद गतीने चालणे व इतर तांत्रिक अडचणीमुळे जन्म-मृत्यूचे दाखले संगणकीकृत करणे सद्यस्थितीत विलंब होत आहे.



### पालिकेकडून खुलासा

- महापालिकेकडे मोठया प्रमाणात तक्रारी वाढल्याने याबाबत जिल्हा निबंधक उपमुख्य निबंधक महाराष्ट्र राज्य, तसेच केंद्र शासन नागरी नोंदणी पद्धतीत यांचेकडे महापालिकेने तक्रारही केली आहे. मात्र, त्यानंतरही अद्याप या प्रणालीत सुधारणा झालेली नाही परिणामी दाखले मिळण्यास उशीर होत असल्याचे महापालिकेकडून सांगण्यात येत आहे.

## सनसिटी ते कर्वेनगरला जोडणारा नदीवरील उड्डाणपूल पाण्याखाली जाण्याची भीती

# महापालिकेकडून पुन्हा चुकीचा पूल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पालिकेने सिंहगड रस्त्यावरील पूलाची उंची कमी केल्याने सनसिटीच्या बाजूचा पूल खाली असणार आहे. या भागात नदीकडेला मोठ्या प्रमाणात राडारोडा टाकला असल्याने चढ दिसत असला तरी प्रत्यक्षात पुलाचा रॅम्प खालील बाजूस असणार आहे. परिणामी, पावसाळ्यात ४० ते ४५ हजार क्यूसेक पाणी सोडले गेल्यास पुलाची सनसिटीची बाजू पाण्याखाली जाणार आहे, त्यापेक्षा जादा पाणी सोडल्यास पूल बंद ठेवण्याची वेळ उद्भवणार आहे.

पालिकेकडून सिंहगड रस्त्यावरील वाहतूक कोंडी फोडण्यासाठी सनसिटी ते कर्वेनगरला जोडणारा नदीवरील उड्डाणपूल बांधला जात आहे. एकता नगरीला आलेल्या पूराच्या वेळी या पूलाच्या गर्डरपर्यंत पाणी आले होते. त्यावेळी केवळ ३५ हजार क्यूसेक पाणी सोडण्यात आले होते.त्यामुळे त्या पेक्षा अधिक पाणी सोडल्यास हा पूल पाण्याखाली जाण्याची भिती व्यक्त केली जात आहे. या पुलाचे काम प्रगतीपथावर असून पुढील वर्षभरात तो तयार होईल.

महापालिकेचा हा पूल कर्वेनगरच्या बाजूला दुधाने लॉन्सजवळ शिवणे ते खराडी रस्त्याला जोडला जातो. कर्वेनगरच्या बाजूला जिथे पूल संपतो तेथून मुख्य रस्त्याकडे जोडताना केवळ ५० मीटर अंतर असल्याने पुलाची उंची कमी करावी लागत असल्याचे प्रशासनाचे मत आहे.त्याच वेळी दुसऱ्या बाजूला मात्र सनसिटीकडे रॅम्प करण्यासाठी सुमारे १५० मीटर अंतर जागा आहे. त्यामुळे, प्रशासनाने दोन्ही बाजू समान ठेवण्यासाठी पूलाची उंची कमी केली आहे. #रा

### तांत्रिक कारणासाठी पुलाची उंची कमी केली ?

- सनसिटीच्या बाजूला दोन मोठ्या बांधकाम व्यावसायिकांच्या स्कीम सुरू आहेत. या स्कीमला आधी या पुलाचा रस्ता देण्यात आलेला नव्हता मात्र, आता उंची कमी केल्याने या दोन्ही मोठ्या साईटचे प्रवेशद्वार या पुलाच्या रस्त्याच्या बाजूलाच असणार आहे. या आधीच्या रचनेत या पुलाच्या रॅम्पमुळे या दोन्ही व्यावसायिकांची जागा रस्त्याच्या बाजूला सेवा रस्त्यासाठी घेण्याचे नियोजन होते. मात्र आता पुलाची उंचीच कमी झाल्याने त्यांना रस्ता सोडावा लागणार नाही. तसेच त्यांच्या साइटसाठी थेट कर्वेनगरला जोडणारा रस्ता उपलब्ध होणार आहे. त्यामुळे, खरचं तांत्रिक कारणासाठी पुलाची उंची कमी केली का, आणखी कोणासाठी असा सवाल उपस्थित केला जात आहे.



• पुणे, शनिवार, १२ ऑक्टोबर २०२४ • RASHTRA SANCHAR-Vol-3-issue 303 • वर्ष ३ रे, अंक ३०३ • किंमत ₹ ६ • पाने : १२



# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com BEYOND THE NEWS

## नोएल टाटा बनले टाटा ट्रस्टचे नवे अध्यक्ष



**नवी दिल्ली :** नोएल टाटा यांना टाटा ट्रस्टचे नवे अध्यक्ष बनवण्यात आले आहे. दिवंगत रतन टाटा यांच्या निधनानंतर ही जबाबदारी नोएल टाटा यांच्याकडे सोपवण्यात आली आहे. रतन टाटा यांच्याकडे 1991 मध्ये टाटा समूहाची जबाबदारी सोपवण्यात आली तेव्हा ते टाटा ट्रस्टच्या अध्यक्षपदावर विराजमान होते. पण आता टाटा ट्रस्टने एकमताने ही कमान नोएल टाटा यांच्याकडे सोपवली आहे. नोएल टाटा हे रतन टाटा यांचे सावत्र भाऊ असून ते गेल्या ४० वर्षांपासून टाटा समूहाशी संबंधित आहेत.

टाटा ट्रस्टच्या कामकाजात नोएल टाटा यांनी अतिशय सक्रिय भूमिका बजावली आहे. सध्या ते टाटा ट्रस्ट अंतर्गत येणाऱ्या सर रतन टाटा ट्रस्ट आणि सर दोराबजी टाटा ट्रस्टचे विश्वस्त आहेत. हा ट्रस्ट केवळ टाटा समूहाच्या परोपकारी उपक्रमांचे व्यवस्थापन करत नाही, तर टाटा समूहाची मूळ कंपनी असलेल्या टाटा सन्समध्येही टाटा ट्रस्टचा 66 टक्के हिस्सा आहे.

नोएल टाटा हे टाटा समूहाच्या अनेक कंपन्यांच्या संचालक मंडळावर आहेत. ते टाटा समूहाच्या रिटेल कंपनी ट्रेंट, टाटा इंटरनॅशनल लिमिटेड, टाटा इन्व्हेस्टमेंट कॉर्पोरेशनचे अध्यक्ष आणि टाटा स्टील आणि टायटनचे उपाध्यक्ष देखील आहेत.

# पुन्हा हिट अ‍ॅण्ड रन

## डिलिव्हरी बॉय ठार; तीन जखमी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुण्यात हीट अँड रनच्या घटना थांबण्याचे नाव घेत नाही आहे. मे महिन्यात एका मद्यधुंद बिल्डर पुत्राने अलिशाल पोर्शेने दोघांना चिरडले होते. या घटनेनंतर पुन्हा गुरुवारी रात्री एका आलीशान मोटारीने कोरेगाव पार्क येथील गूगल बिल्डिंगसमोर दोन दुचाकींना धडक दिली असून यात एका डिलिव्हरी बॉयचा मृत्यू झाला आहे. तर तिघे जखमी झाले आहे. घटनेनंतर आरोपी हा फरार झाला असून पोलिसांनी त्याच्या घरी जाऊन त्याला करसह अटक केली आहे. ही घटना रात्री १ ते १.३० च्या सुमारास घडली.



रौफ अकबर शेख असे या घटनेत मृत्युमुखी पडलेल्या तरुणांचे नाव आहे. तर आयुष प्रदीप तयाल (वय ३४, रा. हडपसर) असे आरोपी कार चालकाचे नाव आहे. त्याला पोलिसांनी त्याच्या घरून अटक केली आहे. गुरुवारी मध्यरात्री १.३० च्या सुमारास एबीसी रोडकडून ताडी गुता चौकाकडे जाणाऱ्या रस्त्यावर एका भरधाव वेगात असलेल्या आलीशान मोटारीने एका एक्टिवावरील तिघांना धडक दिली. या गाडीवरील तिघे जण जखमी झाले. यानंतर मोटारीने समोर एक्सेस गाडीवरून जाणाऱ्या दुचाकीला पाठीमागून जोरात धडक दिली. या गाडीवर फूड डिलिव्हरी बॉय रौफ अकबर शेख जात होता. या अपघातात तो गंभीर जखमी झाला. त्याला तातडीने नोबल हॉस्पिटल येथे उपचारांसाठी भरती करण्यात आले. मात्र, त्याचा मृत्यू झाला होता.

कोरेगाव पार्क येथे गूगल बिल्डिंग समोर कारच्या धडकेत मृत्यू झालेला रौफ अकबर शेख (वय २१) हा स्विगी डिलीवरीचे काम करायचा. त्याचं शिक्षण ६ वी झालं असून घरची परिस्थिती गरिबीची आहे. वडिल काम करून म्हशी सांभाळतात. त्यांच्या मुलाच्या मृत्यूमुळे त्यांचा आधार हरपला आहे. या अपघातात आलिशान कारच्या चालकाने २ दुचाकींना धडक दिली. पहिल्या धडकेत दुचाकीवरील तिघे थोडक्यात बचावले.

### गूगल बिल्डिंग समोर घडली घटना

● पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार कारचालक हा दारुच्या नशेत असल्याची प्रथमिक माहिती आहे. आरोपी हा कोरेगाव पार्क परिसरातील गुगल बिल्डींग समोर त्याची कार भरधाव वेगात चालवत होता. अपघात झाल्यावर त्याने घटनास्थळी न थांबता फरार झाला. पोलिसांनी या परिसरातील सीसीटिव्ही तपासून कारचा माग काढला. तसेच कारच्या नंबरवरून त्याचा मोबाइल नंबर आणि पत्ता मिळवून त्याला त्याच्या हडपसर येथील घरातून अटक करण्यात आली आली आहे. पोलिसांनी कार देखील ताब्यात घेतली आहे. या घटनेमुळे स्थानिक नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे. तसेच कोरेगाव पार्क येथील पब आणि हॉटेल बार बंद करण्याची मागणी केली आहे.

### उद्या अंकास सुट्टी!

शनिवार, दि. १२ ऑक्टोंबर २०२४ रोजी दसरा (विजया दशमी)निमित्त
राष्ट्र संचार कार्यालयास सुटी असल्याने रविवार, दि. १३ ऑक्टोंबर २०२४ रोजी अंक प्रसिद्ध होणार नाही,याची वाचक, विक्रेते, जाहिरातदार व हितचिंतकांनी नोंद घ्यावी.
**- वितरण व्यवस्थापक**
राष्ट्र संचार, पुणे

## आम्ही प्रस्थापितांना धडा शिकवू- छत्रपती संभाजीराजे



### परिवर्तन महाशक्तीची केली घोषणा

**पुणे:** राजकारणाची सध्याच्या नेत्यांनी बजबजपुरी केली आहे. कोण कुठे होता आणि कुठे असेल, काहीच सांगता येत नाही. राजकारणातील हा गोंधळ दूर करण्यासाठी स्वराज्य पक्षाची निर्मिती आहे. येणाऱ्या विधानसभेत आम्ही परिवर्तन महाशक्ती तयार करून प्रस्थापितांना धडा शिकवू, असा निर्धार छत्रपती संभाजी राजे यांनी कार्यकर्त्यांबरोबर व्यक्त केला.

स्वराज्य पक्ष स्थापनेची घोषणा संभाजी राजे यांनी केली. बालगंधर्व रंगमंदिरात झालेल्या या कार्यक्रमाला राज्य सरचिटणीस धनंजय जाधव यांच्यासह राज्यातील विविध शहरांमधून पदाधिकारी उपस्थित होते. भगव्या टोप्या घातलेल्या कार्यकर्त्यांनी सभागृह भरले होते. मिरवणुकीने आलेल्या संभाजी राजे यांचे जोरदार स्वागत करण्यात आले.

प्रस्थापित राजकारण्यांवर टीका करताना संभाजी राजे यांनी शरद पवार यांच्यापासून ते देवेंद्र फडणवीस यांच्यापर्यंत कोणालाही सोडले नाही. शरद पवार देशाचे नेते होते. परदेशी हातांखाली काम करणार नाही म्हणत काँग्रेसपासून बाजूला झाले, पुन्हा त्यांच्याबरोबर गेले. अजित पवार उठता-बसता शाहू-फुले-आंबेडकरांचे नाव घेतात आणि भाजपबरोबर जातात. भाजपतील मोदींसह सगळे अजित पवारांवर सर्वात मोठा भ्रष्टाचारी म्हणून टीका करतात व त्यांनाच बरोबर घेतात. एकनाथ शिंदे उद्धव ठाकरेंना ते अजित पवारांबरोबर


» पान ६ वर

### » ऐतिहासिक महाकन्यका पूजन



नवरात्रीनिमित्त आजच्या दिवशी कुमारिका पूजन असते . त्यानिमित्ताने कोथरूडमध्ये तब्बल सात हजार कन्यांचे पूजन करण्याचा ऐतिहासिक सोहळा पार पडला. कोथरूडमध्ये प्रथमच हा समारंभ झाला . ना. चंद्रकांत पाटील यांच्या संकल्पनेतून हा भव्य दिव्य कार्यक्रम पार पडला. ( सविस्तर वृत्त पान ४ वर )

## निहॉन हिदानक्यो 'या' जपानी संस्थेला शांततेचा नोबेल पुरस्कार जाहीर



**नवी दिल्ली:** गेल्या काही दिवसांपासून नोबेल पुरस्कारांची घोषणा करण्यात येत आहे. आतापर्यंत भौतिकशास्त्र, साहित्य आणि वैद्यकीय क्षेत्रातील नोबेल पुरस्काराची घोषणा करण्यात आली आहे. अशात आज शांततेचा नोबेल पुरस्कारही जाहीर झाला आहे. एका जपानी संस्थेला हा पुरस्कार देण्यात येत असल्याचे नोबेल पुरस्कार समितीकडून सांगण्यात आले आहे.

» पान ६ वर

## लाडकी बहिण योजनेच्या अर्जाला दिली मुदत वाढ


**मुंबई :** : राज्यातील महायुती सरकारची महत्वाकांक्षी योजना असलेल्या मुख्यंमत्री लाडकी बहीण योजनेचा अद्यापपर्यंत राज्यातील कोट्यवधी महिलांनी लाभ घेतला आहे. पण अद्यापही जर तुम्ही या योजनाच्या लाभापासून वंचित राहिला असाल? तर तुमच्यासाठी आणखी एक संधी सरकारने उपलब्ध करुन दिली आहे. लाडकी बहीण योजनेसाठी अर्ज करण्याची मुदत पुन्हा वाढवण्यात आली आहे. राज्य शासनाच्या निर्णयानुसार आता लाडकी बहीण योजनेला मुदत वाढ देण्यात आली असून १५ ऑक्टोबरपर्यंत रात्री १२ वाजेपर्यंत पात्र महिलांना या योजनेच्या लाभासाठी अर्ज करता येणार आहेत. या योजनेंतर्गत महिन्याला १५०० रुपये शासनाकडून थेट बँकेत जमा केले जातात. या टप्प्यात जे नव्यानं अर्ज सादर करणार आहेत. त्यांनी फक्त अंगणवाडी सेविकामार्फतच अर्ज भरावेत अशी सूचना राज्य शासनाकडून करण्यात आली आहे. यापूर्वी हे अर्ज नारीशक्ती दूत नावाच्या मोबाईल अ‍ॅपद्वारे भरले जात होते. आत्तापर्यंत या अ‍ॅपच्या माध्यमातून सुमारे ८ लाखांहून अधिक अर्ज सादर करण्यात आले आहेत.

## बोपदेव घाट प्रकरण; संशयितांना अटक

राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुण्यात गेल्या आठवड्यातील गुरुवारी बोपदेव घाटात टेबल पॉइंट येथे मित्रा सोबत फिरायला गेलेल्या तरुणीवर तिघांनी कोयत्याचा धाक दाखवून व मित्राला जीवे मारण्याची धमकी देऊन आळीपाळीने बलात्कार केला होता. या घटनेमुळे पुण्यासह संपूर्ण राज्य हादरले होते. गेल्या सात दिवसांपासून पोलिस आरोपींचा शोध घेत होते. अखेर तरुणीवर अत्याचार करणाऱ्या आरोपींच्या मुसक्या पुणे पोलिसांनी आवळल्या आहेत. या प्रकरणी दोघांना नागपूर येथून तर एकाला पुण्यातून अटक करण्यात आली आहे. पुण्यात गेल्या गुरुवारी (दि ३) एक तरुणी ही तिच्या मित्रा सोबत बोपदेव घाटातील टेबल पॉइंट येथे रात्री ११ च्या सुमारास फिरण्यासाठी गेले होते. यावेळी येथे फिरत असतांना तिघांनी या दोघांना कोयत्याचा आणि चाकूचा धाक दाखवत त्यांच्या जवळील मौल्यवान वस्तु काढून घेत तरुणाला बांधून मारहाण केली होती. यानंतर तरुणीला तिच्या मित्राला जीव मारण्याची धमकी देत त्यांनी तिच्यावर बलात्कार केला होता.

» पान ६ वर



# अनमोल 'रतन'!

जगात अनेक नामवंत व गर्भश्रीमंत उद्योगपती आहेत. सामान्यांच्या मनात त्यांच्याबद्दल कुतुहलही भरपूर असते. त्यांची संपत्ती, जीवनशैली वगैरे बाबतचे किस्से जनसामान्यांना चवदार वाटतात. मात्र, हे उद्योगपती आपले आहेत, अशी आपुलकीची व आपलेपणाची भावना जनसामान्यांच्या मनात अभावानेच पहायला मिळते. त्यामुळे त्यांच्या असण्या-नसण्याने सामान्यांवर फारसा फरक पडत नाही. मात्र, उद्योगरत्न रतन टाटा यांच्या निधनाने अवघा देश ज्या शोकसागरात बुडाला, जी हळहळ व्यक्त झाली त्यावरूनच त्यांचे वेगळेपण लक्षात यावे! रतन टाटा यांच्या निधनाची बातमी धडकताच देशातील नव्हे तर जगभरातील सामान्यातील सामान्य व्यक्तीच्या मनातही आपल्याच घरातील आपली व्यक्ती आपल्याला सोडून गेल्याची तीव्र शोकभावना निर्माण झाली. प्रत्येकाला 'आपलासा वाटणे' हे भाग्य कमविणारे विरळच! त्यात प्रत्येकाला त्या व्यक्तीबद्दल आदर असणे हे आणखीनच विरळ! रतन टाटा यांना हे भाग्य लाभले. देशातील असे कोणते गाव नाही आणि जगातील असा कोणता देश नाही जिथे टाटांचे नाव पोहोचलेले नाही. पाच पिढ्यांनी अतिशय कष्टाने रुजविलेल्या टाटा नावाच्या वृक्षाला रतन टाटा यांनी आपल्या अविरत श्रमाने, कष्टाने, दूरदृष्टीने व प्रामाणिकपणाने जगभर पोहोचविले व त्याचा अक्षरश: वटवृक्ष बनवला. 'टाटा' हा ब्रँड जगभर पोहोचविताना रतन टाटांनी त्याला नीतिमत्तेची, प्रामाणिकपणाची, नम्रतेची, माणुसकीची आणि विश्वासाची अतूट जोड दिली त्यामुळे हा ब्रँड केवळ जगभर विस्तारला नाही तर या ब्रँडने प्रत्येकाच्या मनात आपलेपणाची अत्यंत विरळ व अपवादात्मक भावना निर्माण करण्यात यश मिळवले! त्यामुळे रतन टाटा उद्योगपती म्हणून तर मोठे ठरलेच पण त्याहीपेक्षा माणूस म्हणून फार मोठे ठरले. उद्योजक म्हणून उद्योगाचा विस्तार करताना बहुतांश वेळा आपल्या संपत्तीत वाढ करण्याचाच विचार प्राधान्याने त्यामागे असतो. मात्र, रतन टाटांच्या उद्योग विस्तारामागे संपत्तीनिर्मिती दुय्यम व सामान्य माणसाचे हित साधणे, त्याच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणणे व देशाच्या विकासात, प्रगतीत योगदान देण्याचा विचार प्रथम प्राधान्याचा होता. आपल्या उद्योग विस्ताराला सामाजिक बांधीलकी व सामान्यांच्या कल्याणाची अतूट जोड देणारे रतन टाटा म्हणूनच उद्योगक्षेत्रातील 'अनमोल रतन' ठरले व प्रत्येकाच्या मनातील 'आपला माणूस' ठरले! सुमारे दोन दशके त्यांनी अध्यक्ष म्हणून टाटा उद्योगसमूहाचा कारभार सांभाळताना आपल्या कल्पकता, कष्टाळूपणा, सचोटी, विनम्रता व प्रामाणिकपणा या गुणांच्या जोरावर जगभर या ब्रँडचा विस्तार करून ब्रँडला प्रतिष्ठा, पत व आदरही मिळवून दिला. त्यांच्याच काळात टाटा समूहाने टेटली, जग्वार अँड लँडरोव्हर, कोरस या जगविख्यात कंपन्यांचे अधिग्रहण केले आणि देश म्हणून भारतीयांची मान अभिमानाने उंचावली! समूहाचा विस्तार करताना त्याला समाजहित, सामाजिक बांधीलकी व माणुसकीची जोड रतन टाटा यांनी दिल्याने टाटा समूह हा जगातला दानशूर समूह ठरला. टाटा देशाच्या शिक्षण, वैद्यकशास्त्र व ग्रामीण भागाच्या विकास व प्रगतीसाठी आग्रही होते. त्यातूनच २०१४ साली टाटा समूहाने इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, मुंबई या संस्थेला भरीव देणगी दिली. मर्यादित संसाधनासह कुंठित जीवन जगणाऱ्या सामान्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी टाटा सेंटर फॉर टेक्नॉलॉजी अँड डिझाईन या संस्थेची त्यांनी स्थापना केली. सामान्यांचे चार चाकी गाडीचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी रतन टाटा यांनी नॅनो कारची कल्पना प्रत्यक्षात उतरवली व अवघ्या १ लाख रुपयांमध्ये चार चाकी गाडी सामान्यांना उपलब्ध करून दिली. स्कूटरवरून प्रवास करणाऱ्या भारतातील सामान्य कुटुंबांना त्यांचे चार चाकी गाडीने प्रवास करण्याचे स्वप्न पूर्ण करण्याची संधी उपलब्ध करून दिली. रतन टाटा यांच्या नेतृत्वाखाली टाटा समूहाने हार्वर्ड बिझनेस स्कूलमध्ये एक कार्यकारी केंद्र तयार करण्यासाठी ५० दशलक्ष डॉलर्सची देणगी दिली होती. याच संस्थेत रतन टाटा यांनी स्वत: शिक्षण घेतले होते. संस्थेने त्यांच्या सन्मानार्थ इमारतीतील सभागृहास 'टाटा हॉल'असे नाव दिले. सर्वच क्षेत्रांतील नावीन्यपूर्ण गोष्टींची आवड हा रतन टाटा यांचा आणखी एक गुण! त्यातून टाटा समूहाचा विस्तार सामान्यांच्या ताटातील मिठापासून चहा आणि तंत्रज्ञानापर्यंत झाला! रसायने, पोलाद, वाहननिर्मिती, माहिती- तंत्रज्ञान, दूरसंचार, ऊर्जा, आतिथ्य, सेवाक्षेत्र ते ताटातले मीठ असा टाटा समूहाचा प्रचंड मोठा व सर्वव्यापी विस्तार हे रतन टाटांचेच श्रेय आणि विशेष म्हणजे या सगळ्या विस्तारामागे असणारी सामान्यांचे जीवनमान उंचावण्याची प्रांजळ भावना हे रतन टाटांचे वैशिष्ट्य! त्यांना त्यांच्या जिवंतपणी भारतरत्न पुरस्काराने गौरविले जावे ही देशातील सामान्यांची इच्छा मात्र अपुरीच राहिली. महाराष्ट्र सरकारने रतन टाटा यांना श्रद्धांजली अर्पण करतानाच आता त्यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्काराने गौरविण्याचा प्रस्ताव केंद्राकडे पाठविला आहे. केंद्र सरकार त्याची योग्य दखल घेईल ही अपेक्षा!

उद्योगपती म्हणून कार्यरत असताना व्यवसायातील गळेकापू स्पर्धेतही आयुष्यभर आपली नैतिकता, प्रामाणिकपणा, सचोटी, सामाजिक बांधीलकीचे भान आणि सामान्य माणसांबद्दलची कणव जोपासणे हे खरोखरच अत्यंत अवघड काम! मात्र, रतन टाटा यांनी ही अग्निपरीक्षा आयुष्यभर पदोपदी दिली आणि तरीही टाटा समूहाचा सर्वव्यापी यशस्वी विस्तार करून दाखविला आणि हे करताना सचोटी, प्रामाणिकपणा व विनम्रता कधीच सोडली नाही. हे फक्त अनन्यसाधारण व्यक्तीच करू शकतो. या ऋषितुल्य व्यक्तिमत्वाला भावपूर्ण श्रद्धांजली!

**आदिशक्तीच्या नवरात्रोत्सवाची सांगता होते ती दसऱ्याच्या दिवशी. संपूर्ण भारतभरात खास करून दक्षिणेकडे हा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा होतो. या दिवसाला अनेक पौराणिक तसेच नैसर्गिक ऋतूमानाचेही संदर्भ आहेत. हा उत्सव विजयासाठी प्रस्थान करण्याचा आहे. त्यामुळेच दसऱ्याला विजयादशमी असेही म्हटले जाते. या दिवशी सीमोल्लंघन करण्याची प्रथा प्राचीन काळापासून आहे. आज बदलत्या काळात सिमोल्लंघन म्हणजे आपल्या मनातील राग, लोभ, मत्सर, द्वेष, अंधश्रद्धा, सूड या वाईट भावना दूर करून मनाचं, विचारांचं एक प्रकारे सिमोल्लंघन करण्यासाठी या दिवसाचं महत्त्व आहे.**

# विजयी होऊ चला...

जिथे भगवान कृष्ण आणि धनुर्धर पार्थ अर्थात अर्जुन आहे. तेथे विजय, लक्ष्मी, कल्याण आणि शाश्वत निती आहे असे महर्षी व्यास यांनी गीतेच्या अंतिम श्लोकात म्हटले आहे. योगेश्वर कृष्ण म्हणजे ईश्वर कृपा आणि धुनुर्धर अर्जुन म्हणजे मानवी प्रयत्न. या दोघांचा जेथे सुयोग होतो. तेथे कुठलीही गोष्ट अशक्य राहत नाही. माणसाचे सकारात्मक प्रयत्न आणि ईश्वर कृपा जेथे एकत्र येतात तेथे विजयाचा शंखनाद नेहमीच ऐकायला येईल हे निर्विवाद सत्य आहे. दसरा हा उत्सव शक्ती आणि शक्तीचे महत्त्व सांगणारा उत्सव- नवरात्रीच्या नउ दिवसात जगदंबेची उपसना करून शक्तीशाली बनलेला माणूस विजयाच्या प्राप्तीसाठी प्रयत्न करेल. हे अगदी स्वाभाविक आहे. या दृष्टीने बघितले तर दसऱ्याचा उत्सव विजयासाठी प्रस्थान करण्याचा उत्सव आहे. हे समजते.

भारतीय संस्कृती वीरतेची पूजक आहे. शौर्याची उपासक आहे. व्यक्ती आणि समाजातील तमाम घटकांमध्ये विरता प्रकट होण्यासाठी दसऱ्याचा उत्सव साजरा करण्याची पद्धत आहे. युद्ध अनिवार्य असेल तर शत्रुच्या आक्रमणाची वाट न बघता त्यांच्यावर आक्रमण करून त्याचा पराभव करणे हीच कुशल राजनिती आहे. शत्रु आपल्या राज्यात घुसून, लुट केल्यानंतर लढाई करण्याची तयारी करणारे आमचे पूर्वज नव्हते. तर शत्रुचा दुष्ट व्यवहार समजूनच त्याच्यावर आक्रमण करत असत. रोग आणि शत्रूला निर्माण झाल्याझाल्याच नष्ट करायला पाहीजे. अन्यथा ते त्यांचे प्राबल्य वाढवते.

दसरा म्हणजे विजयाचे प्रतिक म्हणूनच या दिवसाला विजयादशमी देखील म्हणतात. प्रभुरामचंद्रांच्या काळापासून दसरा हा दिवस विजयाचे प्रतिक बनला आहे. भगवान रामचंद्रांनी रावणाचा नाश याच दिवशी केला होता. म्हणून आजही या दिवशी प्रतिकात्मक रुपाने रावणदहन करतात. छत्रपती शिवाजी महाराजांनीही औरंगजेबाला हैराण करण्यासाठी याच दिवसाची निवड केली होती आणि हिंदू धर्माचे रक्षण केले होते. इतिहासात या दिवशी विजयप्रस्थान करण्याची अनेक उदाहरणे सापडतात.

**ऋतुमानाचे संदर्भ**

या उत्सावामागे काही नैसर्गिक ऋतुमानांचेही संदर्भ आहेत. दसऱ्याच्या वेळी वर्षाऋतू येऊन गेलेला असतो. वरूण देवाच्या कृपेने या काळात अन्नधान्याची समृद्धी असते. त्यामुळे समाजमन आनंदाने भरलेले असते. नसानसांत उत्साहाचे कारंजे उडत असल्यामुळे विजयप्रस्थान करण्याचे त्याचे मन होणारच. या दिवसात पाउस गेलेला असतो. चिखलाने माखलेले रस्ते सुकलेले असतात. हवामान अनुकूल असते. आकाश स्वच्छ असते. असे वातावरण विजयाला पूरक असते. शिवाय नउ दिवस जगदंबेची उपासना करून प्रयत्न केलेली शक्तीदेखील शत्रुचा संहार करण्याची प्रेरणा देत असते. म्हणून या दिवशी विजयासाठी अर्थात चांगल्या कामाची सुरुवात करण्याची पद्धत आहे. देवी जगदंबेने सतत नऊ दिवस युद्ध करून चंड-मुंड, रक्तबीज, महिषासुर आदी राक्षसांचा वध केला होता. तिच्या विजयाचे प्रतिक म्हणूनही दसरा साजरा केला जातो. तसेच पांडवांनी अज्ञातवासातून बाहेर येउन आपली लपविलेली शस्त्रे शमीच्या झाडावरून याच दिवशी बाहेर काढली होती. म्हणून या दिवशी सिमोल्लंघन करतात आणि येताना आपट्याची पाने सोन्याचे प्रतिक म्हणून एकमेकांना वाटतात. भारतीय संस्कृतीत प्रत्येक चेतन आणि अचेतन गोष्टीला सन्मान दिला जातो. आणि त्यांचे पूजनही केले जाते. यामध्ये वृक्षवनस्पतीही सामील आहेत. चैत्र शुद्ध प्रतिपदेला म्हणजे गुढीपाडव्याला कडुलिंबाची पुजा केली जाते. वटसावीत्री पौर्णिमेला वडाची पुजा केली जाते. सोमवती आमावस्येला तुळशीची पुजा केली जाते. भाद्रपद महिन्यात येणाऱ्या कुशग्रहिणी आमावस्येला कुशाची पुजा केली जाते. आणि कार्तिक महिन्यातील नवमीला आवळे नवमी म्हणून आवळ्याच्या झाडाची पुजा केली जाते. त्या-त्या वनस्पीतीचे आरोग्याच्या दृष्टीने महत्त्व जाणून त्याचे पुजन केले जाते. जेणेकरून मानव या उपयुक्त वृक्षांचे संवर्धन करेल.

दसऱ्याला आपट्याची पाने देण्यामागे विजय आणि उल्हासाची भावना असते. तसेच समृद्धीचीही कामनाही केली जाते. याच दिवशी काही भागात अपराजिता (विष्णूकांता) या वनस्पतीचेही पुजन केले जाते. ही वनस्पती विष्णुला प्रिय आहे. या धार्मिक संदर्भाबरोबर तीचे काही वैद्यकीय गुणधर्म आहेत. ती अतिशय आरोग्यदायी आहे. कफविकारांवर या वनस्पतीचा खूप चांगला उपयोग होतो. विजया-दशमीला दुर्गापुजन, अपराजिता पुजन, नवरात्रीचे पारणे इत्यादी विधी केले जातात.

**दक्षिणेकडील दसरा**

भारतात उत्तर भारतात दसऱ्याचा सण मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. तर पूर्वेला प. बंगालमध्ये दुर्गापूजेचा मोठा महोत्सव असतो. म्हैसूरचा दसरा हा केवळ भारतातच नाही तर जगभरात प्रसिद्ध आहे. जगाच्या कानाकोपऱ्यातून या महोत्सवात सहभागी होण्यासाठी लोक येत असतात. दक्षिणेकडे दसरा सण साजरा करण्याची

**सु. ल. हिंगणे, अध्यात्म अभ्यासक**

पद्धत विजयनगरच्या सम्राटांनी पंधराव्या शतकात सुरू केली. विजयनगरचे साम्राज्य लयाला गेल्यावर म्हैसूरच्या वडियार राजघराण्याने हा सण साजरा करायला सुरुवात केली. १६१०मध्ये श्रीरंगपट्टण येथे राजा वडियार याने पहिल्यांदा दसरा साजरा केला. नवरात्राचे नऊ दिवस आणि दसऱ्याच्या दिवशी असे दहा दिवस म्हैसूरचा राजवाडा रोषणाईने उजळून गेलेला असतो. म्हैसूरच्या चामुंडी टेकडीवर चामुंडेश्वरी देवीचे मंदीर आहे. या देवीची पूजा करून वडियार राजघराण्याकडून सणाला प्रारंभ होतो. त्यानंतर राजाचा खास दरबार भरतो. असा खास दरबार भरवण्याची ही परंपरा कृष्णराजा वडियार तिसरा याने १८०५ मध्ये सुरू केली. या दरबारात राजघराण्यातील सर्व सदस्य, विशेष आमंत्रित, अधिकारी आणि सर्वसामान्य लोक उपस्थित असतात. ही परंपरा आजही चालू आहे. आता हा खास दरबार वडियार घराण्यातील नवी पिढी भरवत असते. अर्थात पूर्वीच्या काळातील लोकदरबाराचे स्वरूप आता बदलले आहे. आता श्रीकांतदत्त नरसिंहराजा वडियार दसऱ्याच्या वेळी खासगी दरबार भरवतात. दसरा महोत्सवाच्या नवव्या दिवसाला महानवमी म्हणतात. हा दिवस अतिशय पवित्र मानला जातो. त्यादिवशी राजघराण्यातील तलवारीची पूजा केली जाते आणि तिची मिरवणूक काढली जाते.

विजयादशमीदिवशी पारंपरिक दसरा मिरवणूक म्हैसूर शहरात काढली जाते. या मिरवणुकीचे खास आकर्षण म्हणजे चामुंडेश्वरी देवीची मूर्ती सजवलेल्या हत्तीवर ठेवलेल्या सोन्याच्या अंबारीत बसवलेली असते. मिरवणुकीला निघण्यापूर्वी राजा आणि राणी जोडीने चामुंडेश्वरीची पूजा करतात. देवीची मूर्ती सोन्याच्या अंबारीत ठेवल्यानंतर मिरवणुकीला सुरूवात होते. म्हैसूर राजवाड्यातील बन्नीमंडपापासून मिरवणुकीला प्रारंभ होतो. या बन्नीमंडपात बन्नीचा वृक्ष आहे. त्या वृक्षाचीही पूजा केली जाते. बन्नीचे झाड म्हणजे शमीचे झाड. याच झाडाच्या ढोलीत पांडवांनी आपली शस्त्रे अज्ञातवासात जाण्यापूर्वी लपवून ठेवली होती. पूर्वीच्या काळी कोणत्याही युद्धावर जाताना राजे लोक या झाडाची पूजा करत. बन्नीमंडपात विजयादशमीच्या रात्री मशाल मिरवणूक काढली जाते.

म्हैसूरच्या दसऱ्याचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे दसऱ्याचे प्रदर्शन. म्हैसूर राजवाड्याच्या समोरील भागात हे प्रदर्शन भरवले जाते. दसऱ्याच्या दहा दिवसांच्या कालावधीत सुरू होते आणि डिसेंबरपर्यंत चालू असते. या प्रदर्शनात अनेक तऱ्हेचे स्टॉल उभे केले जातात. कपडे, प्लॅस्टीकच्या वस्तू, स्वयंपाकघरातील साधने, सौंदर्य प्रसाधाने, खाद्यपदार्थ अशा अनेक वस्तूंचे स्टॉल तेथे लावण्यात येतात. या काळात म्हैसूरला जत्रेचे स्वरूप येते. जत्रेतील सर्व खेळणी यावेळी इथे असतात. राज्य सरकारही ही संधी सोडत नाही आणि राज्याच्या विकासाचा आढावा घेणारी प्रदर्शने यावेळी भरवली जातात. अलिकडच्या काळात म्हैसूरमध्ये युवा दसरा साजरा केला जातो. यात युवक मोठ्या संख्येने सहभागी होतात. केवळ म्हैसूरमधूनच नव्हे तर संपूर्ण कर्नाटकातून तरूण या सोहळ्यात सहभागी होतात आणि विविध कार्यक्रम साजरे करतात.

**बंधुभावाची भावना**

जगभराचा विचार केला तर केवळ भारतामध्ये अनेक प्रकारच्या संस्कृतींचा संगम पहायला मिळतो. कदाचित म्हणूनच, देशाच्या कानाकोपऱ्यात कुठे ना कुठे सतत कोणता तरी उत्सव सुरू असतो. अनेक समस्यांच्या विळख्यात सापडूनही भारतीय माणूस आपली चांगले जीवन जगण्याची उमेद कधी गमावत नाही. भारत नावाचा देश याच उमेदीवर तर हजारो वर्षांपासून ताठ उभा आहे. अनेक वर्षांपासून हे सण उत्सवच आपल्या समाजाचे संवर्धन आणि जपणूक करत आहेत. समाजातील बंधुभावाची भावना या सणांमुळे निर्माण होते. सर्वांना सामावून घेणारी आपली संस्कृती आपले हे ब्रीद अशा सणांमधूनच सिद्ध करून दाखवत असते. विजयादशमी अर्थात दसरा हा सणदेखील ही परंपरा कायम ठेवतो.

**बदलत्या काळात हवे वैचारिक सीमोल्लंघन**

विजयादशमीला पौराणिक संदर्भ आहेतच. पण बदलत्या काळात आपणही काही चांगले संदर्भ लावू शकतो. वाईटावर चांगल्याचा विजय म्हणून विजयादशमी साजरी केली जाते. आपणही आपल्या मनातील, कृतीतील वाईट गोष्टीवर मात करून विजय मिळवला पाहिजे. आपल्या मनातील रक्तबीजरुपी वासना, द्वेष, मत्सर असूरांना नामोहरम केले पाहीजे. मनाचे सिमोल्लंघन केले पाहीजे. 'विचार बदला, आयुष्य बदलेल' असं म्हटलं जातं. सिमोल्लंघन म्हणजे आपल्या मनातील राग, लोभ, मत्सर, द्वेष, अंधश्रद्धा, सूड या वाईट भावना दूर करून मनाचं, विचारांचं एक प्रकारे सिमोल्लंघन करण्यासाठी या दिवसाचं महत्त्व आहे. या दिवशी आपल्यातील चांगल्या गुणांना उजाळा द्यायचा असतो. समाजात वावरताना असंख्य वाईट प्रवृत्ती आपल्या भोवताली दिसत असतात. त्यांना पाहून हे जग वाईटच आहे का अशी पुसट शंकाही मनात येते. पण या नकारात्मक विचारांना दूर सारून सकारात्मक विचारांची पेरणी करणं आवश्यक असतं. त्यामुळे आत्मविश्वास तर दृढ होईलच, पण तेच खऱ्या अर्थानं म्हणूनच या विजया दशमीला जुन्या, बुरसटलेल्या विचारांना मागे सारून त्यांच्या कोशातून बाहेर पडून वैचारिक सिमोल्लंघन करून नवे विचार धारण करू या आणि विजया दशमी खऱ्या अर्थाने साजरी करू या !




**पंचांग**

**शनिवार, दिनांक १२ ऑक्टोबर २०२४**
अश्विन शु.९, श्रवण श्री शके १९४६, विक्रम शोभन २०७९, क्रोधीनाम संवत्सर, दक्षिणायन, वर्षा ऋतू **नक्षत्र** : श्रवण, **योग :** धृति, करण : तैतिल खंडे-महानवमी, विजयादशमी, दसरा. विजय मुहूर्त दु. २.२२ ते ३.०९ नवरात्रोत्थापन, उपवास, पारणा, साईबाबा पुण्यतिथी, शिर्डी, धम्मचक्र प्रवर्तन दिन **सूर्योदय :** स.०६.१० **सूर्यास्त :** सायं. ०५.४९ वा. **राहू काळ : सकाळी :** ९:०० ते १०:३०

**दिनविशेष**

▶**१९११**: भारताचे आघाडीचे फलंदाज, समालोचक आणि दानशूर उद्योगपती विजय मर्चंट यांचा जन्म. ▶**१९२०**: राजर्षी शाहू महाराजांनी नव्याने निर्माण केलेल्या 'क्षात्र जगद्गुरु' या पदावर सदाशिव बेनाडीकर यांची नियुक्ती. ▶**१९२१**: केसरीचे माजी संपादक, महाराष्ट्राच्या विधान परिषदेचे सभापती, राज्यसभा सदस्य जयंत श्रीधर टिळक यांचा जन्म. ▶**१९२२**: साहित्यिक, गीतकार शांताबाई शेळके यांचा जन्म. ▶**१९६४**: एका अंतराळयानातून तीन प्रवासी पाठविण्याच्या पहिल्या प्रयत्नाला रशियाला यश. ▶**१९६५**: स्विस रसायनशास्त्रज्ञ पॉल हेरमान यांचे निधन. डीडीटी या रासायनिक पदार्थाच्या अनेक कीटकांवरील संपर्कजन्य विषारी परिणामांच्या शोधाबद्दल त्यांना १९४८ चा नोबेल पुरस्कार देण्यात आला. ▶**१९६७**: राम मनोहर लोहिया यांचे निधन. ▶**२००१**: कोफी अन्नान यांना शांततेसाठीचे नोबेल पारितोषिक जाहिर.

**राशीभविष्य**

▲ **मेष** : समाजात आपली प्रशंसा होईल. ▲ **वृषभ** : कामातून समाधान लाभेल. ▲ **मिथुन** : स्वत:चे प्रयत्न स्वत:च करावेत. ▲ **कर्क** : शुभकार्याला चांगल दिवस आहे. ▲ **सिंह** : सहकाऱ्यांची मदत मोलाची ठरेल. ▲ **कन्या** : कामे मार्गी लागतील. ▲ **तुळ** : रेंगाळलेली खरेदीकराल. ▲ **वृश्चिक** : कर्ज प्रकरणे मंजूर होतील. ▲ **धनु** : आर्थिक गुंतवणूक फायदेशीर ठरेल. ▲ **मकर** : इतरांवर अवलंबून राहू नका. ▲ **कुंभ** : महत्वाचे निर्णय शक्यतो टाळावेत. ▲ **मीन** : आपले अंदाज अचूक ठरतील.

**चिंतन**

दुसऱ्याला जर आपलेसे करुन घ्यावयाचे असेल तर त्याला प्रेम द्या, माया द्या. आपण आपल्या शत्रूलाही प्रेमच द्यावे. प्रेमाने जग जिंकता येते. शेजाऱ्यांवर प्रेम करा. मुक्या प्राण्यावंर प्रेम करा, असे येशूचे म्हणणे आहे. प्रेम ही एक शक्ती आहे. महान सामर्थ्य आहे. प्रेम म्हणजे दु:खाचा नाश! प्रेम म्हणजे विजय! प्रेम म्हणजे सर्व समाधान! प्रेम माणसावर करावे. प्रेम प्राण्यावर करावे, प्रेम निसर्गावर करावे. प्रेम स्वत:वर करावे, इतरांवर करावे. प्रेम म्हणजे परब्रम्ह. प्रेम म्हणजे मोक्षाप्रत जाणे.

**व्यक्तीविशेष**

## राम मनोहर लोहिया

समाजवादी पक्षाचे प्रभावी कार्यकर्ते म्हणून स्वातंत्र्य चळवळीत ज्यांनी आपल्या कार्याचा ठसा उमटविला त्या राम मनोहर लोहिया यांचा जन्म २३ मार्च १९१० रोजी झाला. देशात लोकशाही समाजवादी विचारसरणीचे लोण पसरविणारा हा स्वातंत्र्यपर्वातील आघाडीचा कार्यकर्ता. बर्लिनमधून पीएच.डी मिळवून ते भारतात परतले आणि सरकारी नोकरीचे अमिष लाथाडून स्वातंत्र्याच्या ध्येयप्राप्तीसाठी चले जाव आंदोलनात उतरले. १९४२ च्या चलेजाव आंदोलनदरम्यान झालेल्या प्रतिकार सामर्थ्याचे जनक म्हणून त्यांचे नाव घेतले जाते. या आंदोलनादरम्यान आपल्या उपरोधिक शैलीत, विशिष्ठ व्यक्ती व घटनांचे विश्लेषण करणारी भाषणे त्यांनी लिहिली. ती गुप्त रेडिओ केंद्रातून प्रसारित होत असत. स्वातंत्र्यपर्वात आघाडीवर असणारे लोहिया गोवा मुक्ती आंलनातही अग्रभागी होते. १९५५ मध्ये त्यांनी समाजवादी पक्षाची स्थापना केली. १९६३ पासून ते संसद सदस्य होते. राजकीय कार्य, रचनात्मक कार्य आणि परिवर्तनासाठी लढणाऱ्या लोहियांनी स्वत:चा असा लोहियावाद निर्माण केला. समाजवादी चळवळीचे नेतृत्व करणाऱ्या लोहियांनी भारतीय समस्यांच्या संदर्भात स्वदेशी समाजवाद विकसित करण्याची भूमिका मांडली. समाजवादी चळवळीतील अग्रगण्य नेते लोहिया दि. १२ ऑक्टोबर १९६७ रोजी आपल्यातून निघून गेले.

**बोधकथा**

## शंकरची हुशारी

शंकर जंगलाच्या जवळ असलेल्या एका खेड्यात रहात होता. प्रामाणिकपणे कष्ट करुन शंकर त्याचा उदरनिर्वाह करत होता. एके दिवशी रोजच्या प्रमाणे शंकर झुणका भाकरीची शिदोरी घेऊन जंगलाकडे निघाला. जंगलातील अलिकडची वाळकी झाडं तोडल्यामुळे त्याला जरा आतल्या भागाकडे जावे लागले. तिथं गेल्यावर त्याच्या लक्षात आले की, विहिरीच्या जवळच्या झाडाच्या फांद्या वाळलेल्या आहेत. शंकरने त्या फांद्या तोडायला सुरुवात केली. डोक्यात घराचे विचार होते. मुलाला चांगले शिकून मोठे करायचे हाही विचार होता. कारण शिक्षणाच्या सुविधा आता त्यांच्या गावापर्यंतही पोहचल्या होत्या. असा विचार करत असतानाच शंकरच्या हातातील कुऱ्हाड सटकली आणि विहिरीत पडली. आता ही कुऱ्हाड काडायची कशी याचा तो विचार करू लागला. कुऱ्हाड काढण्यासाठी त्याला एका व्यक्तीची मदत लागणार होती. त्यामुळे तो एखाद्या वाटसरुची वाट बघू लागला. बराच वेळ गेल्यानंतर तेथून एक वाटसरु जाऊ लागला. शंकरने पुढे येऊन त्याला कुऱ्हाड काढण्यासाठी मदत करण्याची विनंती केली. वाटसरुनेही त्याला मदत केली आणि दोघांनी मिळून विहिरीतून कुऱ्हाड काढली.

(पूर्वार्ध)

**जिज्ञासा**

## जीपीएसचे फायदे-तोटे

पण याचे तोटेही आहेत. समजा रिसिव्हरची बॅटरी कमी झाली, तर मिळणारे सगळेच सिग्नल रिसिव्हर घेऊ शकत नाही. यामुळे कुठलाही अंदाज वर्तवण्याच्या पद्धतीमध्ये कमतरता राहू शकते. त्यामुळे बॅटरीच्या समस्येमुळे लांबच्या प्रवासामध्ये फक्त जीपीएसवरच अवलंबून असणं महागात पडू शकतं. सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे, जीपीएस प्रणाली किंवा त्याचे सिग्नल जरी मोफत असले, तरीही हे सिग्नल पकडण्यासाठी लागणारं यंत्र महाग असतं. साधं युनिट साधारण पाच हजार रूपयांपर्यंत मिळतं, तर आधुनिक युनिट पंधरा हजारांपर्यंत मिळतं. यामुळे तंत्रज्ञान सगळ्यांच्या उपयोगाचं असलं, तरीही सगळ्यांना ते परवडण्याजोगं नाही. अर्थात, येत्या काही काळामध्ये याच्याही किमती कमी होतील. ग्लोबल पोझिशनिंग सिस्टिमच्या माध्यमातून आपणही अचूक अंदाज व्यक्त करू शकतो. तंत्रज्ञानानं आपल्याला अधिकाधिक जवळ आणण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचा फायदा आपण करून घेणं आवश्यक आहे. (उत्तरार्ध)

**सामान्यज्ञान**

## लोखंडावर गंज का लागतो ?

तसेच त्याला कोरोजनही म्हटले जाते. मात्र गंज लागणे हे केवळ ऑक्सिडेशन प्रक्रियेमुळे होत नाही तर हा बदल घडून आणण्यासाठी हवेत आर्द्रता असणे गरजेचे असते. गंजाची प्रक्रिया ही एक इलेक्ट्रो केमिकल प्रक्रिया असते. जी क्षार आणि आम्लांच्या उपस्थितीमुळे घडते. ज्या ठिकाणी हवेत सल्फरडाय ऑक्साईडचे कण अधिक प्रमाणात पसरलेले असतात त्या क्षेत्रात गंज लवकर चढतो. गंज हा केवळ धातूच्या पृष्ठभागाचे नुकसान करत नाही तर संपूर्ण धातूच कमकुवत बनवतो. (क्रमश:)

**सोडवा सुडोकू**

सुडोकू सोडवताना रिकाम्या चौकटीमध्ये १ ते ४ आकडे अशा पद्धतीने भरा जेणेकरून उभ्या अथवा आडव्या ओळीत तो आकडा एकदाच येईल.

**क्रमांक : ४६४**

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | | 3 | |
| | 4 | 2 | 1 |
| | 3 | 1 | 2 |
| 2 | | 4 | |

**क्रमांक : ४६३ चे उत्तर**

| | | | |
|---|---|---|---|
| 4 | 1 | 3 | 2 |
| 2 | 3 | 4 | 1 |
| 1 | 4 | 2 | 3 |
| 3 | 2 | 1 | 4 |

**हास्यविनोद**

## तशी समाजसेवाच

एक मित्र (दुसऱ्याला) : माझे वडील प्रत्येकाला चुकीच्या मार्गावर जाण्यास रोखतात. दुसरा : तुझे वडील समाजसुधारक आहेत का ? पहिला : नाही, ते ट्रॅफिक पोलीस आहेत.

— — — — — — —

बंडोपंत एकदा हॉटेलमध्ये जेवायला गेले. जेवण आणि वेटरची तत्परता पाहून बंडोपंत खुश झाले आणि त्यांनी दहा रुपये टीप त्याला देऊ केली. तो वेटर दहा रुपये नाकारत म्हणाला, 'मला फक्त दहा रुपये टीप देता आहात. हा माझा अपमान आहे.' बंडोपंत म्हणाले, 'अरे मग किती रुपये द्यायचे?' वेटर म्हणाला, '२० रुपये'. बंडोपंत म्हणाले, 'अरे पण त्यामुळे तुझा दुप्पट अपमान होईल.'



**महिलायन**

## मातीची कूल भांडी

अलीकडे आधुनिक काळात मातीच्या भांड्यांचा वापर खूपच कमी झालेला दिसतो. काचेच्या, नॉनस्टिकच्या जमान्यात ही भांडी दूर सारली गेलेली दिसतात, पण मातीच्या भांड्यातील अन्नपदार्थांची एकदा चव घेऊन बघितलीत तर वारंवार तशाच पद्धतीने खाण्याची इच्छा होईल. हे एकदा अनुभवून बघावे. मातीच्या मडक्यात विरलेल्या दह्याची चव एकदा चाखून बघा, म्हणजे गोकुळातला कान्हा दह्यासाठी, लोण्यासाठी एवढा वेडा का होता, ते समजेल. या भांड्यांमध्ये दह्यातील अतिरिक्त पाणी शोषले जाते त्यामुळे दही घट्ट जमते. शिवाय, भाजलेल्या मातीचा विशिष्ट सुगंधही दह्याला येतो. तसेच यात विरजलेले दही लवकर आंबट होत नाही. नेहमीच धातूच्या तव्यावर भाकरी भाजण्यापेक्षा मातीच्या तव्यावर भाजून बघावी. या भाकरीची किंवा पोळीची चव काही औरच असते. पिण्यासाठीही स्टीच्या भांड्यांचा वापर करण्यापेक्षा माठ वापरावेत. पाणी अधिक स्वादिष्ट लागते. उन्हाळ्यात फ्रिजच्या पाण्याऐवजी असे पाणी पिल्यास मन शांत होते शिवाय उन्हाचा आणि उष्णतेचा त्रासही कमी होतो. कुठल्याही फ्रिजमधील 'चिल्ड' पाण्याची बरोबरी मातीच्या भांड्यातील पाण्याशी करता येणार नाही. पाण्याप्रमाणेच एकदा मातीच्या भांड्यात भाजी शिजवून बघावी. त्याची चव कित्येक दिवस जीभेवर रेंगाळत राहते. कोकणात सहलीला गेलात तर तेथील पोपटी नावाचा पदार्थ एकदा अवश्य चाखून बघावा. म्हणजे मातीच्या भांड्यातील पदार्थांच्या चवीचा खरा आनंद घेता येईल. अलीकडच्या शहरी संस्कृतीत आणि जीवनशैलीत मातीची भांडी खरं तर गैरसोयीची वाटू शकतात. पण, या भांड्यांचा वापर अतिशय स्वस्त असून पर्यावरणाच्यादृष्टीनेदेखील तो अनुकूल आहे. ही भांडी फुटली तरीही त्यांच्यापासून पर्यावरणाला कोणता धोका होत नाही. म्हणूनच घरात काही ठिकाणी आपण मातीच्या भांड्यांचा वापर नक्कीच करू शकतो. उदा. पाणी गार करण्यासाठी, दही विरजण्यासाठी भात किंवा खिचडी शिजवण्यासाठी, भाकरी किंवा पोळ्या भाजण्यासाठी अशा भांड्यांचा वापर करणे फारसे अवघड नाही.

**बालांगण**

## मराठी व्याकरण

नामावरून जसे त्याचे लिंग समजते, तसे त्या नामाने निर्देशित केलेली वस्तू एक आहे की एकापेक्षा अधिक आहेत हेही कळते. नामाच्या ठिकाणी संख्या सुचविण्याचा जो एक धर्म आहे त्याला वचन असे म्हणतात. वचन या शब्दाचा अर्थ बोलणे. आपण एका वस्तूबद्दल बोलू लागलो की ते एकवचन आणि अनेकांबद्दल बोलू लागलो की अनेक वचन.

'राष्ट्र संचार' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave
Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

## सहा वर्षांत पाच प्रस्ताव पाठविल्यानंतर

# पोलीस मुख्यालयासाठी ५० एकर जागेला मंजुरी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** सहा वर्षांत पाच प्रस्ताव पाठविल्यानंतर पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या मुख्यालयासाठी अखेर जागा देण्याबाबत राज्य शासनाच्या मंत्रिमंडळाने निर्णय घेतला. शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या ताथवडे येथील वळूमाता केंद्र प्रक्षेत्र येथील ५० एकर जागा उपलब्ध होणार आहे. पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांनी बुधवारी उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांच्याकडे समस्या मांडली. त्यानंतर अवघ्या २४ तासांत गुरुवारी जागा देण्याचा शासनाने निर्णय घेतला. तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी १५ ऑगस्ट २०१८ रोजी पिंपरी-चिंचवड व मीरा भाईंदर पोलिस आयुक्तालयाला मंजुरी दिली. त्यावेळी चिंचवड येथे महापालिका शाळेच्या इमारतीत आयुक्तालयाचे कामकाज सुरू झाले.



> पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयासाठी आवश्यक बाबींचे प्रस्ताव सादर केले आहेत. त्यात आयुक्तालया व मुख्यालयासाठी जागा उपलब्ध झाली आहे. त्यामुळे आयुक्तालयाच्या विविध विभागांना हक्काची जागा मिळणार आहे.
> **– विनय कुमार चौबे,** पोलिस आयुक्त, पिंपरी-चिंचवड

निगडी येथील शाळेत मुख्यालय थाटण्यात आले. दरम्यान, मोशी येथील नऊ एकर जागा आयुक्तालयासाठी मिळाली. मात्र, मुख्यालयासाठी जागेची मागणी कायम होती.

राज्याच्या पशुसंवर्धन व विकास विभागाचे ताथवडे येथे वळूमाता केंद्र प्रक्षेत्र आहे. या केंद्रातील ५० एकर जागा शहरातील मध्यवर्ती ठिकाण म्हणून पोलीस आयुक्तालयाने प्रस्तावित केली.

त्याला राज्य शासनाने मंजुरी दिली. पिंपरी-चिंचवड पोलिस मुख्यालयाच्या जागेसाठी आयुक्तालय प्रशासनाकडून सातत्याने पाठपुरावा सुरू होता. आयुक्त विनय कुमार चौबे तसेच तत्कालीन पोलीस आयुक्तांनीही वरिष्ठ पातळीवर प्रयत्न केले.

### विनय कुमार चौबे यांचे अथक प्रयत्न

पोलिस आयुक्त चौबे यांनी प्रस्ताव सादर करत मागणी लावून धरली. त्यामुळे श्वान पथक, देहू येथे पोलिसांचे विश्रामगृह, आयुक्तालय प्रशासकीय इमारतीसाठी मोशी येथे नऊ एकर जागा, पोलिस अधिकारी निवासस्थानासाठी कस्पटेवस्ती येथे १५ एकर जागा,

तसेच पोलिस मुख्यालयासाठीही ५० एकर जागा मिळाली. पोलिस आयुक्त चौबे यांच्या विशेष प्रयत्नांना यश आल्याचे यावरून दिसून येते.

### हे साकारणार मुख्यालयाच्या जागेत

- पोलिस भरती, परेड मैदान
- मुख्यालय इमारत
- पोलिस रुग्णालय
- पोलिस पाल्यांसह इतरांसाठी शाळा
- पोलिस शस्त्रागार
- श्वान पथक
- बॉम्ब शोधक नाशक पथक
- जलद प्रतिसाद पथक
- मोटार परिवहन विभाग
- अंतर्गत 'फायर रेंज'
- पोलिस उपायुक्त मुख्यालय कार्यालय
- बहुउद्देशिय सभागृह
- बंदोबस्तावरील पोलिसांचे विश्रामस्थान
- इतर अनुषंगिक कार्यालये

## अझीम प्रेमजी विद्यापीठात डिप्लोमा प्रवेश सुरू

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** अझीम प्रेमजी विद्यापीठ, बेंगळूरूने पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन एज्युकेशन - एज्युकेशनल असेसमेंट प्रोग्रामसाठी प्रवेश सुरू केले आहेत. हा एक वर्षाचा डिप्लोमा असून,मूल्यमापनाच्या क्षेत्रात सिद्धांत आणि सराव यांचे संतुलित मिश्रण आहे. हे ऑनलाइन आणि ऑन-कॅम्पस असे एकत्र करून, मिश्रित मोडमध्ये हा अभ्यासक्रम ऑफर केला जाईल.

मूल्यमापनाच्या संस्कृतीत सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी आवश्यक असलेले ज्ञान, कौशल्ये आणि स्वभाव प्रदान करून शिक्षक, शैक्षणिक कार्यकर्ते आणि शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या इतर व्यावसायिकांसह प्रमुख भागधारकांमध्ये क्षमता निर्माण करणे हा कार्यक्रमाचा उद्देश आहे.

हा कार्यक्रम शक्यतो किमान दोन वर्षे शिक्षणात काम करणाऱ्या व्यावसायिकांसाठी डिझाइन केला आहे.

## » Selected




## बिलासाठी डांबून ठेवलेल्या रुग्णाची अखेर सुटका!

**थेरगाव :** बिल भरले नाही म्हणून थेरगाव मधील एका खासगी हॉस्पिटलने रुग्णाला डांबून ठेवल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. पीडित रुग्णाच्या नातेवाईकांनी संभाजी ब्रिगेडचे शहराध्यक्ष सतीश काळे यांच्याकडे धाव घेतली. यावेळी रुग्णालय प्रशासनाला संभाजी ब्रिगेडने आंदोलनाचा इशारा दिल्यानंतर तब्बल २४ तासांनी या रुग्णाची हॉस्पिटलमधून रुग्णाची सुटका करण्यात आली. याबाबत सविस्तर वृत्त असे की,एका व्यक्तीच्या छातीत दुखू लागल्यामुळे त्याला त्याच्या नातेवाईकांनी थेरगाव मधील आदित्य बिर्ला हॉस्पिटलमध्ये मंगळवारी ॲडमिट केले होते. हॉस्पिटल प्रशासनाने सांगितल्याप्रमाणे पेशंटच्या नातेवाईकांनी एक लाख रू.जमा केले. तद्नंतर पेशंटची एनजीओप्लास्टी करण्यात आली. एनजीओप्लास्टी झाल्याच्या दुसऱ्याच दिवसानंतर हॉस्पिटलने रुग्णाच्या नातेवाईकांना पेशंटचे बिल दोन लाख ऐंशी हजार रुपये भरण्याचे सांगितले.त्यानंतर रुग्णाच्या नातेवाईकांनी पन्नास हजार रुपये भरले व शासनाच्या १०% आर्थिक दुर्बल घटकातून उर्वरित रक्कम माफ करुन पेशंटला सोडण्याची विनंती केली.परंतु हॉस्पिटलने पैसे भरल्याशिवाय पेशंटला सोडताच येणार नसल्याचे सांगितले. यासंदर्भात पेशंटचे नातेवाईक हे शहरातील विविध नगरसेवक तसेच आमदार खासदार यांना घडलेली परिस्थिती सांगत सहकार्य करण्याची विनंती करत होते. परंतु कुठेही मदत न मिळाल्याने अखेर रुग्णाच्या नातेवाईकांनी शहरातील संभाजी ब्रिगेडचे शहराध्यक्ष सतीश काळे यांना संपर्क साधत घडलेली संपूर्ण परिस्थिती सांगितली. नंतर संभाजी ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांनी आदित्य बिर्ला हॉस्पिटल येथे जात पेशंटला डिस्चार्ज देण्याची विनंती केली परंतु हॉस्पिटलच्या व्यवस्थापकांनी संभाजी ब्रिगेडच्या मागणीकडे दुर्लक्ष केले होते.


बंद बोली लिलावाची सूचना – कचरा आणि आयटी स्क्रॅप
लार्सन ॲंड टुब्रो लिमिटेड, तळेगाव, पुणे
- वेबसाइट -
www.auctionindia.com
लिलावाची तारीख
16-ऑक्टो-2024



### जाहीर नोटीस

गाव मौजे कोरेगाव भिवर, ता-दौंड, जि-पुणे येथील श्री. बापु गेनुभाऊ अवचिते व इतर यांनी त्यांची गट नं-१९४/२ मधील ३ हे. ६० आर शेतजमीन अगोटा वर्ग २ असल्याने आमचे अशिल श्री मोहन बळवंत दुबे व इतर यांना रजिस्टर्ड साठे खताद्वारे दिलेली होती व आहे. असे असताना श्री. बापु गेनुभाऊ अवचिते व इतर विक्री द्वारे हेसदर जमीन मिळकतीवर त्रयस्थ इसमाचा हक्क अधिकार निर्माण करू पाहत आहेत.

तरी सदर शेतजमीन मिळकतीबाबत कोणीही कसल्याही प्रकारे गहाण, दान, लीज, खरेदी, विक्री असा व्यवहार केल्यास सदर व्यवहार हा आमचे अशीलांच्या हिश्यावर बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसवणुक होऊ नये याकरीता सदरची नोटीस दिली आहे. येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.

दौंड, दि.: १०.१०.२०२४
सही/-
**ॲड. परिश बाबुराव रुपनवर (पाटील)**
रा. बारामती, ता. बारामती, जि. पुणे, मो.: ८२०८९५१३५२



### जाहीर सूचना

आम्ही **मे. गिनी कन्स्ट्रक्शन प्रायवेट लिमिटेड** सर्वसाधारण जनतेस कळवू इच्छितो की महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागाने आमच्या **सर्वे नं. १६/२/२/१,** येवलेवाडी, तालुका. हवेली, पुणे, महाराष्ट्र येथिल गिनी आरिया प्रकल्पाला दिनांक **९ ऑक्टोबर २०२४ रोजी** पत्र क्रमांक **EC24B038MH110541.** अन्वेय पर्यावरणाच्या दृष्टीकोनातून विस्तारित मान्यता दिली आहे सदर मान्यता पत्राची प्रत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कार्यालयामध्ये तसेच पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या http://parivesh.nic.in/संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

ठिकाण : पुणे
दिनांक : १२/१०/२०२४
**मे. गिनी कन्स्ट्रक्शन प्रायवेट लिमिटेड**



### PUBLIC CAUTION NOTICE

Know all men that my client **Mr. Rajendra Babasaheb Chavan** is owner of the property described in the scheduled written herein below. The Original Agreement to Sale dated 22/04/1993 registered in the office of Sub Registrar Haveli No. 4 at Sr. No. 1954/1993 is misplaced. Hereinafter referred to as "said Document". That my client has taken best effort to search the said Document. In spite of the same the said Document is not traceable. By the way of abundant caution my client has logged a Police complaint Online with Kothrud, Pune on 01/10/2024 having "Lost Report No: 140819-2024".

By this notice the public at large is made aware of the above facts. Any person dealing in respect of the said Property or on basis of the said Document shall be doing so at his/their own costs, consequences and risks. Such person/s shall not be entitled to any right, interest or title in the said Property. Hence this Public Caution Notice. If any person has possession or found the said document, then should inform about the same or his right on the same, only if informed **within 8 days.** If no communication is received within 8 days, it will be presumed that no one has found the said document or no one has claim over the said property docs and my client will proceed for mortgage of the said property.

**SCHEDULE OF PROPERTY**

All that piece and parcel **of Flat No. 10, situated on First Floor,** an area admeasuring 30.94 Sq. Mtrs. i.e. 333 Sq. Fts Built up (which is inclusive of the area of balconies), in the Society known **"Shankaranagari Co-Op Housing Society Ltd.", constructed on the land bearing Survey No. 85, Hissa No. 1, Corresponding CTS No. 831, situated at revenue Village Kothrud, Taluka Haveli, District Pune, within the local limits of Pune Municipal Corporation and also within the jurisdiction of the Sub-Registrar Haveli, Pune.**

**Advocate. Abhijit Bharat Borole**
Date : 11/10/2024
Place : Pune
Add: Office No 3, Yojana Complex, Ramanbaug Chowk, 502 Narayan Peth, Pune 411 030. **Mob: 8007799699**


राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स रा

### मंत्री, आमदारांची मर्जी सांभाळण्यासाठी

## आयुक्तांनी निविदा प्रक्रियेच्या अटी शर्ती बदलल्या

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महापालिकेमध्ये निविदा प्रक्रिया राबवताना केंद्रीय दक्षता आयोगाच्या मार्गदर्शक तत्वांचा भंग करून ठराविक ठेकेदारांना फायदा मिळवून दिला जात आहे. या ठेकेदार कंपन्या राजकीय पदाधिकाऱ्यांशी संबंधित असून, यांच्या दबावाखालीच आयुक्त शेखर सिंह या निविदा प्रक्रियेला मंजुरी देत आहेत. रुग्णालय, शाळा तसेच प्रशासकीय इमारतींसाठी लागणारे सुरक्षा रक्षक आणि ट्राफिक वॉर्डन यासाठी लागणाऱ्या मनुष्यबळ पुरविण्याच्या निविदा अत्यंत चुकीच्या पद्धतीने काढलेल्या आहेत. यातून मोजक्या ठेकेदारांचा फायदा होणार आहे. त्यामुळे अशा निविदा रद्दबातल करून जाचक अटी शर्ती कमी कराव्यात अशी मागणी महाविकास आघाडीच्या वतीने केली. दरम्यान यावेळी महाविकास आघाडीच्या वतीने मंत्री, स्थानिक आमदार तसेच महापालिकेचे अधिकारी आणि ठेकेदारांवर देखील गंभीर आरोप करण्यात आले आहेत. याबाबत माविकास आघाडीच्या शिष्टमंडळाने आयुक्त शेखर सिंह यांना निवेदन दिले. यावेळी शिवसेना उबाठा गटाच्या पुणे जिल्हा संघटिका सुलभा उबाळे, माजी स्थायी समिती अध्यक्ष अजित गव्हाणे, माजी नगरसेवक विनायक रणसुभे, धनंजय भालेकर, रवी लांडगे, भोसरी विधानसभा प्रचार प्रमुख धनंजय आल्हाट, युवती सेना प्रमुख प्रतिक्षा घुले, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते मानव कांबळे, मारुती भापकर आदी उपस्थित होते.



## नवरात्रौत्सव...

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**पिंपळे सौदागर :** राजमाता जिजाऊ उद्यानात उन्नती संस्थेतर्फे आयोजित चार दिवसीय 'दांडिया ग्रुप डान्स' स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभ आणि समारोप संपन्न झाला.

### उन्नती सोशल फाउंडेशनच्या

## नवरात्र 'दांडिया डान्स' स्पर्धेचा समारोप

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपळे सौदागर :** नवरात्र उत्सवाच्या निमित्ताने दांडिया ग्रुप डान्स स्पर्धेच्या माध्यमातून सांस्कृतिक कार्यक्रमांना हक्काच व्यासपीठ प्रदान करण्याचे कार्य पिंपळे सौदागरमधील उन्नती सोशल फाउंडेशन मोठ्या उत्साहात पार पाडीत असते. परिसरातील नागरिकांना एकत्र आणत, त्यांच्यात भाईचारा प्रस्तापित करणारा हा त्यांचा उपक्रम अगदी स्तुत्य आहे", असं प्रतिपादन पिंपरी चिंचवड शहर भाजपचे शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी केलं.

येथील राजमाता जिजाऊ उद्यानात उन्नती संस्थेतर्फे आयोजित चार दिवसीय 'दांडिया ग्रुप डान्स' स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभ आणि समारोप भाजप शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या हस्ते झाला. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी उन्नती सोशल फाऊंडेशनच्या अध्यक्षा डॉ. कुंदाताई संजय भिसे, उद्योजक संजयशेठ भिसे, पवना सहकारी बँकेचे संचालक जयनाथ काटे, पी. के. स्कुलचे संस्थापक जग्गनाथ काटे, गुलाब मेटे, शंकर चोंधे, राजू देवतारे, राजेंद्र जैस्वाल, सुभाष पवार, उन्नती सखी मंचच्या उपाध्यक्षा रश्मी मोरे, उन्नती सोशल फाऊंडेशन, विठाई वाचनालय, जेष्ठ नागरिक संघ यांचे सर्व सदस्य, यासह पिंपळे सौदागरमधील नागरिक आणि स्पर्धक मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी विजेत्या संघांना रोख रक्कम आणि ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले.

## फेरीवाला समितीवर आमचे ८ उमेदवार निवडून द्या –बाबा कांबळे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महापालिकेमध्ये शहर फेरीवाला समितीसाठी आठ सदस्य निवडण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. या प्रक्रियेमध्ये शहरातील नोंदणीकृत फेरीवाले यांना प्रत्येकी आठ मतदान करण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे. या अधिकाराचा वापर करून संघटनेचे ८ उमेदवार बहुमताने निवडून द्या, असे आवाहन टपरी, पथारी, हातगाडी पंचायतचे अध्यक्ष कष्टकऱ्यांचे नेते बाबा कांबळे यांनी पिंपरी चिंचवड शहरातील फेरीवाल्यांना केले. तसेच संघटनेशी गद्दारी करणाऱ्यांना धडा शिकवा, असेही बाबा कांबळे म्हणाले. निवडणुकीच्या निमित्ताने संघटनेने जाहीरनामा प्रसिद्ध केला. यावेळी बाबा कांबळे बोलत होतो. पिंपरी चिंचवड शहरातील टपरी, पथारी, हातगाडी धारकांचे प्रश्न सोडण्यासाठी महत्त्वाचे प्रश्न घेऊन काम करू. आधुनिक पद्धतीने हॅकर्स झोन निर्माण झाले पाहिजे, सामाजिक सुरक्षा योजना, म्हातारपणी पेन्शन अतिक्रमण कारवाईमुक्त फेरीवाले विविध



प्रश्नांचे आश्वासन देत जाहीरनामा प्रकाशित करण्यात आला. 1) बळीराम भगवानराव काकडे, (सर्वसाधारण गट), 2) दामोदर विठोबा मांजरे, (सर्वसाधारण गट), 3) अशा बाबासाहेब कांबळे, (सर्वसाधारण महिला गट), 4) रमेश साधू शिंदे, (अनुसूचित जाती गट), 5) शुभांगी रवींद्र मोरे, (अनुसूचित जमाती गट), 6) ममता अमित मानूरकर, इ(तर मागासवर्ग गट), 7) कलीम सल्लाउद्दीन शेख, (अल्पसंख्याक गट), 8) वासंती मदन जाधव, (विकलांग गट) या उमेदवारांनी संघटनेने प्रसिद्ध केलेला जाहीरनामा पूर्ण करण्याचे आश्वासन यावेळी दिले.

यावेळी, प्रदेश सचिव प्रकाश यशवंते, पंचायत कार्याध्यक्ष इस्माईल बागवान, उपाध्यक्ष अनिल गाडे, सरचिटणीस मधुरा डांगे, शहर सचिव शिवाजी कुडूक, महिला अध्यक्षा सरोजा कुचेकर, उपाध्यक्ष नाणी गजरमल, सामाजिक कार्यकर्त्या कल्पना गाडगे, महाराष्ट्र रिक्षा पंचायत जिल्हाध्यक्ष लक्ष्मण शेलार, उपाध्यक्ष रवींद्र लंके, प्रवक्ते अविनाश जोगदंड, आदी उपस्थित होते.

आपले पॅनेल निवडून आल्यास टपरी, पथारी, हातगाडी धारकांचे प्रश्न सोडवू, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत 2005 पासून आपण काम करत असून 2007 साले देशातला पहिला कायदा आपण मंजूर करून घेतला. देशामध्ये कुठेही कायदा नव्हता यावेळी आपण हा कायदा मंजूर करून घेतला. ज्या संघटनेने कायदा मंजूर केला लायसन्स मिळून दिले फेरीवाल्यांना मताचा अधिकार मिळवून दिला त्या संघटनेंना मतदान करा अशा आव्हान देखील यावेळी बाबा कांबळे यांनी केले.

## विजयादशमीनिमित्त साई मंदिरात विविध कार्यक्रम

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** आज साजऱ्या होणाऱ्या विजयादशमी आणि श्री साईबाबा यांच्या पुण्यतिथी निमित्त पुणे - आळंदी रोड, वडमुख वाडी येथील साई मंदिरामध्ये रविवार पर्यंत विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती श्री साईबाबा मंदिर, वडमुखवाडी, आळंदी रोड पुणेचे विश्वस्त, अध्यक्ष सुभाष नेलगे यांनी प्रसिद्धीस दिली आहे. शनिवारी (दि.१२) विजयादशमीच्या निमित्त पहाटे पाच वाजता श्रीं ची काकड आरती, सनईवादन, मंगल स्नान, पारायण सांगता सोहळा, रुद्राभिषेक, भिक्षा झोळी, भजन कार्यक्रम यानंतर दुपारी १२ वाजता प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत माध्यान्ह आरती होणार आहे. आरती नंतर दीपज्योत व श्रीं चे नामस्मरण, श्रीं ची प्रार्थना, नंतर ४:३० वाजता सिमोल्लंघन व मिरवणूक, श्रीं ची पालखी, धुपारती, भजन कार्यक्रम, धुपारती व श्री हरिजागर रात्री ११ वाजता असे कार्यक्रम होणार आहेत. शनिवारी मुख्य दिवशी देवस्थान रात्रभर दर्शनाकरिता खुले राहील.

### पोस्ट ग्राहकांना आळंदीकडे जाण्याची आवश्यकता नाही

## चऱ्होलीच्या शहरीकरणावर पोस्ट विभागाचा 'स्टॅम्प'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** चऱ्होली बुद्रुक येथे पोस्ट डाक सुविधा सक्षम करण्यासाठी डाक विभागाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. या भागातील पोस्ट शाखेचा पूर्वी ग्रामीण पिन कोड होता. त्यामध्ये बदल करुन नवीन शहरी पिनकोड कार्यान्वयीत केला आहे. त्यामुळे पोस्ट सेवांमध्ये वाढ होणार असून, चऱ्होली आणि परिसरातील पोस्ट ग्राहकांना फायदा होणार आहे. विशेष म्हणजे, आता चऱ्होलीच्या शहरीकरणावर पोस्ट विभागाने शिक्कामोर्तब केले आहे.



पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये १९९७ चऱ्होली बुद्रुकचा समावेश करण्यात आला. त्यानंतर २०१७ पर्यंत या गावात पायाभूत सोयी-सुविधा अपक्षेप्रमाणे विकसित झाल्या नाहीत. २०१७ नंतर झालेल्या विविध विकास प्रकल्प आणि मूलभूत सोयी-सुविधांमुळे चिखली-मोशी-चऱ्होली रेसिडेन्सिअल कॉरिडॉर विकसित झाला.

> महानगरपालिका हद्दीत समाविष्ट झालेल्या गावांमध्ये विकासाला चालना देतानाच शासकीय सोयी-सुविधा उपलब्ध करण्याबाबत आम्ही प्रयत्नशील आहोत. सर्वसामान्य नागरिकांना भारतीय पोस्ट विभागाच्या विविध योजनांचा लाभ व्हावा. यासह पोस्ट ग्राहकांचे आर्थिक व्यवहार सुलभ व्हावेत. या करिता चऱ्होली आणि परिसरात पोस्ट विभागाच्या कार्यालयात उप डाकघर सुरू व्हावे. या करिता मागणी केली होती. त्याला भारतीय पोस्ट विभागाकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे. सदर सेवा सक्षमपणे राबवावी आणि अधिकाधिक नागरिकांना त्याला लाभ व्हावा, अशी अपेक्षा आहे.
> **- महेश लांडगे, आमदार,** भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

आमदार महेश लांडगे यांनी समाविष्ट गावांमध्ये महानगरपालिका आणि राज्य सरकारच्या माध्यमातून विकासाला चालना दिली. त्यामुळे लोकवस्ती मोठ्या प्रमाणात वाढली असून, विविध गृहप्रकल्प विकसित झाले आहेत.

#रा

# मार्केट यार्डातील फूलबाजारात शुक्रवारी झेंडूची तब्बल २०० टन आवक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** साडेतीन मुहूर्तांपैकी एक असणाऱ्या दसऱ्याच्या स्वागताला झेंडूची मोठी मागणी असते. त्या पार्श्वभूमीवर मार्केट यार्डातील फूलबाजारात शुक्रवारी झेंडूची तब्बल २०० टन आवक झाली. झेंडूला दर्जानुसार ८० ते १२० रुपये भाव मिळाला. शेवंती, ॲस्टर, गुलछडी, जर्बेरा, गुलाब यांसह इतर फुलांनाही मोठ्या प्रमाणात मागणी होती.

> दसऱ्यानिमित्त फूलबाजारात झेंडू, शेवंती, गुलाब, अष्टर आणि इतर फुलांची आवक वाढली आहे. शिवनेरी रस्ता, ट्रक पार्किंग आणि गूळभुसार आवारात ५०० ते ६०० पिकअपमध्ये शेतकऱ्यांनी फुले विक्री केली. यंदा फुलांना चांगला भाव मिळाला.
>
> - **दिलीप काळभोर**, सभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती, पुणे

पुणेकरांनी फुले खरेदीसाठी शुक्रवारी मार्केट यार्ड, महात्मा फुले मंडईमध्ये सकाळपासूनच मोठी गर्दी केली होती. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा सर्व फुलांना चांगला भाव मिळाल्याने शेतकरी समाधानी होते. दसऱ्याला सर्वाधिक मागणी झेंडू, गुलछडी, शेवंती, अष्टर या फुलांना आहे. मार्केट यार्डातील फूलबाजारात दोन दिवसांपासून झेंडूची आवक मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. दोन दिवसांत झेंडूची तब्बल ३०० टन आवक झाली.

फूलबाजारात पुणे, सोलापूर, धाराशीव, बीड, हिंगोली परिसरातील शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर झेंडू विक्रीस आणला होता. भावात घट झाली.

## शहरात दुय्यम निबंधक कार्यालयांसाठी निर्णय

# नव्याने २३ कार्यालयांची गरज

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शहरी भागात दुय्यम निबंधक कार्यालयांसाठी राज्य सरकारने नव्याने निश्चित केलेल्या निकषांनुसार पुणे व पिंपरी-चिंचवड मिळून ५० कार्यालयांची आवश्यकता आहे.

**» दृष्टिक्षेप**

सध्या २७ कार्यालये असून नव्याने २३ कार्यालयांची गरज भासत असल्याचे निकषांवरून समोर आले आहे.




**दृष्टिक्षेपात...**
- राज्यातील दुय्यम निबंधक कार्यालय : ५२०
- राज्यात दरवर्षी होणारे दस्त : २३,००,०००
- पुणे, पिंपरी-चिंचवडमधील दुय्यम निबंधक कार्यालय : २७
- दोन्ही शहरात दरवर्षी नोंदणी होणारे दस्त : ६,००,०००
- दुय्यम निबंधक कार्यालयात नोंदणी होणारे दस्तांचे एकूण प्रकार : १७

**सद्यःस्थिती...**
- १. राज्यात सध्या ५२० दुय्यम निबंधक कार्यालये
- २. राज्यभरात दरवर्षी सुमारे २३ लाखांहून अधिक दस्तनोंदणी

राज्यात वाढते नागरीकरण आणि औद्योगिकीकरणामुळे जमीन, सदनिका, दुकाने आदी स्थावर मिळकतींच्या खरेदी-विक्री व्यवहारांत मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. त्यामुळे दुय्यम निबंधक कार्यालयांमध्ये दस्तनोंदणीसाठी गर्दी होते. या पार्श्वभूमीवर राज्यात नवीन दुय्यम निबंधक कार्यालये स्थापन करण्याची मागणी नागरिक व लोकप्रतिनिधींकडून होत होती. त्यामुळे राज्य शासनाने दस्तनोंदणीचे मानके नव्याने निश्चित केली आहेत. त्यानुसार शहरी भागात एका दुय्यम निबंधक कार्यालयामध्ये वार्षिक १२ हजार दस्तसंख्या; तर ग्रामीण भागातील दुय्यम निबंधक कार्यालयामध्ये वार्षिक आठ हजार एवढी दस्तसंख्या निश्चित केली आहे.

पुणे आणि पिंपरी-चिंचवड मिळून सध्या २७ दुय्यम निबंधक कार्यालये आहेत. ही सर्व कार्यालये मिळून दरवर्षी सहा लाखांहून अधिक विविध प्रकारांची दस्तनोंदणी होते. हे लक्षात घेतल्यानंतर एका दुय्यम निबंधक कार्यालयात दरवर्षी सरासरी २० ते २२ हजार दस्तनोंदणीचे प्रकरणे होतात. दोन्ही शहरांत मोठ्या प्रमाणावर खरेदी-विक्रीसह विविध प्रकाराचे दस्त करण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढते आहे. अपुरा कर्मचारी वर्ग आणि दुय्यम निबंधक कार्यालयांच्या कमी संख्येमुळे यंत्रणेवर ताण येत आहे.

शासनाने नव्याने निश्चित केलेल्या निकषांनुसार पुणे व पिंपरी-चिंचवडमध्ये सध्या असलेली कार्यालयांची संख्या सोडून नवीन २३ दुय्यम निबंधक कार्यालयांची आवश्यकता आहे, असे नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागातील अधिकाऱ्यांनी 'सकाळ'शी बोलताना सांगितले. नोंदणी व मुद्रांक विभाग शासनास मोठ्या प्रमाणात महसूल मिळवून देणारा दुसऱ्या क्रमांकाचा विभाग आहे. राज्यात सध्या ५२० दुय्यम निबंधक कार्यालये आहेत. मागील काही वर्षांमध्ये विकसनाचे चक्र केवळ मुंबई, ठाणे, पुणे शहरांपुरते मर्यादित न राहता राज्यातील सर्वच भागांत गतिमान झाले आहे. त्यामुळे स्थावर मिळकतीच्या व्यवहारांची संख्या राज्यातील सर्वच भागात कमी-जास्त प्रमाणात वाढत आहे. राज्यभरात दरवर्षी सुमारे २३ लाखांहून अधिक दस्तांची नोंदणी होते. परिणामी वाढत्या दस्त संख्येमुळे काही कार्यालयांत क्षमतेपेक्षा जास्त संख्येने दस्तनोंदणी करावी लागत आहे. त्याचा त्रास प्रशासकीय यंत्रणेबरोबरच नागरिकांना सहन करावा लागत आहे. त्यामुळे नवीन कार्यालये निर्मितीची मागणी गेल्या अनेक वर्षांपासून होती. त्या अनुषंगाने राज्यातील विविध जिल्ह्यांतील दुय्यम निबंधक कार्यालयांतील कामाचा आढावा घेऊन नागरिकांना योग्य सेवा मिळणे सोईस्कर व्हावे, यासाठी राज्य सरकारने निर्णय घेतला आहे.

## अवतीभवती
CITY UPDATE

### आता वडगाव शेरीचा उमेदवार सर्वेक्षणानंतर निश्चित होणार

**पुणे :** उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्या उपस्थितीत झालेल्या गुप्त बैठकीत वडगावशेरी वर मध्यममार्ग काढण्यात आला आहे. त्यामुळे आता वडगाव शेरीची उमेदवारी ही सर्वेक्षणानंतर निश्चित होणार असल्याने विद्यमान आमदार सुनील टिंगरे आणि माजी आमदार जगदीश मुळीक यांचे भवितव्य सर्वेक्षणावर अवलंबून आहे. महायुतीमध्ये वडगाव शेरी विधानसभा मतदारसंघ हा कळीचा झाला असल्याने या मतदारसंघातून कोणाला मतदारांची पसंती मिळू शकते, याचा अंदाज घेण्यासाठी महायुतीकडून पुन्हा सर्वेक्षण केले जाणार आहे. वडगाव शेरी मतदारसंघात राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाचे सुनील टिंगरे विद्यमान आमदार आहेत. महायुतीच्या नेत्यांमध्ये झालेल्या प्राथमिक चर्चेमध्ये ज्या मतदारसंघात महायुतीमध्ये सहभागी असलेल्या पक्षाचा आमदार असेल ती जागा संबंधित पक्षाला सोडली जाणार आहे. त्यानुसार या मतदारसंघांमधील जागेवर टिंगरे यांनाच संधी मिळेल, अशी शक्यता आहे. या मतदारसंघातून भाजपचे माजी आमदार आणि माजी शहराध्यक्ष जगदीश मुळीक निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक आहेत. त्यासाठी त्यांनी जोरदार प्रयत्न सुरू केले आहेत. याच मतदारसंघातून निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक असलेले माजी आमदार बापू पठारे यांनी आपल्या मुलासह सहा ते सात माजी नगरसेवकांसह गेल्या महिन्यात राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षात प्रवेश केला आहे. काही वर्षांपूर्वी पठारे या मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेसच्या तिकिटावर आमदार झाले होते. मध्यंतरी त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला होता.

### वनविभाग व पुणे विद्यापीठमध्ये सामंजस्य करार

**पुणे :** वनविभाग आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्यात बुधवारी सामंजस्य करार करण्यात आला. या वेळी वनविभागाकडून अतिरिक्त प्रधान मुख्य वनसंरक्षक (संशोधन, शिक्षण आणि प्रशिक्षण) एम. श्रीनिवास रेड्डी आणि विद्यापीठातर्फे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी उपस्थित होते. हा सामंजस्य करार एम. एस्सी.पुरस्कृत करण्यासाठी विद्यापीठाबरोबर सहयोग म्हणून करण्यात आला आहे. यामुळे महाराष्ट्रातील चंद्रपूर फॉरेस्ट अकादमी आणि कुंडल फॉरेस्ट अकादमी येथे १८ महिन्यांचा इंडक्शन प्रशिक्षण कार्यक्रम घेत असलेल्या रेंज फॉरेस्ट ऑफिसर्सना पदवी /पीजी डिप्लोमा मिळणार आहे. या सामंजस्य कराराची सुरुवातीची मुदत स्वाक्षरी केल्याच्या तारखेपासून पाच वर्षांपर्यंत वाढेल, जी रेंज फॉरेस्ट ऑफिसर्ससाठी शिक्षण आणि प्रशिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी उपयोगी पडणार आहे. हे सहकार्य चंद्रपूर फॉरेस्ट ॲकॅडमी ऑफ ॲडमिनिस्ट्रेशन, डेव्हलपमेंट आणि मॅनेजमेंट आणि कुंडल फॉरेस्ट अकादमी या दोन प्रमुख वन अकादमींमध्ये रेंज फॉरेस्ट ऑफिसर्सच्या शैक्षणिक आणि व्यावहारिक प्रशिक्षणावर केंद्रित आहे. सामंजस्य कराराअंतर्गत या अकादमी एम.एस्सी. आणि पीजी डिप्लोमा अभ्यासक्रम एनईपी २०२० मार्गदर्शक तत्त्वांच्या अनुषंगाने वन व्यवस्थापन आणि संवर्धन प्रयत्नांच्या गरजेनुसार तयार केले आहेत. या उपक्रमाचा उद्देश वनसंरक्षणातील कुशल मनुष्यबळाची कमतरता दूर करणे पर्यावरण शास्त्रातील प्रगत ज्ञानाने सुसज्ज करणे हा आहे.

# ७००० कन्यांचे महाकन्यका पूजन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून आणि उत्सवाच्या निमित्ताने उपासनेचे फळ सर्वांना लाभावे यासाठी नामदार चंद्रकांतदादा पाटील यांच्या पुढाकारातून कोथरुडमध्ये भव्य दिव्य अशा महा कन्यापूजन सोहळ्याचे आयोजन शुक्रवारी (दि. ११) करण्यात आले होते. राज्यात प्रथमच एवढ्या मोठ्या प्रमाणातील कन्यापूजन सोहळ्याने उपस्थित भारावून गेले.

या सोहळ्यात नामदार चंद्रकांतदादा पाटील यांनी स्वत: मंत्रोच्चाराच्या घोषात, आध्यात्मिक पद्धतीने सात मुलींचे पूजन केले.यावेळी सहभागी मुलींचे डोळे पाणावून गेले. चंद्रकांतदादा पाटील यांच्या या उपक्रमाचे उपस्थित मुलींनी व त्यांच्या पालकांनी मोठे कौतुक केले.

यावेळी भाजपा कोथरूड दक्षिण अध्यक्ष डॉ संदीप बुटाला, प्रदेश प्रवक्ते संदीप खर्डेकर, पुणे शहर भाजप सरचिटणीस पुनीत जोशी, नगरसेवक दीपक पोटे, सुशील मेंगडे, नवनाथ जाधव, दिनेश माथवड, कुलदीप सावळेकर, प्रशांत हरसुले, सरचिटणीस अनुराधा एडके, ओबीसी आघाडी अध्यक्ष राज तांबोळी, गिरीश खत्री, दीपक पवार, बाळासाहेब टेमकर, नगरसेविका मंजुश्री खर्डेकर, यांच्या सह भाजपचे सर्व पदाधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शुभारंभ लॉन्स येथे सायंकाळी ४.३० ते ७ या वेळेत हा नयनरम्य सोहळा संपन्न झाला.

धार्मिक श्रद्धांनुसार, नवरात्रोत्सव काळातील नवमी तिथीला विशेष महत्त्व आहे. या दिवशी दुर्गा देवीच्या नऊ रूपांची मुलींच्या रूपात पूजा केली जाते. या उपासनेने दुर्गा मातेचा आशीर्वाद प्राप्त होतो आणि भक्तांच्या जीवनात सुख-समृद्धी येते, अशी श्रद्धा आहे. यासोबतच कन्यापूजना शिवाय नवरात्रीची उपासना यशस्वी होऊ शकत नाही, अशी देखील धारणा आहे. यानुसार या कन्यापूजन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. नागरिकांनी या अद्भूत सोहळ्यात हजारोंच्या संख्येने सहभाग नोंदवला. सर्व पुणे शहरातून या सोहळ्यासाठी मुलींनी व त्यांच्या पालकांनी हजेरी लावली.

ना. चंद्रकांत पाटील यांनी, दरवर्षी १ लाख मुलींना स्वरक्षणाचे प्रशिक्षण द्यावे त्यासाठी सर्वतोपरी मदत केली जाईल असे आश्वासन उपस्थित संस्थाना दिले.

## "नारीशक्ती पुरस्कार"

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



**पुणे :** वैद्यकीय क्षेत्रात उत्कृष्ट योगदान देणाऱ्या डॉ राजेश्वरी संजय व्होरा यांना शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्ष पुणे कॅन्टोन्मेंट मतदार संघाच्यावतीने शहरप्रमुख संजय मोरे यांचे हस्ते प्रदान करण्यात आला.

## ७८ कायम महाविद्यालयांचा समावेश

# विनाअनुदानित महाविद्यालयांना अनुदानाची आस

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** राज्य शासनाने २४ नोव्हेंबर २००१ रोजी कायम विनाअनुदानित धोरण स्वीकारले. त्यानंतर मान्यता देण्यात आलेल्या एकाही महाविद्यालयाला अनुदान दिलेले नाही. कायम विनाअनुदानित धोरण स्वीकारण्यापूर्वी विनाअनुदानित महाविद्यालय म्हणून मान्यता असलेल्या महाविद्यालयांना अनुदान द्यावे, अशी मागणी शासनाकडे अनेकदा करण्यात आली आहे. राज्यातील कायम विनाअनुदानित धोरण लागू होण्यापूर्वी अस्तित्वात आलेल्या ७८ कायम विनाअनुदानित वरिष्ठ महाविद्यालयांना अनुदानाची आस लागली आहे. राज्य शासनाच्या वित्त विभागाकडे अनुदानाची फाइल गेल्या काही महिन्यांपासून धूळखात पडली आहे.वित्तमंत्री, उच्च व तंत्र शिक्षणमंत्री यांना अनुदानाचा निर्णय घेण्यासाठी मुहूर्तच सापडत नसल्याने ही अनुदान प्रक्रिया रखडली असून, तातडीने अनुदान मिळावे, यासाठी सहायक प्राध्यापकांनी आता पुन्हा बेमुदत उपोषण आंदोलन सुरू केले आहे.

> राज्यातील महायुती शासनाने ७८ महाविद्यालयांना १०० टक्के अनुदान लागू करून त्याची तात्काळ अंमलबजावणी करावी; अन्यथा आगामी विधानसभा निवडणुकीत सजग नागरिक म्हणून महायुतीला धडा शिकविण्यात येईल."
>
> — **डॉ. भाऊसाहेब झिरपे,** अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य कृती समिती

महाराष्ट्र राज्य कृती समितीच्या वतीने महाविद्यालयांमधील सहायक प्राध्यापकांनी अनेकदा तीव्र आंदोलनेही केली. मुंबई येथील आझाद मैदानावर दीड वर्ष धरणे आंदोलन सुरू होते. तरीही शासनाने निर्णय घेतला नाही. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार, उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकात पाटील यांनी केवळ आश्वासनाच्या पोकळ घोषणा केल्याचा आरोप सहायक प्राध्यापकांनी केला आहे.

अनुदानाबाबत लवकरात लवकर निर्णय घेण्याच्या मागणीसाठी गेल्या पाच दिवसांपासून उच्च शिक्षण संचालनालयासमोर बेमुदत उपोषण आंदोलन सुरू केले असून, त्यामध्ये शहाजी मरशिवणे, हनुमंत कुरे यांच्यासह अन्य प्राध्यापकांनी सहभाग घेतला आहे.

## महाराष्ट्र गो-सेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा यांना

# राज्यमंत्रीपदाचा दर्जा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महाराष्ट्र सरकार तर्फे नव्याने स्थापन करण्यात आलेल्या महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे अध्यक्षपदी शेखर मुंदडा यांची निवड करण्यात आली होती. त्यानंतर गोसेवा क्षेत्रात विविध प्रकारचे उल्लेखनीय कार्य व शासन निर्णय देखील झाले. नुकतेच, शेखर मुंदडा यांना राज्यमंत्री पदाचा दर्जा दिल्याचा शासन निर्णय काढण्यात आला आहे.

शेखर मुंदडा म्हणाले, दिवसेंदिवस देशी गाईच्या संख्येत मोठ्या प्रमाणात घट होत आहे. विसाव्या पशुगणनेमध्ये देशी गोवंशीय पशुधनाची संख्या २०.६९ टक्क्यांनी कमी झाली आहे. भारतीय उष्णकटिबंधीय हवामान टिकून राहण्याची क्षमता आणि रोगप्रतिकारशक्ती यामुळे देशी गोवंशीय पशुधनाचे जतन व संवर्धन करणे आवश्यक आहे. त्यामुळे देशी गोवंशीय संगोपन करणाऱ्या गोशाळेतील प्रत्येक देशी गोवंशसाठी प्रतिदिन पन्नास रुपये अनुदान शासनातर्फे देण्यात येणार आहे.

महाराष्ट्र राज्यात नोंदणीकृत ८२८ गोशाळा असून त्यामध्ये एक लाख २३ हजार ३८९ पशुधन आहे. यामधील देशी गोवंशाच्या पोषणासाठी प्रतिदिन पन्नास रुपये अनुदान देण्यात येणार आहे. गो सदन, पांजरपोळ व गोरक्षण संस्था यांसह एक वर्षाचा गोसंगोपनाचा अनुभव असलेल्या संस्थांना बळकट करण्यासाठी आर्थिक सहाय्य देण्यात येणार आहे.

या देशी गाईंची जबाबदारी देखील शासनाने घेतली असून नोंदणीकृत गोशाळांमधील प्रत्येक देशी गोवंशाला प्रतिदिन पन्नास रुपये पोषणासाठी दिले जाईल.

## RS NEWS DIGEST

### नांदेड सिटी पोलिस ठाणे कधी होणार?

**पुणे :** नांदेड सिटी पोलिस ठाणे कधी होणार, असा प्रश्न येथील नागरिकांना पडला आहे. कारण सिंहगड रस्त्यावरील खडकवासला, नांदेड, किरकटवाडी, नांदोशीसह सणसनगर आणि नांदेड सिटी टाऊनशिप या गावांचा ३० जून २०२१ रोजी महापालिकेत समावेश झाला. परिणामी या भागातील नागरीकरण झपाट्याने वाढत आहे. परंतु, ही गावे अद्याप ग्रामीण पोलिस दलात आहेत. पुणे शहर पोलिस आयुक्तालयात अद्याप समावेश झाला नाही.

खडकवासला, नांदेड, किरकटवाडी, नांदोशीसह सणसनगर आणि नांदेड सिटी टाऊनशिप असणारा परिसर सध्या हवेली पोलिस ठाण्याच्या अंतर्गत म्हणजे पुणे ग्रामीण पोलिस अधीक्षक यांच्या अंतर्गत आहे. हवेली पोलिस ठाण्याच्या हद्दीत सध्या खडकवासला, कोल्हेवाडी, किरकटवाडी, नांदेड, नांदोशी, सणसनगर, गोऱ्हे बुद्रुक, डोणजे, गोळेवाडी, पायगुडेवाडी, घेरा सिंहगड, खरमरी, सांबरेवाडी, थोपटेवाडी, आतकरवाडी, गोऱ्हे खुर्द, खानापूर, मणेरवाडी, मालखेड, वसवेवाडी, वरदाडे, खामगाव मावळ, मोगरवाडी, चांदेवाडी, सोनापूर, आंबी, मांडवी खुर्द, आगळंबे या गावांचा समावेश आहे. यातून खडकवासला, नांदेड, किरकटवाडी, नांदोशी, सणसनगर आणि नांदेड सिटी टाऊनशिप ही गावे वगळून नांदेड सिटी पोलिस ठाण्यात समाविष्ट होणार आहे. उर्वरित गावे हवेलीत राहतील.


दरम्यान, खेड, शिवापूर, श्रीरामनगर, गोगलवाडी, रहाटवडे, कल्याण, गाऊडदरा, आर्वी, सणसनगर, कोंढणपूर, अवसरेवाडी, मोरदरवाडी ही गावे हवेली तालुक्यातील आहे. काही वर्षांपूर्वी ही गावे हवेली पोलिस ठाण्यातून राजगड पोलिस ठाण्याला जोडली होती. आता ही गावे पुन्हा हवेली पोलिस ठाण्याला जोडण्याची मागणी होत आहे. खडकवासला धरणाच्या उत्तरेकडील बाजूची सर्व गावे पुणे शहर आयुक्तालयातील उत्तमनगर पोलिस ठाण्यात आहेत. परंतु, यापैकी तांत्रिकदृष्ट्या आगळंबे आणि मांडवी बुद्रुक अद्याप हवेली पोलिस ठाण्यात आहेत. प्रत्यक्षात ही गावे उत्तमनगर पोलिस ठाण्यामध्ये समाविष्ट असली पाहिजेत. नांदेड सिटी पोलिस ठाणे उभारण्यासाठीचा पहिला टप्पा जानेवारी २०२१ मध्ये झाला. या वेळी तत्कालीन शहर पोलिस आयुक्त अमिताभ गुप्ता यांनी जागेची पाहणी केली होती. त्यानुसार नांदेड सिटी पोलिस ठाणे लवकरच सुरू होण्याची शक्यता आहे.

## पुणे आरटीओला चॉइस क्रमांकातून मिळणाऱ्या महसुलात

# यंदा तब्बल ११ कोटींची वाढ

**पुणे :** पुणे आरटीओला चॉइस क्रमांकातून मिळणाऱ्या महसुलात यंदा तब्बल 11 कोटींची वाढ झाल्याचे समोर आले आहे. 2022-23 या आर्थिक वर्षापेक्षा 2023-24 या आर्थिक वर्षात पुणेकरांनी सर्वाधिक चॉइस क्रमांक (पसंती क्रमांक) खरेदी केल्याचे समोर आले आहे.

वाहन खरेदी केले की आपल्या वाहनाला आवडीचा आणि व्हीव्हीआयपी क्रमांक हवा, अशी अनेक वाहनचालकांची इच्छा असते. त्यामुळे पुणे आरटीओतून व्हीव्हीआयपी, चॉइस क्रमांक घेण्याची ओढ वाढली आहे. त्यामुळे आर्थिक वर्षात आरटीओच्या महसुलात चांगलीच वाढ झाली आहे. सन 2022-23 (01 एप्रिल 2022 ते 31 मार्च 2023) या आर्थिक वर्षात आरटीओला 38 कोटी 19 लाख 65 हजार 495 रुपयांचा चॉइस क्रमांक विक्रीतून महसूल मिळाला होता. त्यानंतर सन 2023-24 (01 एप्रिल 2023 ते 31 एप्रिल 2024) या आर्थिक वर्षात 49 कोटी 82 लाख 84 हजार 738 रुपये इतका महसूल मिळाला आहे. यावरून 2023-24 या आर्थिक वर्षात आरटीओच्या वार्षिक महसुलात 11 कोटींनी वाढ झाली आहे.



### पाच महिन्यांत 19 कोटींचा महसूल

- सन 2024-25 या आर्थिक वर्षातील 01 एप्रिल 2024 ते 31 ऑगस्ट 2024 या पाच महिन्यांच्या कालावधीत पुणे आरटीओला 19 कोटी 19 लाख 17 हजार 377 रुपयांचा महसूल मिळाला आहे. यामुळे 2024-25 या आर्थिक वर्षात देखील चॉइस क्रमांकाच्या महसुलात चांगलीच वाढ होणार असल्याचे चित्र दिसत आहे.

### एका महिन्यात 6 कोटी 27 लाख प्राप्त

- चॉइस क्रमांक खरेदीला वाहनचालकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. अवघ्या एकाच महिन्यात म्हणजेच सप्टेंबर 2024 या महिन्यात आरटीओला 6 कोटी 27 लाख 52 हजार 087 रुपयांचा महसूल प्राप्त झाला आहे.

> पसंती क्रमांकाला सर्वाधिक मागणी असते. पुणेकरांनीही याप्रमाणेच कार्यालयातून चॉइस क्रमांक खरेदीवर भर दिल्याचे दिसत आहे. तसेच, पसंती क्रमांक विक्रीची ही सेवा देखील ऑनलाइनच व्हावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.
>
> **-स्वप्निल भोसले,** उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे

### चॉइस क्रमांकाची पावती ऑनलाइन करावी

- आरटीओतील अनेक सेवा या ऑनलाइन पद्धतीने सुरू आहेत. परंतु, पसंती क्रमांकासाठी नागरिकांना आरटीओ कार्यालयात हेलपाटे मारावे लागत आहेत. बँकांमध्ये डीडी मिळण्यासाठी तासन् तास वाट पाहणे आणि आरटीओ कार्यालयातही रांगेत उभे राहावे लागत आहे. त्यामुळे प्रगत महाराष्ट्रात पसंती क्रमांक ही सेवासुद्धा तत्काळ ऑनलाइन पद्धतीने सुरू करावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची मोठी घोषणा

# लाडक्या बहिणीची ओवाळणी वाढणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** महाराष्ट्र सरकारने सुरु केलेल्या मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचे दुसऱ्या टप्प्यातील पैसे महिलांच्या खात्यावर जमा होण्यास सुरुवात झाली आहे. गुरुवारी (दि. २९ ऑगस्ट) रोजी देखील अनेक महिलांच्या खात्यावर दोन हप्त्यांचे ३ हजार रुपये जमा झाले आहेत. या योजनेच्या माध्यमातून महिलांना दरमहा १५०० रुपयांची आर्थिक मदत देण्याची घोषणा शिंदे सरकारने केली आहे ही योजना जुलै महिन्यापासून लागू करण्यात आली आहे. दरम्यान, आता या योजनेच्या दुसऱ्या टप्प्यात महिलांच्या बँक खात्यावर पैसे येण्यास सुरुवात झाली आहे.

दरम्यान, अश्यातच राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लाडकी बहिण योजनेचे पैसे वाढवण्याबद्दल महत्त्वाचे वक्तव्य केलं आहे. नवी मुंबईत सिडकोच्या कार्यक्रमात ते बोलत होते. याबद्दल बोलताना मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, "कोणीही माय का लाला आला, तरी लाडकी बहिण योजना बंद होणार नाही. उलट लाडक्या बहिणीने सरकारची ताकद वाढवली, तर १५०० चे २००० पुढे अडीच हजार करु. द्यायची वेळ येईल, तेव्हा हात आखडता घेणार नाही. हे पैसे जनतेचे आहेत. पूर्वीच हफ्ते घेणारं सरकार होतं. हे बहिणींच्या खात्यात हफ्ते भरणारं सरकार आहे" असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.

ते पुढे म्हणाले, "आधीच्या सरकारने मेट्रो 3, अटल सेतू, कारशेड, समृद्धी हायवे प्रकल्प बंद केला होता. आपल्या मनातलं सरकार स्थापन झाल्यावर हे सगळे स्पीड ब्रेकर आम्ही काढले. स्टे हटवला. सगळी कामं सुरु केली. म्हणून आपल्याला एवढच सांगेन मविआ सरकारच अडीच वर्षाच काम, आपल्या सरकारच दोन वर्षाच काम. होऊन जाऊ द्या जनतेच्या दरबारात दूध का दूध पानी का पानी" असं आव्हान ही त्यांनी विरोधकांना दिलं.

# 'आमच्या सरकारवर भ्रष्टाचाराचा एकही आरोप नाही' : अमित शहा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** गेल्या १० वर्षात मोदी सरकारवर भ्रष्टाचाराचा एकही आरोप झालेला नाही, असे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा म्हणाले. विरोधकांनीही हे मान्य केले आहे. सरकारने धोरणातील जडत्व संपवले आणि भारताला कमकुवत अर्थव्यवस्थांमधून बाहेर काढत एक आकर्षक गंतव्यस्थान बनवले. पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखाली देश विकासाच्या मार्गावर चालला आहे.

नवी दिल्लीतील विज्ञान भवन येथे पीएचडी चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीच्या ११९ व्या वार्षिक अधिवेशनात शाह बोलत होते. ते म्हणाले, "मोदी सरकारने उचललेल्या पावलांमुळे भारत २०४७ पर्यंत जगातील सर्वात विकसित देशांपैकी एक होईल. २०१४ मध्ये पंतप्रधान मोदींनी पदभार स्वीकारल्यापासून सरकारने विविध क्षेत्रात सुधारणा केल्या आहेत. यामध्ये पायाभूत सुविधांचे अपग्रेडेशन, उत्तम कनेक्टिव्हिटी, डिजिटल अर्थव्यवस्था, रेल्वे नेटवर्कचा विस्तार, सेमी-कंडक्टर आणि इलेक्ट्रिक वाहनांसाठी उत्पादन उद्योगांची स्थापना यांचा समावेश' आहे.

शहा म्हणाले की, आम्ही देशात सुधारणा आणि आर्थिक विकास घडवून आणला आहे. या काळात आमच्या सरकारवर भ्रष्टाचाराचा एकही आरोप झालेला नाही. गेल्या १० वर्षात मोदी सरकारने दहशतवाद, नक्षलवाद आणि ईशान्येकडील अतिरेक्यांना २०० यार्ड खोल गाडले आहे. पंतप्रधान मोदींनी पदभार स्वीकारला तेव्हा एक धोरणात्मक जडणघडण होती, जी अत्यंत कमी वेळात निर्णायक कारवाईने दूर झाली.

## सराव करताना झालेल्या स्फोटात दोन अग्नीवीरांचा मृत्यू

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नाशिक :** नाशिकमध्ये आर्टिलरी सेंटरमध्ये देवळाली कॅम्प येथे प्रशिक्षणादरम्यान दोन अग्निविरांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. देवळाली कॅम्प येथील आर्टिलरी फायरिंग रेंजमध्ये 'आयएफजी इंडियन फिल्ड गन'ने फायरिंग सुरु होती. त्यावेळी 'शेल'चा ब्लास्ट झाल्याने त्याचा तुकडा अग्निवीर जवानांच्या शरीरात घुसला. दोघेही गंभीररित्या जखमी झाल्याने त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी देवळाली कॅम्प पोलिसांत अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. गोहिल विश्वराज सिंग (वय 20) आणि सैफत शित (वय 21) अशी शहीद झालेल्या दोघांची नावे आहेत. पुढील तपास पोलीस करीत आहेत.

राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स रा

## टोमॅटोने गाठली शंभरी



**सणासुदीच्या काळात** टोमॅटोने शंभरीपार मजल मारली आहे. कमी पेरणी, अवकाळी पाऊस आणि किड्यांच्या प्रादुर्भावामुळे उत्पादनात कमालीची घट झाल्याने स्वयंपाकघरातील एक प्रमुख घटक असलेल्या टोमॅटोचे दर गगनाला भिडले आहेत. २० किलो वजनाच्या टोमॅटोचे क्रेट शेतमालाच्या बाजारात १,५०० ते १,६०० रुपयांपर्यंत मिळत असल्याचे नाशिक येथील शेतकऱ्यांनी सांगितले. या वाढीमुळे नागपूरसारख्या शहरांमध्ये किरकोळ किमती १०० ते १२० रुपये प्रतिकिलो झाल्या आहेत. गोकुळपेठ आणि कॉटन मार्केटसारख्या स्थानिक बाजारपेठेत अगदी कमी दर्जाचे टोमॅटो ७० ते ८० रुपये प्रति किलोने विकले जात आहेत. गेल्या पंधरवड्यात झालेल्या अवकाळी पावसाने पिकांचे मोठे नुकसान झाले असून केवळ एक चतुर्थांश उत्पादन शिल्लक राहिले आहे. त्यामुळे बाजारात टोमॅटो अत्यंत कमी प्रमाणात आहे. परिणामी, एका आठवड्यात किमती दुपटीने वाढल्या आहेत. मागील हंगामात अपेक्षित परतावा न मिळाल्याने शेतकऱ्यांनी या वर्षी टोमॅटोची लागवड आधीच कमी केली होती, असे नाशिकचे टोमॅटो शेतकरी शंकर डिखळे यांनी सांगितले. टोमॅटोच्या दरवाढीचा काही शेतकऱ्यांना मोठा फायदा होत आहे, तर काहींना पावसामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान सोसावे लागत आहे. पश्चिम नाशिकमधून उत्पन्न नेहमीपेक्षा कमी असण्याची शक्यता असली, तरी नव्या हंगामानंतर किमती कमी होतील, असा अंदाज आहे. फेब्रुवारी-मार्चमध्ये रब्बी टोमॅटोची पुनर्लागवड केली जाते आणि १६० दिवसांनी कापणी केली जाते.

» Selected

## २००० कोटींचे कोकेन जप्त

**नवी दिल्ली :** दुबईतून एका कंपनीच्या माध्यमातून कोकेनचा मोठा साठा भारतात पाठवण्यात आला आहे. या कंपनीची ओळख पटली आहे. दिल्ली पोलिसांच्या स्पेशल सेलचे अधिकारी या कंपनीच्या अधिकाऱ्यांची चौकशी करत असून भारतात किती प्रमाणात कोकेन पाठवण्यात आले आहे, याची माहिती घेत आहेत. आतापर्यंत भारतात एकूण ७७३ किलो कोकेन जप्त करण्यात आले आहे. देशातून एवढ्या मोठ्या प्रमाणात कोकेन जप्त झाल्यानंतर देशातील सुरक्षा यंत्रणा हाय अलर्ट मोडमध्ये आल्या आहेत. सर्व राज्यांच्या पोलिसांना सतर्क करण्यात आले आहे. स्पेशल सेलने आता नार्को टेररशी जोडल्याचाही तपास सुरू केला आहे. स्पेशल सेलच्या वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले की, दुबईतून आलेली कोकेनची खेप थेट गाझियाबाद आणि हापूरपर्यंत पोहोचली होती. संपूर्ण माल येथील गोदामात ठेवण्यात आला होता.


## काश्मीरचे ८४ टक्के आमदार श्रीमंत

**श्रीनगर :** जम्मू-काश्मीर विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर 'असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स' (एडीआर) ने आमदारांच्या संपत्तीबाबत अहवाल सादर केला आहे. या अहवालानुसार, निवडणुकीत विजयी झालेल्या ९० आमदारांपैकी ८४ टक्के म्हणजेच ७६ आमदारांनी आपली संपत्ती एक कोटी रुपये किंवा त्याहून अधिक असल्याचे जाहीर केले आहे. २०१४च्या विधानसभेत ७५ टक्के म्हणजेच ६५ आमदारांनी एक कोटी रुपयांपेक्षा जास्त संपत्ती जाहीर केली होती. मागील विधानसभेच्या तुलनेत या विधानसभेत करोडपती आमदारांची संख्या नऊ टक्क्यांनी जास्त आहे. काँग्रेसचे अध्यक्ष आणि सेंट्रल शाल्टेंग मतदारसंघातून निवडणूक जिंकलेले तारिक हमीद कारा हे सर्वात श्रीमंत आमदार आहेत. त्यांनी आपली १४८ कोटी रुपयांची संपत्ती जाहीर केली आहे. त्याचवेळी आपचे आमदार मेहराज मलिक यांच्याकडे सर्वात कमी संपत्ती (२० हजार रुपये) आहे.

## सदर दोन मतदारसंघात उमेदवारसुद्धा निश्चित

# नागपुरात उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला 2 जागा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नागपूर :** कोणत्याही क्षणी राज्यात विधानसभा निवडणुकांची घोषणा होण्याची शक्यता आहे. अशात सर्वच राजकीय पक्ष जागावाटपात गुंतले आहेत. महाविकास आघाडीतील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वाट्याला नागपुरात दोन जागा आल्याची माहिती समोर येत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, यामध्ये ग्रामीणमधील रामटेक आणि शहरातून दक्षिण नागपूर विधानसभा मतदारसंघ यांचा समावेश आहे. दरम्यान, नागपूर जिल्ह्यात ग्रामीण भागातील दोन आणि नागपूर शहरातील दोन अशा चार विधानसभा मतदारसंघाची उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेने मागणी केली होती. मात्र आता दोन मतदारसंघावर समझोता झाल्याचे सांगितले जात आहे.

सदर दोन मतदारसंघात ठाकरे गटाने उमेदवारसुद्धा निश्चित केले असून त्यांना खासगीत प्रचार करण्याच्या सूचनाही उद्धव ठाकरे यांनी दिल्या आहेत. शिवसेनेने (उद्धव बाळासाहेब ठाकरे) सुरुवातीपासूनच दक्षिण आणि रामटेक या दोन विधानसभा मतदारसंघावर फोकस ठेवला होता. युतीत असताना ग्रामीण भागात दोन आणि शहरातील एका मतदारसंघात शिवसेना लढत होती. महाविकास आघाडीमुळे नागपूर जिल्ह्यातील एका जागेची शिवसेनेची घट झाली आहे.

उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेकडून या वेळी शिवसेना जिल्हाप्रमुख प्रमोद मानमोडे यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले असल्याचे समजते. तर रामटेक मतदारसंघातून विशाल बरबटे यांचे नाव निश्चित मानले जात आहे.

# नवी मुंबई विमानतळाच्या धावपट्टीची चाचणी यशस्वी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी मुंबई :** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या धावपट्टीची चाचणी काल सकाळी करण्यात आली. त्यानंतर भारतीय हवाईदलाचे 'सी २९५' विमान विमानतळावर लँडिंग करण्यात आले. या वेळी मुख्यमंत्री शिंदे यांनी विमानातून उड्डाण केले.

भारतीय हवाईदलाच्या 'सी २९५' विमानाने अवकाशात ७ ते ८ घिरट्या घातल्यानंतर धावपट्टीवर लँण्डींग करण्यात आले. या वेळी विमानाला 'वॉटर सॅल्यूट' देण्यात आला. 'सी २९५' विमानानंतर सुखोई ३० विमानसुद्धा धावपट्टीवर उतरविण्यात आले. दरम्यान, या विमानतळावरून मार्च २०२५ मध्ये देशांतर्गत विमानसेवा सुरू करण्यात येणार आहे. आंतरराष्ट्रीय विमानसेवा जून २०२५ पासून सुरू करण्यात येईल, असे 'सिडको'चे अध्यक्ष संजय शिरसाट यांनी सांगितले.

या विमानतळावर दोन धावपट्टी तयार केल्या आहेत. ४ टर्मिनलवर ३५० विमानांची एकाच वेळी पार्किंग करण्याची सोय करण्यात आली आहे. विमानतळावर मेट्रो आणि बुलेट ट्रेनची कनेक्टिव्हिटी देण्यात येणार आहे. 'सिडको'कडून या विमानतळाची उभारणी करण्यात आली आहे. ४ टर्मिनल बिल्डिंगमधून कोठूनही 'चेक इन' केले तरी प्रवाशांना त्यांच्या विमानापर्यंत जाता येणार आहे.

## परिषद...

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**लाओस :** पंतप्रधान नरेंद्र मोदी हे १९ व्या पूर्व आशियायी परिषदेत सहभागी होण्यासाठी अन्य नेत्यांसोबत जात असताना.

U/o 5 Rule 20CPC
Pro. No. 14435
Dt. 13/09/24
**Paper Publication**
**Summons IN A SUMMARY SUIT (Form No. 4)**
**IN THE COURT OF 6th JOINT CIVIL JUDGE SR.DN, NAGPUR.**
Sum. C.S. No. 200/2022 Room No. 416
Fixed for: 17/10/2024
Plaintiff : **Swati Manish Jaipuria**
-Versus-
Defendants: **A. K. Gandhi Electronics and Appliance**
To,
**5) Santosh Vitthaldas Rathi, Partner of A. K. Gandhi Electronics and appliances LLP R/o Flat no. 11, Savitri Co Op. Housing Society, Avhinav Lane, Erandawane, Pune**
WHEREAS plaintiff has instituted a suit against you under Order XXXVII of the Code of Civil Procedure, 1908, for **Suit for Recovery of amount Rs.10,94,688/-** you are hereby summoned to cause an appearance to be entered for you, within **ten days** from the service hereof, in default whereof the plaintiff will be entitled, after the expiration of the said period of ten days to obtain a decree for any sum not exceeding the sum of and the sum of Rs. for costs, together with such interest, if any, as the Court may order.
If you cause an appearance to be entered for you, the plaintiff will thereafter serve upon you a summons for judgment at the hearing of which you will be entitled to move the Court for leave to defend the suit.
Leave to defend may be obtained if you satisfy the Court by affidavit or otherwise that there is a defence to the suit on the merits or that it is reasonable that you should be allowed to defend.
Given under my hand and the seal of the court.
That on **12th day of Sept, 2024.**
Seal
By order of the Court
Asst. Supdt. (T.W.)
Court of Civil Judge Sr. Dn., Nagpur.

# आयात शुल्कावरून डोनाल्ड ट्रम्प यांची भारतावर आगपाखड

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**वॉशिंग्टन :** अमेरिकेचे माजी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सत्तेत आल्यास आयातशुल्क लादण्याचे वचन दिले. भारत सर्व प्रमुख देशांमधील परदेशी उत्पादनांवर सर्वाधिक शुल्क लादत असल्याचा आरोप त्यांनी केला. एकीकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे तोंड भरून कौतुक करीत असताना दुसरीकडे त्यांच्याच सरकारच्या धोरणावर मात्र त्यांनी कडाडून टीका केली.

डेट्रॉईटमध्ये मुख्य आर्थिक धोरणाच्या भाषणात ट्रम्प यांनी सांगितले, की माझ्या प्लॅनमध्ये एक अट आहे, ती खूप महत्त्वाची आहे. अमेरिका सहसा कोणत्याही गोष्टींवर आयातशुल्क लावत नाही; परंतु भारतासह अन्य काही देश मात्र अमेरिकेतून त्यांच्या देशात जाणाऱ्या वस्तूंवर कर आकारतात. मी अध्यक्ष असताना व्हॅन आणि लहान ट्रक आदींच्या आयातीवर कर आकारणी सुरू केली. ती छान होती. चीन २०० टक्के शुल्क लावते. ब्राझील प्रचंड शुल्क आकारते. भारत सर्वाधिक शुल्क आकारतो.

ते म्हणाले, "भारत खूप जास्त शुल्क आकारतो. भारतासोबत आमचे चांगले संबंध आहेत. माझे पण. विशेषत: पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी. ते एक महान नेते आहे. महान व्यक्ती आहे. त्यांनी उत्तम काम केले आहे; परंतु ते खूप शुल्क आकारतात."

या आठवड्याच्या सुरुवातीला मोदी यांची प्रशंसा केल्यानंतर ट्रम्प यांच्या टिप्पण्या आल्या. मोदी यांना 'सर्वोत्तम व्यक्ती' असे संबोधत ट्रम्प यांनी त्यांना आपला मित्र असे संबोधले होते. अमेरिकेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत फायद्यासाठी ट्रम्प यांनी मोदी यांच्यांशी आपले 'खूप चांगले संबंध' असल्याचे म्हटले होते.

ट्रम्प यांनी 'डेट्रॉईट इकॉनॉमिक क्लब'च्या सदस्यांसमोर सांगितले, की भारतासोबत व्यवसाय करताना कंपन्या काही विशिष्ट शुल्क आकारतात. मला वाटते की ते चीनपेक्षा जास्त शुल्क घेतात. ट्रम्प म्हणाले की, जेव्हा ते व्हाईट हाऊसमध्ये हार्ले डेव्हिडसनच्या प्रमुखाला भेटले, तेव्हा त्यांनी सांगितले, की भारतात व्यवसाय करणे खूप कठीण आहे कारण तेथे प्रचंड आयात शुल्क लादले जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

जाहीर नोटीस

१) MH-12 NP 4387
२) MH-12H F 6992
३) MH-12 ET 0667
४) MH 12TG 6981
५) MH 12 LV 3216 सर्व लोकांना कळविण्यात येते की माझे वडिल अरुण गोविंद उदिरवाडकर यांचे दि 9-7-21 रोजी व आई सरोज अरुण उदिरवाडकर यांचे 2/4/1984 रोजी निधन झाले आहे. त्यांचे नावे प्रा.प. कार्यालय, पुणे येथे वाहन क्र. वरील प्रमाणे नोंद आहे. त्यांचे पश्चात वारसदार म्हणून मी त्यांचा मुलगा सुमित अरुण उदिरवाडकर याद्वारे असे कळवितो की, उपरोक्त वाहन माझे नावे करण्याकरता अर्ज दिला असून सोबत कोणाची तक्रार नसल्याचे हमीपत्र दिले आहे.

सबब या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, ज्या कोणाची तक्रार अथवा रकत असल्यास त्या संबंधीत व्यक्तीने प्रा.प. कार्यालय, पुणे येथे १५ दिवसांचे आत मक्ष अथवा लेखी कळवावे. अन्यथा ह्याबाबत कोणाचीही हरकत नाही असे समजून गोल वाहन माझे नावे हस्तांतरीत करण्यात येईल. त्यानंतर कोणाचीही तक्रार ग्राह्य ली जाणार नाही. कळावे.

पुणे दि.

**मुलगा: सुमित अरुण उंदिरवाडकर**
पत्ता : ७७/४ विष्णु मारुती शिवणे
पुणे ४११०२३

जाहीर नोटीस

सर्व लोकांना कळविण्यात येते की माझे पती पुंडलिक पांडुरंग दराडे यांचे दि. ५.७.२४ रोजी निधन झाले आहे. त्यांचे नावे प्रा.प. कार्यालय, पुणे येथे वाहन क्र. MH 12 SS 5599 नोंद आहे. त्यांचे पश्चात वारसदार म्हणून मी त्यांची पत्नी जयश्री पुंडलिक दराडे याद्वारे असे कळविते की, उपरोक्त वाहन माझे नावे करण्याकरता अर्ज दिला असून सोबत कोणाची तक्रार नसल्याचे हमीपत्र दिले आहे.

सबब या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, ज्या कोणाची तक्रार अथवा हरकत असल्यास त्या संबंधीत व्यक्तीने प्रा.प. कार्यालय, पुणे येथे १५ दिवसांचे आत समक्ष अथवा लेखी कळवावे. अन्यथा ह्याबाबत कोणाचीही हरकत नाही असे समजून वरील वाहन माझे नावे हस्तांतरीत करण्यात येईल. त्यानंतर कोणाचीही तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही. कळावे.

पुणे दि.

**पत्नी : जयश्री पुंडलिक दराडे**
पत्ता : ५०१ अमीत आंनद ११७८/३
मार्डन कॉलेज रोड पुणे ४११००५

जाहीर नोटीस

सर्व लोकांना कळविण्यात येते की माझी पत्नी सुखदा नितीन दास्ताने यांचे दि. 21.11.2023 रोजी निधन झाले आहे. त्यांचे नावे प्रा.प. कार्यालय, पुणे येथे वाहन क्र. MH-12-QY 4463 नोंद आहे. त्यांचे पश्चात वारसदार म्हणून मी त्यांचा पती नितीन दिलीप दास्ताने याद्वारे असे कळवितो की, उपरोक्त वाहन माझे नावे करण्याकरता अर्ज दिला असून सोबत कोणाची तक्रार नसल्याचे हमीपत्र दिले आहे.

सबब या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, ज्या कोणाची तक्रार अथव हरकत असल्यास त्या संबंधीत व्यक्तीने प्रा.प. कार्यालय, पुणे येथे १५ दिवसांचे आव समक्ष अथवा लेखी कळवावे. अन्यथा ह्याबाबत कोणाचीही हरकत नाही असे समजू वरील वाहन माझे नावे हस्तांतरीत करण्यात येईल. त्यानंतर कोणाचीही तक्रार ग्रा धरली जाणार नाही. कळावे.

पुणे दि.

**पती: नितीन दास्ताने**
पत्ता : फ्लॅट नं.२०३, वडगाव,
पुणे ४११०४१

## 'डब्ल्यूडब्ल्यूएफ'च्या जाहीर अहवालात प्रशंसा

# भारतीय खाद्यपदार्थ जगभरातील देशांपेक्षा सर्वोत्तम

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** जगभरात ज्यावेळी खाद्य पदार्थांचा विषय निघला जातो, तेव्हा भारतीय पदार्थांचं नाव आवर्जून घेतलं जातं. कारण भारतीय आहार हा एक परिपूर्ण आहार मानतो जातो. आता वर्ल्ड वाइड फंड फॉर नेचरने जारी केलेल्या लिव्हिंग प्लॅनेटच्या २०२४ च्या अहवालामध्ये भारतीय अन्न व्यवस्था जगभरातील देशांपेक्षा पृथ्वीसाठी आणि पर्यावरणासाठी सर्वोत्तम अन्न व्यवस्था असल्याचं म्हटलं आहे. या अहवालात भारतातील अन्न व्यवस्थेची प्रशंसा करण्यात आली आहे. जगभरातील देशांमध्ये भारताचा अन्न वापराचा नमुना सर्वात टिकाऊ आणि पर्यावरणास अनुकूल असल्याचाही उल्लेख करण्यात आला आहे.

तसेच जगभरातील सर्व देशांनी भारताचा हा पॅटर्न स्वीकारला तर २०५० पर्यंत पृथ्वीवरील होणारे नुकसान मोठ्या प्रमाणात कमी होतील, असंही अहवालात म्हटलं आहे. दरम्यान, भारतानंतर इंडोनेशिया, चीन, जपान आणि सौदी अरेबिया या देशांना सर्वोत्तम अन्नप्रणालींमध्ये स्थान देण्यात आलं आहे. तसेच अर्जेंटिना, ऑस्ट्रेलिया आणि अमेरिकेतील आहार पद्धतींना सर्वात खराब दर्जा देण्यात आला आहे.

जगभरातील सर्व देशांनी भारतातील अन्न व्यवस्था किंवा खाद्यपदार्थ स्वीकारल्यास २०५० पर्यंत आपल्या पृथ्वीवरील ८४ टक्के संसाधने आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी पुरेशी असतील. याचा अर्थ १६ टक्के संसाधने वापरली जाणार नाहीत. त्यामुळे जागतिक तापमानवाढही कमी करण्यास मदत होईल आणि पर्यावरणाचा समतोल राखण्यासही मदत होईल. तसेच १.५° डिग्री सेल्सियसपेक्षा खूपच कमी उष्णता उत्सर्जित होईल. त्यामुळे पर्यावरण सुधारेल, असंही या अहवालामध्ये म्हटलं आहे.

दरम्यान, अर्जेंटिना आणि ऑस्ट्रेलियासारख्या देशांच्या आहार पद्धतींना सर्वात वाईट मानांकन आलं भारतातील लोकांच्या बाजरी सेवन करण्याच्या पद्धतीचाही उल्लेख करण्यात आला आहे.

#रा

# पाडेगाव : महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्रातून बियाणे विक्रीचा शुभारंभ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नीरा :** महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्र पाडेगावच्या ऊस बियाणे विक्री व वाटपाचा शुभारंभ सोमेश्वर सह.साखरकारखान्याचे चेअरमन पुरूषोत्तम जगताप, को-८६०३२ या वाणाचे जनक डॉ. आर. वाय. जाधव, ऊस विशेषज्ञ डॉ. राजेंद्र भिलारे यांच्या हस्ते करण्यात आला. प्रगतशील शेतकरी प्रफुल्ल जाधव, कार्तिक अडसूळ, गणपत वायाळ, रमेश काटे, राजाराम भोसले, संदीप गायकवाड यांना फुले २६५ या ऊस वाणाच्या बेणेमळ्यातील पहिली मोळी देण्यात आली.

ऊस संशोधन केंद्रातील ऊस विशेषज्ञ डॉ. सुरज नलावडे, डॉ. सुरेश उबाळे, डॉ. कैलास काळे, डॉ. कैलास भोईटे, सोमेश्वर कारखान्याचे मुख्य शेतकी अधिकारी बापूराव गायकवाड, ऊस विकास अधिकारी विराज निंबाळकर, डॉ. रणजितसिंह निंबाळकर, डॉ. दत्तात्रय थोरवे, डॉ. किरणकुमार ओंबासे, डॉ. माधवी शेळके, राजेंद्र पांढरे, संतोष शिंदे, दिनेश पाटील, भाऊसाहेब बेल्हेकर यावेळी उपस्थित होते.

सोमेश्वर कारखाना स्थापनेपासून चालविण्यासाठी तो पुर्ण क्षमतेने ऊसाची कमतरता भासत होती. इतर जिल्ह्यातून गेटकेन ऊस आणावा लागत होता, परंतु, पाडेगाव संशोधन केंद्राने सन २००७ मध्ये प्रसारित केलेल्या फुले २६५ वाणामुळे आणि सन २००९-१० मध्ये कारखाना कार्यक्षेत्र व नीरा नदी काठावरील चोपन फुले २६५ या वाणाची लागवड झाली. त्यामुळे कारखाना ऊस पुरवठ्याबाबत स्वयंपुर्ण झाला. याकामी महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरीचे कुलगुरु डॉ. प्रशांतकुमार पाटील यांचे सहकार्य लाभले. साखर ऊस संशोधन केंद्राची मदत झाला. तर साखर उतारा वाढण्यासाठी पाडेगांव ऊस संशोधन केंद्राची मदत झाली.

> पाडेगाव ऊस संशोधन केंद्राने प्रसारीत केलेल्या फुले २६५ को ८६०३२, फुले १०००१, फुले ९०५७ व मागील तीन वर्षात प्रसारीत केलेले नवीन वाण फुले ऊस १५०१२, फुले ऊस १२००७ आणि फुले ऊस १५००६ हे नवीन वाण सोमेश्वर कारखान्याच्या कार्यक्षेत्रात उपलब्ध होत आहे. राज्यातील सर्व शेतक-यांनी नवीन वाणांची जास्तीत जास्त लागवड करून उत्पादनात वाढ करावी. संशोधन केंद्राने विकसित केलेले आधुनिक ऊस लागवड व खोडवा ऊस व्यवस्थापन या तंत्रज्ञानाचा वापर करावा,
>
> — पुरुषोत्तम जगताप, चेअरमन - सोमेश्वर सहकारी साखर कारखाना

## » Selected



### कंपनी बंद करण्यासाठी धरणे आंदोलन

**कारेगाव :** रांजणगाव एमआयडीसीमधील महाराष्ट्र एनव्हायरो पॉवर लिमिटेड (एमईपीएल) कंपनी कायमस्वरुपी बंद व्हावी यासाठी स्थानिक ग्रामस्थांनी कंपनीच्या प्रवेशद्वारासमोर दोन दिवस धरणे आंदोलन केले. रांजणगाव एमआयडीसीमधील महाराष्ट्र एनव्हायरो कंपनीच्या दूषित पाण्यामुळे निमगाव भोगी व परिसरातील शेती क्षेत्र पूर्णतः नापीक झाली असून,यामुळे असंख्य जनावरे दगावली आहेत,

टाटा उद्योग समूहाचे प्रमुख रतन टाटा यांना श्रद्धांजली अर्पण करुन आंदोलन स्थगित करण्यात आले. त्यानंतर शुक्रवारी,दि.११ या धरणे आंदोलनाला कंपनीच्या प्रवेशद्वारासमोर भजनाने सुरुवात झाली. या आंदोलनात सरदवाडी व निमगाव भोगी येथील भजनी मंडळ सहभागी झाले. यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य चंद्रशेखर पाचुंदकर,राहुल पाचर्णे,बाजार समितीचे माजी सभापती शशिकांत दसगुडे, आबासाहेब सरोदे, निमगाव भोगीच्या सरपंच उज्ज्वला इचके,उपसरपंच विकास रासकर,माजी सरपंच सचिन सांबारे,अंकुश इचके, संजय पावशे,उत्तम व्यवहारे,लक्ष्मण सांबारे, गणेश कर्डीले,प्रकाश थोरात,नितीन थोरात,संतोष कर्डीले,आबासाहेब जाधव, संतोष शिंदे, संतोष झंजाड आदिसह निमगाव भोगी, सरदवाडी,कर्डेलवाडी, अण्णापूर, आमदाबाद व शिरुर ग्रामीण या गावातील ग्रामस्थ व महिला भगिनी सहभागी झाले होते.



### आकाश भोरडे गोंदण उत्कृष्ठ साहित्य पुरस्काराने सन्मानित

**शिक्रापूर :** निमगाव म्हाळुंगी ता. शिरूर येथील युवा साहित्यिक व कवी आकाश हरिभाऊ भोरडे यांना नुकतेच पुणे येथील कुलस्वामिनी प्रतिष्ठानच्या वतीने देण्यात दिला जाणारा गोंदण उत्कृष्ट साहित्य सन्मान देऊन सन्मानित करण्यात आले आहे. निमगाव म्हाळुंगी ता. शिरुर येथील आकाश भोरडे या युवकाने अतिशय कमी वयामध्ये साहित्य क्षेत्रात भरारी घेतली असून लोप पावत चाललेली वाचन संस्कृती रुजावी व विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्त्व कळावे या हेतूने कुलस्वामिनी प्रतिष्ठान पुणे यांच्या वतीनेप्रकाशित केल्या जाणाऱ्या गोंदण विशेषांकमध्ये देखील आकाशने उत्कृष्ट लेखन केले असल्याने युवा साहित्यिक व कवी आकाश हरिभाऊ भोरडे यांना गोंदण उत्कृष्ट साहित्य सन्मान देऊन गौरवण्यात आले. याप्रसंगी गोंदनचे संपादक पांडुरंग गाडीलकर, सहसंपादक दादाभाऊ गावडे, उज्वला पिंगळे, डॉ. नंदकुमार माळशिरसकर, चांगदेव पिंगळे, डॉ. हनुमंत भवारी, मनोहर मोहरे, मीनाक्षी पाटोळे, बापुसाहेब जाधव, डॉ. निलम गायकवाड यांसह आदि मान्यवर उपस्थित होते. तर आकाशने साहित्य क्षेत्रात भरारी घेत सलग दोन वर्षे गोंदण उत्कृष्ट साहित्य पुरस्कार पटकाविला असल्याचे कुलस्वामिनी प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.



### झेंडूच्या फूलांना चांगली मागणी

**लोणी (ता आंबेगाव ) :** विजयादशमीसाठी झेंडूचे पीकाचे मळे बहरले असून आंबेगाव तालुक्यातील पूर्व भागातील लोणी,धामणी व सविंदणे (ता.शिरूर )परिसरात मोठया प्रमाणात झेंडूचे पीक घेतले जाते.पिवळे व लाल सोने शेतकर्यांना दोन पैसे मिळवून देत असल्याने दरवर्षीप्रमाने यंदाही चांगला भाव मिळेल अशी अपेक्षा सविंदणे येथील प्रगतशील शरद पडवळ व लोणी येथील बाळासाहेब आढाव यांनी व्यक्त केली आहे .त्यामूळे या परिसरात शेतकर्यांनी मोठ्या प्रमाणात वेगवेगळ्या प्रकारच्या झेंडूची लागवड केली आहे . दसर्यांच्या दिवशी झेंडूच्या फूलांना चांगली मागणी असते . या दिवशी झेंडूचा भाव देखील चांगला असतो.असे शरद पडवळ यांनी सांगितले.यंदा पावसाने जून पासून वेळोवेळी चांगली हजरी लावल्याने झेंडूबरोबरच विविध पिके शेतकर्यांनी घेतली व ती चांगली आली.सध्या झेंडूचे मळे बहरले असून दसरा व दिवाळी सणाच्या वेळी झेंडू बाजारात मोठ्या प्रमाणात दाखल होईल यामूळे चार पैसे उत्पन्न मिळून मुलाबाळांना सण चांगला साजरा करता येईल अशी शेतकर्यांनी भावना व्यक्त केली आहे.सध्या झेंडूची बाजारात मोठ्या प्रमाणात आवक झाल्याने बाजार कमी होऊन दहा किलो झेंडूला ९० ते ११० रुपये बाजार मिळतो असे झेंडू उत्पादक शेतकर्यांनी सांगितले.

# नारायणगांव येथील कुबेर सोसायटीमध्ये बिबट्याची गस्त

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



छाया -सुरेश वाणी

**नारायणगाव :** बिबट्यांची संख्या वाढल्यामुळे भक्षाच्या शोधासाठी बिबटे गृहनिर्माण सोसायटीत फिरत आहेत. पाळीव कुत्र्यांच्या शोधासाठी बिबटे आता नारायणगाव परिसरातील सोसायटीच्या आवारात फिरताना दिसत आहेत. हा प्रकार मागील दहा ते पंधरा दिवसापासून सुरू आहे. यामुळे नागरिकांच्या विशेषता लहान मुलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.बिबट्याला जेर बंद करण्यासाठी वन विभागाने पिंजरा लावला आहे. मात्र बिबट्या पिंजऱ्याकडे फिरकत नसल्याने वनविभागा पुढे मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.

नारायणगाव ग्रामपंचायत हद्दीतील कोल्हे मळा परिसरात मोठ्या प्रमाणात गृहरचना सोसायट्या झाल्या आहेत.आज पहाटेच्या सुमारास कोल्हे मळा येथील कुबेर मधुकोश सोसायटीच्या आवारात आज पहाटे बिबट्याने प्रवेश केला. सोसायटीच्या आवारात सुमारे दोन मिनिटे बिबट्याने भक्षाचा शोध घेतला. त्या नंतर कंपाउंड वरून उडी मारून बिबट्या निघून गेला. बिबट्या फिरताना सोसायटीतील सीसीटीव्ही मध्ये कैद झाला आहे. घटनास्थळी आज सकाळी वनरक्षक ज्ञानेश्वर पवार, आपाद मित्र सुशांत भुजबळ यांनी भेट देऊन पाहणी केली. या पूर्वी दिलीप कोल्हे बिबट्याच्या हल्ल्यातून सुदैवाने वाचले. 8 ऑक्टोबर रोजी दुपारी व रात्री येथील सोयाबीनच्या शेतात व कोल्हे मळा रस्त्यावर बिबट्या फिरताना आढळून आला. येथीलग्रामीण रुग्णालय परिसरात यापूर्वी बिबट्याचे दर्शन झाले आहे. या भागात बिबट्याची मादी बछड्यांसह वास्तव्यास आहे. येथील पाटे- खैरे मळा भागात बिबट्याची जोडी फिरताना जालिंदर खैरे, स्वप्निल पाटे यांनी पाहिली आहे. वनविभागाच्या वतीने परिसराची ड्रोन कॅमेराद्वारे पाहणी केली आहे. बिबट्याला जेरबंद करण्यासाठी कोल्हे मळा येथे पिंजरा लावण्यात आला आहे. मात्र बिबट्या पिंजऱ्यातील भक्षाकडे दुर्लक्ष करून भक्षाच्या शोधात सोसायटी परिसरात रात्री व पहाटे फिरताना दिसत आहे.यामुळे नागरिकांच्या विशेषता लहान मुलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

## तयारी विजयादशमीची...

विजयकुमार हरिश्चंद्रे



**परंपरा :** विजयादशमी म्हणजे उत्सव आनंद जल्लोष आणि परंपरा संस्कृतीचे दर्शन घडते रावण दहन वाईट प्रवृत्तीवर चांगल्याचा विजय म्हणून राज्यातील प्रसिद्ध असलेल्या मोरगावच्या शाही दसऱ्यात रावणाच्या प्रतिमेवर अखेरचा हात फिरवताना येथील मानकरी चित्रकार अकबरभाई पठाण

# जेजुरीच्या शरदचंद्र पवार महाविद्यालयाला नॅक पियर समितीची भेट



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुरंदर :** आचार्य अत्रे विकास प्रतिष्ठानच्या जेजुरी येथील शरदचंद्रजी पवार महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय मूल्यांकन आणि प्रमाण परिषदेकडून (नॅक ) पुनर्मूल्यांकन करण्यासाठी नॅक पियर टीमने भेट दिली. तेलंगणा, गुजरात, तामिळनाडू मधील सदस्य अध्यक्षांचा समावेश

त्यांचे स्वागत महाविद्यालयाच्या प्रवेशद्वारावर सनई व चौघडाच्या निनादात, फेटे बांधून आणि नवदुर्गेची विविध रूपे साकारलेल्या विद्यार्थीनींनी व पारंपारिक पोशाखातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त स्वागत केले.

नॅक पियर टीमचे अध्यक्ष डॉ थारकेश्वर व्ही.बी. (तेलंगणा) यांचे स्वागत संस्थेचे अध्यक्ष विजय कोलते यांनी केले.

समन्वयक सदस्य डॉ. अश्विन पुरोहित ( गुजरात ) यांचे स्वागत प्राचार्य डॉ. धनाजी नागणे यांनी केले. सदस्य डॉ.नलप्पण रमण( तामिळनाडू ) यांचे स्वागत समन्वयक डॉ. बालाजी नाटकरे यांनी केले.

# जातेगाव बुद्रुकचा पाणीपुरवठा व कचरा संकलन होणार जलद



जातेगाव बुद्रुक ता. शिरुर येथे विहिरींवर सोलरपंप प्रणाली व कचरा गाडीचे लोकार्पण करताना मान्यवर.

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** जातेगाव बुद्रुक ता. शिरुर येथील पाणीपुरवठा करणाऱ्या दोन्ही विहिरींवर सोलरपंप प्रणाली तसेच गावातील कचरा संकलनासाठी कचरा गाडीचे लोकार्पण नुकतेच संपन्न झाले असल्याचे आता गावचा पाणीपुरवठा व कचरा संकलन जलद होणार असल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे.

जातेगाव बुद्रुक ता. शिरुर येथे ग्रामपंचायतच्या वतीने गावातील नागरिकांना पाणीपुरवठा करणाऱ्या दोन्ही विहिरींवर सोलरपंप प्रणाली कार्यान्वित करण्यात आली तसेच गावातील कचरा संकलनासाठी नवीन कचरा गाडीचे लोकार्पण पंचायत समितीचे माजी सभापती सुभाष उमाप व सरपंच निलेश उमाप यांच्या हस्ते करण्यात आले, यावेळी ग्रामपंचायत सदस्या शोभा इंगवले, साधना मोरे, सामाजिक कार्यकर्ते जानिक कदम, सुरेश उमाप, बाबाजी खळदकर, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष बाबुराव इंगवले, अनिल इंगवले, प्रवीण पटेकर, शरद उमाप, नवनाथ इंगवले, योगेश कुलाळ, दत्तात्रय फणसे, दगडू साळुंखे, मोहन इंगवले, संतोष इंगवले, सुर्यकांत पटेकर, शांतीलाल सूर्यवंशी, मंगेश क्षिरसागर, दिपक पवार, दत्तात्रात बोराटे, चंद्रकांत इंगवले यांसह आदी उपस्थित होते, दरम्यान ग्रामपंचायतच्या वतीने विहिरींवर सोलरपंप प्रणाली तसेच गावच्या कचरा संकलनासाठी कचरा गाडीचे लोकार्पण केल्याने गावचा पाणीपुरवठा व कचरा संकलन जलद होणार असल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले, यावेळी ग्रामपंचायत सदस्या शोभा इंगवले यांनी सर्वांचे आभार मानले.

## शिक्रापुरात विरुद्ध दिशेने कारला धडकून एक ठार तिघे जखमी

**शिक्रापूर :** शिक्रापूर ता. शिरुर येथील बजरंगवाडी येथे पुणे नगर महामार्गावर दुचाकीवर दोघा मित्रांना बसवून एका दुचाकीहून जाणाऱ्या तिघांच्या दुचाकीची समोरील कारला धडक बसून झालेल्या अपघातात दुचाकी चालक इसमाचा जागीच मृत्यू होऊन दुचाकीवरील दोघांसह कार मधील एक इसम जखमी झाल्याची घटना घडली असल्याने शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे राम पियारे चव्हाण या मयत दुचाकी चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## वडिलांच्या खूनप्रकरणी मुलास जन्मठेप

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**राजगुरुनगर :** वडिलांनी वृद्धापकाळात स्वतःच्या लग्नासाठी वधू-वर सूचक मंडळात नाव नोंदविल्याचा राग आल्यामुळे वडिलांचा खून करणाऱ्या मुलाला राजगुरुनगर अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाचे न्यायाधीश एस. पी. पोळ यांनी जन्मठेपेची शिक्षा सुनावली. शेखर शंकर बोऱ्हाडे (वय ४९, रा. नंदादीप हौसिंग सोसायटी, बी विंग, फलॅट नंबर ९, वैशंपायन आळी, राजगुरुनगर, ता. खेड) असे शिक्षा झालेल्या आरोपी मुलाचे नाव आहे.

शंकर रामभाऊ बोऱ्हाडे (वय ८०, रा. वैशंपायन आळी, राजगुरुनगर) यांचा ६ जानेवारी २०२२ रोजी राजगुरुनगर येथील राहत्या घरात त्यांच्या मुलानेच खून केला होता. वडील शंकर बोऱ्हाडे यांनी वधू-वर सूचक मंडळात नाव नोंदविले आणि ते त्याच्यापासून लपवून ठेवले, याचा मुलगा शेखर याला राग आला. म्हणून त्याने राहत्या सदनिकेत स्वयंपाक घरातील सुरीने वडिलांचा गळा चिरण्याचा प्रयत्न केला. पण, सुरीने गळा चिरला गेला नाही, म्हणून वरवंट्याने तोंडावर आणि डोक्यात घाव घालून त्यांचा खून केला होता.

पान १ वरून

## आम्ही प्रस्थापितांना धडा शिकवू- छत्रपती संभाजीराजे



आहेत. म्हणून सोडतात व नंतर स्वत: त्यांच्याबरोबर बसतात-उठतात. हा सगळा गोंधळ हे लोक जनतेला गृहित धरून करतात. त्यामुळेच त्यांना आता त्यांची जागा दाखवण्याची वेळ आली आहे, असे संभाजी राजे म्हणाले.

## निहॉन हिदानक्यो या जपानी संस्थेला शांततेचा नोबेल पुरस्कार जाहीर

नोबेल पुरस्कार समितीने केलेल्या पोस्टनुसार यंदाचा शांततेचा नोबेल पुरस्कार निहॉन हिदानक्यो या जपानी संस्थेला देण्यात आला आहे. या संस्थेनं हिरोशिमा आणि नागासाकीतील अणूबॉम्ब पीडितांसाठी मोठं काम केलं आहे. जग हे अण्वस्त्र मुक्त व्हावं, यासाठी ही संस्था काम करते. त्यांच्या या कामाचा गौरव करण्यासाठी हा पुरस्कार देण्यात आला आहे.

## तीन संशयितांना पोलिसांनी केली अटक

या घटनेमुळे पुण्यात खळबळ उडाली होती. तब्बल ७ दिवसांपासून पुणे पोलिस आरोपींचा शोध घेत होते. या साठी आधुकीक तंत्रज्ञानाचा एआय सिंबाचा वापर पोलिसांनी केला. या सोबतच ३ हजार पेक्षा अधिक फोन कॉल तपासण्यात आले तर २०० पेक्षा अधिक आरोपींच्या चौकशी करण्यात आली.

## बारामती कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये राज्यस्तरीय विविध स्पर्धा

# जागतिक फार्मासिस्टदिन मोठ्या उत्साहात साजरा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**उंडवडी :** येथील बारामती कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये फार्माकोविजिलन्स आठवडा आणि जागतिक फार्मासिस्ट दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या विशेष कार्यक्रमानिमित्त विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये वैज्ञानिक पोस्टर प्रेझेंटेशन, मॉडेल बनवणे, वादविवाद व इतर उपक्रमांचा समावेश होता.



कार्यक्रमाचे उद्‌घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डॉ. अनिल भानवसे (कॉलेज ऑफ फार्मसी, अकलूज), डॉ. लक्ष्मीकांत पुराणे (यशोदा कॉलेज ऑफ फार्मसी, सातारा), डॉ. मनोज बी. शिंदे, डॉ. अविनाश भोसले (सातारा कॉलेज ऑफ फार्मसी), श्री प्रसाद कुलकर्णी (बारामती हॉस्पिटल प्रायव्हेट लिमिटेड), श्री युवराज यादव (अध्यक्ष, बारामती तालुका केमिस्ट ड्रगिस्ट असोसिएशन), आणि प्रा. भारत काळे (एमईएस हायस्कूल, बारामती) उपस्थित होते.

यावेळी झालेल्या कार्यक्रमात उप प्राचार्य डॉ. धनंजय घोडके यांनी सर्व विद्यार्थ्यांना स्पर्धेच्या यशासाठी शुभेच्छा दिल्या. राज्यस्तरीय पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धेत महाराष्ट्रासह इतर राज्यांतील महाविद्यालयांमधून सुमारे ७२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विविध निकषांवर पोस्टरचे मूल्यांकन करून विजेत्यांची घोषणा करण्यात आली.

या स्पर्धेत प्रथम पारितोषिक पाच हजार रुपये व प्रमाणपत्र निकिता चव्हाण आणि वैष्णवी देवकाते (पंढरपूर) यांना मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले. तर दुसरे पारितोषिक तीन हजार व प्रमाणपत्र चैतन्य पाटील , जैताली पवार व मानसी सोडल ( पिंपरी) व ओमराजे ठक्कर व कार्तिक जंगम (भालचंद्र पुणे) यांना देण्यात आले. तृतीय पारितोषिक दोन हजार व प्रमाणपत्र शितल वाघमोडे, गायत्री पवार आणि वैष्णवी जाधवराव (विद्या निकेतन लाखेवाडी) यांनी पटकावले. राज्यस्तरीय वैज्ञानिक मॉडेल सादरीकरण स्पर्धेतही संपूर्ण महाराष्ट्र आणि इतर राज्यांमधून सुमारे ५५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विविध निकषांवर मॉडेलचे मूल्यांकन करून विजेत्यांची घोषणा करण्यात आली.

#रा

## इंदापुरात मोठी बंडखोरी: पवारांच्या निर्णयाविरोधात होणार बंड ?

# नको आजी, नको माजी,आता आमची 'बाजी'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**इंदापूर :** शरद पवार हे आमचे विठ्ठल आहेत, ये विठ्ठला आमचे ऐका, इंदापूर विधानसभेच्या जागे संदर्भात घेतलेला निर्णय बदला, अन्यथा आम्ही बंडखोरी केल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा सोनाई परिवाराचे सर्वेसर्वा दशरथ माने यांनी आज दिला.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या संस्थापक अध्यक्ष खासदार शरद पवार यांनी इंदापूर विधानसभेचा उमेदवार म्हणून हर्षवर्धन पाटील यांची उमेदवारी निश्चित केल्यानंतर, नाराज गटाने परिवर्तन मेळाव्याचे आयोजन बाजार समितीच्या मैदानावर करण्यात आले होते. त्यावेळी दशरथ माने बोलत होते.

या परिवर्तन मेळाव्यासाठी पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक अप्पासाहेब जगदाळे, पुणे जिल्हा परिषदेचे माजी बांधकाम सभापती प्रवीण माने, कर्मयोगी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष भरत शहा, कांतीलाल झगडे, बाबासाहेब चवरे, बाळासाहेब हरणावळ, शकील सय्यद, बापू जामदार, अनिल ढावरे , विकास खिलारे , अर्शद सय्यद यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.यावेळी नको "आजी नको माजी आम्हाला हवा नवा बाजी"अशा घोषणा देत मार्केट कमिटी चे मैदान नागरिकांनी तुडुंब भरले होते. कार्यक्रमात कोणतेही सत्कार, हारतुरे, नारळ, झेंडे नव्हते तसेच सर्व सामान्य जनता स्टेजवर व नेते मंडळी खाली सतरंजीवर बसले होते.विशेष म्हणजे महिलांची लक्षणीय उपस्थिती होती.

दशरथ माने म्हणाले, खा.शरद पवार यांनी जाहीर केलेल्या उमेदवारी संदर्भात पुनश्च निर्णय घ्यावा. जर जाहीर करण्यात आलेली उमेदवारी रद्द करून पक्षातील ज्या कार्यकर्त्यांनी उमेदवारीची मागणी केली होती त्यांच्यापैकी एकाला उमेदवारी द्यावी. अन्यथा सांगली पॅटर्न सारखा इंदापूर तालुक्यातही बंडखोर उमेदवार निवडणुकीमध्ये उभा राहील. १९९५ साली बंडखोरी झाली तेव्हा मी स्वतः होतो. त्यामुळे आमच्यासाठी हा निर्णय घेणे नवीन नाही. त्यावेळी हर्षवर्धन पाटील यांना आम्ही निवडून आणले. आज परिवर्तन मेळाव्यासाठी उत्स्फूर्तपणे महिला, पुरुष कार्यकर्ते आलेले आहेत. याचेही पेक्षा जास्त घराघरांमध्ये बसलेले कार्यकर्त्यांची संख्या अधिकची आहे. पक्षाचे अध्यक्ष खा. शरद पवार यांची २९ सप्टेंबर रोजी बारामती येथील गोविंद बागेमध्ये आम्ही भेट घेतली. भेटीच्या वेळी पवार साहेबांना हात जोडून विनंती केली. साहेब, हर्षवर्धन पाटील यांना पक्षाची उमेदवारी देऊ नका. हा पट्ठ्या तंबूत घुसला तर तंबूच शिल्लक ठेवायचा नाही. आणि तसेच झाले असे माने यांनी सांगताच श्रोत्यांच्यात हास्यकल्लोळ झाला. विठ्ठल विठ्ठल नामाचा गजर करून दशरथ मानेंनी आपला आवाज खा. शरद पवारांपर्यंत आणि खा. सुप्रिया सुळे पर्यंत पोहोचवण्याचा अतोनात प्रयत्न केला. यावेळी विठ्ठल विठ्ठल नामघोष करीत सर्वांनी टाळ्या वाजवल्या. इंदापूरमध्ये झालेली बंडखोरी हि परिवर्तनासाठी असेल, नाही की कोणत्याही स्वार्थासाठी किंवा उमेदवारी साठी... हर्षवर्धन पाटील हे काँग्रेस, शिवसेना, भाजप या पक्षामध्ये होते त्यावेळी त्यांनी खाण्याशिवाय काही काम केले नाही.. हि पाटीलकी, घराणेशाही आम्हाला म्हणजे जनतेला नको आहे.आम्ही काय गवत काढायला राजकारणात आलो आहे काय?....व्वा रे पट्ठ्या असे म्हणत त्यांचा खास शैलीत हर्षवर्धन पाटलांचा समाचार घेतला.

अप्पासाहेब जगदाळे म्हणाले, आमचा आवाज कोणीही थांबू शकत नाही. कारण आम्ही इमानदार माणसे आहोत, इमानदारी ही महत्त्वाची असते, प्रामाणिकपणा महत्त्वाचा असतो. प्रामाणिकपणा आमच्यात आहे. नेता नसताना सुद्धा इंदापूर तालुक्यातील प्रामाणिक जनतेने खा. सुप्रिया सुळे यांना २६ हजार मताची आघाडी दिलेली आहे. आता ईर्षवर्धन पाटील हा पट्ठ्या म्हणतो, माझ्या रुपाने अदृश्य शक्तीने आघाडी दिली आहे. अरे कोणती रे अदृश्य शक्ती आहे.

### शेतकऱ्यांच्या प्रश्नावर जाणीवपूर्वक डोळे झाक...

● उपनगराध्यक्ष भरत शहा म्हणाले की, तालुक्यातील शेतकऱ्यांच्या प्रश्नावर जाणीवपूर्वक डोळे झाक आजीमाजी लोकप्रतिनिधी कडून झाली कारण कारखाना प्रश्नावर मतदारांची नाराजी हर्षवर्धन पाटील यांच्या वर जात असेल तर लोकप्रतिनिधी म्हणून भरणे यांनी ती सोडविली नाही किंवा सोडविण्याचा प्रयत्न केला नाही तसेच भरणे यांच्या वर मतदारांची नाराजी जात असेल तर हर्षवर्धन पाटील यांनी तो प्रश्न सोडवला नाही.या मध्ये सर्व सामान्य माणसाला व शेतकरयांना झळ सोसावी लागली.तालुक्यात उत्तम प्रशासक व जनताभिमुख निर्णय घेतले गेले नाहीत म्हणून परिवर्तन मेळाव्याचे माध्यमातून सर्वसामान्य जनतेला अपेक्षित असणारा भावी आमदाराची मागणी होत आहे.

> "तालुक्यात पुर्वी जातीपातीचे राजकारण नव्हते.पण आताच्या निवडणुका केवळ जात व पैशावर होत आहेत. त्यामुळे ज्या ज्या लोकांनी तालुक्याचे नेतृत्व केले त्यांचे आदर्श मातीमोल ठरविले जात आहेत" — बाबासाहेब चवरे

## बिबट्या नसबंदी जनहीत याचिका उच्च न्यायालयात दाखल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लोणी-धामणी :** दत्तात्रयनगर पारगाव (ता. आंबेगाव) येथील भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याने महाराष्ट्र राज्याचे सहकारमंत्री व कारखान्याचे संस्थापक-संचालक सहकार मंत्री दिलीपराव वळसे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली संचालक मंडळ सभेत घेतलेल्या निर्णयानुसार व वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये जाहीर केल्याप्रमाणे उच्च न्यायालय, मुंबई येथे बिबट्या नसबंदी जनहित याचिका दाखल केली असल्याची माहीती कारखान्याचे चेअरमन बाळासाहेब बेंडे पाटील यांनी दिली आहे.


**ग्रामपंचायत वरुडे, ता. शिरूर, जि. पुणे**
**जाहिर निविदा सूचना क्र. बी १/३/२०२४-२५ (प्रथम वेळ)**

सरपंच ग्रामपंचायत वरुडे, ता. शिरूर हे जिल्हा परिषद कडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदाराकडून Percentage Rate Tender दोन लिफाफा पद्धतीने पुढील कामांची जाहिर निविदा मागवित आहेत.

| अ नं | कामाचे नाव | निविदा रक्कम रु. | बयाना रक्कम रु. | निविदा फी रु. | आवश्यक ठेकेदार वर्ग | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | रोहिदासनगर वरुडे येथे पेव्हर ब्लॉक बसविणे | ११९७४३/- | सूट | २३६/- | जि. प. पुणे नोंदणीकृत सु.बे.अ. | ६ महिने |

१. सदर संपूर्ण निविदा प्रक्रिया ग्रामपंचायत वरुडे, ता. शिरूर कार्यालय येथे होईल. सदर निविदेसंदर्भात निविदा नोटीस प्रसिद्धी, सूचना, शुद्धीपत्रके इ. माहिती ग्रामपंचायत करणे वरुडे कार्यालय येथील नोटीस बोर्डवर उपलब्ध आहे.
२. वरील कामाची निविदा प्रपत्रे ग्रामपंचायत कार्यालय येथे उपलब्ध करून देण्यात आली आहेत. सदर निविदा प्रपत्रे, अटी, शर्ती इ. ग्रामपंचायत वरुडे कार्यालय येथे दिनांक ११/१०/२०२४ रोजी १०.३० वा. ते दिनांक १६/१०/२०२४ चे १७.०० वा. पर्यंत ग्रा.पं तीने प्रमाणित केलेले कोरे निविदा फॉर्म विक्री करणेत येतील.
३. वरिल कामाच्या निविदा दिनांक ११/१०/२०२४ रोजी १०.३० वा. ते दिनांक १६/१०/२०२४ चे १७.०० वा पर्यंत ग्रामपंचायत वरुडे कार्यालयात सादर करता येतील.
४. ग्रामपंचायत मार्फत उपलब्ध करून दिलेल्या निविदा फॉर्म सोबतच्या सूचना पत्रामधील अटी व शर्ती निविदाधारकास बंधनकारक राहतील.
५. जाहिर निविदा दि. १७/१०/२०२४ रोजी सकाळी ११.०० वा. ग्रामपंचायत कार्यालयात उघडणेत येतील. सदर दिवशी जाहिर निविदा उघडणे शक्य न झाल्यास कार्यालयाच्या वेळेच्या सोयीनुसार उघडणेत येतील.

सही/-
**ग्रामसेवक**
ग्रामपंचायत वरुडे ता. शिरुर, जि.पुणे.

सही/-
**सरपंच**
ग्रामपंचायत वरुडे ता. शिरुर, जि.पुणे.


## मंदिर संस्कृती उपासक; गुरव समाजाला शेकडो ट्रस्ट मधून बेदखल करण्याचे डाव; जेष्ठ विधीज्ञचे मत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुरंदर :** महाबळेश्वरसह महाराष्ट्रातील हजारो एकर इनामी जमिनी हडपणे आणि शेकडो ट्रस्ट मधून गुरव समाजाला बेदखल करणे याला शासनाची मुक संमती दिसते. म्हणून यावर आता जनहित याचिका हाच मार्ग आहे. गुरव समाज आता कायदेशीर लढाईसाठी सज्ज झाला आहे. आणि याकामी सर्वोच्च न्यायालयातील ज्येष्ठ विधीज्ञ अश्विनीकुमार उपाध्याय यांनी सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले आहे . तर मंदिर चालवणे हे सरकारचे काम नव्हे त्यामुळे सरकारने यात लुडबुड करू नये'. असे गुरव समाजाचे डॉ नितीन ढेपे यांनी सांगितले.पुण्यात एका व्याख्यानासाठी आले असता गुरव समाजाच्या शिष्टमंडळाने मा.अश्विनीकुमार उपाध्याय यांनी भेट घेतली. त्यावेळी ज्येष्ठ नेते श्री प्रतापराव गुरव यांच्या मार्गदर्शना खाली रवींद्र क्षीरसागर, विनोद शिंदे, शीतल शिंदे नगरसेवक, राजेंद्र आवटे, ज्ञानेश्वर क्षीरसागर, तसेच परशुराम सेवा संघाचे सुनिल कुलकर्णी आणि इतर उपस्थित होते.

महाराष्ट्रामध्ये हजारो मंदिरे आहेत आणि हजारो वर्षापासून या मंदिरामध्ये पूजा अर्चा करण्यासाठी ब्राम्हण, जंगम समाजा बरोबर प्रामुख्याने गुरव समाजाने अनेक पिढ्या स्वतःला वाहून घेतले आहे. हिदू धर्म, संस्कृतीचे पालन, जतन ,रक्षण करण्यात गुरव पुजारी समाजाचे मोठे योगदान आहे.

राजे रजवाड्यापासून ब्रिटिशां पर्यंत ही मंदिर व्यवस्था अबाधित होती. स्वातंत्र्यानंतर मात्र या मंदिर व्यवस्थेमध्ये राजकीय शक्तींनी तेथील उत्पन्न आणि इनामी जमिनी यावर डोळा ठेऊन हस्तक्षेप सुरू केला. परंपरागत मंदिर, मठ व्यवस्थापन प्रणालीतील पुजारी लोकांना बाजूला सारून त्या ठिकाणी सरकारी बाबू आणि शासनाचे पिट्टू बसवण्याची प्रथा सुरू झाली. देवस्थान ट्रस्टच्या माध्यमातून मंदिर आणि जमिनी बळकावण्याचा अधिकृत पायंडा महाराष्ट्रात पडला आहे. दुर्दैवाने त्याला राज मान्यता मिळत आहे.

मंदिर व्यवस्थापन हे सरकारचे काम नाही तर सेवाधारी पुजारी, मानकरी सेवेकरी आणि भक्त व भाविक यांनीच मिळून ते चालवले पाहिजे असे ठणकावून सांगणाऱ्या लोकांत ज्येष्ठ श्रेष्ठ कायदे तज्ञ सुब्रमण्यम स्वामी यांच्या सुद्धा बरोबर सर्वोच्च न्यायालयातील ज्येष्ठ अधिवक्ता अश्विनीकुमार उपाध्याय यांचा समावेश होतो. परंपरागत मंदिर संस्कृती , पूजा, सेक्युलर शब्दाची व्याख्या, आदी अनेक विषयावर त्यांनी अनेक जनहित याचिका दाखल केल्या आहेत.


जाहीर बी-१ निविदा सुचना क्रं. १५/२०२३ २०२४
**पंचायत समिती शिरुर ता. शिरुर जि. पुणे**
निविदा नोटीस

पुणे जिल्हा परिषदेच्या वतीने गटविकास अधिकारी (उ.श्रे.) पंचायत समिती शिरुर, ता. शिरुर यांचे तर्फे खालील कामाचे नावासमोर नमुद केलेप्रमाणे पुणे जिल्हा परिषदेकडील योग्य त्या कंत्राटदाराकडून खाली नमुद कामाच्या सीलबंद निविदा दोन लिफाफा पध्दतीने मागविणेत येत आहेत. को-या निविदेचा नमुना ग्रामीण पाणी पुरवठा बांध. उपविभाग शिरुर, पंचायत समिती शिरुर, ता. शिरुर जि. पुणे या कार्यालयातून दिनांक ११/१०/२०२४ ते दि १८/१०/२०२४ पर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.०० ते संध्या ५.०० वाजे पर्यंत देण्यात येतील. सीलबंद भरलेल्या निविदा मा. गटविकास अधिकारी (उ.श्रे.) पंचायत समिती शिरुर ता. शिरुर जि. पुणे येथे दि.१९/१०/२०२४ रोजी दुपारी २.०० वाजे पर्यंत स्विकारणेत येतील आणि शक्य झाल्यास त्याच दिवशी किंवा त्यांनतर कार्यालयीन सोईच्या दिवशी सक्षम समिती समोर उघडणेत येतील.

| | कामाचे नाव | निविदा रक्कम | इसारा रक्कम | निविदा फी | कामाचा कालावधी | कंत्राटदार वर्गीकरण |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | टाकळीभिमा पाचणे वस्ती गणेश मंदिर येथे सुशोभिकरण | ४,२४,८६४/- | सुट | ५९० रु. | ३ महिने | सुशिक्षित बेरोजगार |

**निविदेच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे :**

१) को-या निविदा संघासाठी अर्जा सोबत उपरोक्त कामाचे नावासमोर नमुद केले प्रमाणे योग्य त्या वर्गाचे नोंदणी प्रमाणपत्र मुळ प्रती दाखविले नंतर त्यांना कोरे निविदा संध्यासाठी भरणा चलन तयार करुन देणेत येईल.
२) मा. गटविकास अधिकारी शिरुर यांचे कडे मिळतील.
३) सीलबंद निविदेच्या लिफाफा क्रं. १ मध्ये खालीलप्रमाणे कागदपत्रांच्या सत्यप्रती सादर कराव्या लागतील.
अ) जि. प. कडील कंत्राटदार नोंदणी प्रमाणपत्र
आ) निविदा फॉर्म फी भरणा चलनाची प्रत.
इ) इसारा रक्कम कोणत्याही बँकेवरील धनाकर्ष डी डी / धनादेश गटविकास अधिकारी (उ.श्रे) पंचायत समिती शिरुर. या नावे काढणेत आलेला धनाकर्ष (DD) बयाणा रक्कम सुट प्रमाणपत्र ग्राहय धरले जाणार नाही. तसेचे सु.बे.अ. व म.स.स यांनी ही खुल्या गटातील निविदा असल्याने बयाणा रक्कम भरणे बंधन कारक आहे. ई) प्राप्तीकर पॅनकार्डव जी एस टी प्रमाणपत्र शेवटचे तीन वर्षाचे आय टी आर PTRA and PTC.
टिप :- उपरोक्त कागदपत्रांपैकी एकही कागदपत्र सादर केलेले नसल्यास सदर ठेकेदाराची निविदा बाद करणेत येईल. व आर्थिक लिफाफा (Financial Bid ) उघडणेत येणार नाही. तसेच कोणतेही कागदपत्र सादर करणेस कोणतीही वाढीव मुदत अथवा सवलत दिली जाणार नाही.
४) सील बंद निविदेच्या लिफाफा क्रं. २ मध्ये प्रत्येक पानावर ठेकेदाराचा स्वतःचा सही व शिक्का असलेला तसेच दर अंकी व अक्षरी लिहीलेला खात्याने साक्षंकित करुन दिलेला निविदा फॉर्म सादर करावा.
५) अ) पात्र निविदा धारकांकडून विहीत सुरक्षा अनामत रक्कम ही कामाचा करारनामा करते वेळी गटविकास अधिकारी (उ.श्रे) पंचायत समिती शिरुर यांचे नांवे ठेव पावती स्वरुपात /चलनाने रोख स्वरुपात घेतली जाईल व उर्वरीत अनामत रक्कम प्रथम देयकांतून कपात केली जाईल.
Incurance towards labour is considered in rate abstract of DSR item. The constract or shall Produce the Labour insurance policy, else following amount will be deducted from his first R.A_Bill A)Work Value upto २५.०० Lakhs :-१.००% and B) Work Value above २५.०० Lakhs :- ०.५०%.
६) निविदा देकार १% पर्यंत कमी असल्यास अतिरिक्त सुरक्षाअनामत भरण्याची आवश्यकता नाही ७) निविदा धारकाचा देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा १.०१% पासून ते १० % पर्यंत कमी दराचा असेल तर ठेकेदारांनी निविदाधीन कामाच्या किंमतीच्या १% एवढया रकमेचा गटविकास अधिकारी, पंचायत समिती शिरुर येथे देय असलेला खाते क्रं. २६ / १ या नावाने काढलेला धनाकर्ष (डी. डी) (Demand Draft) परफॉर्मन्स सिक्युरिटी म्हणून लिफाफा क्रं. २ मध्ये सादर करावा. (उदा. १ ते १०.००% पर्यंत कमी दर १% रक्कम)
७) निविदा धारकाचा देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा १.०१% पासून ते १० % पर्यंत कमी दराचा असेल तर ठेकेदारांनी निविदाधीन कामाच्या किंमतीच्या १% एवढया रकमेचा गटविकास अधिकारी, पंचायत समिती शिरुर येथे देय असलेला खाते क्रं. २६/१ या नावाने काढलेला धनाकर्ष (डी. डी) (Demand Draft) परफॉर्मन्स सिक्युरिटी म्हणून लिफाफा क्रं. २ मध्ये सादर करावा. (उदा.१ ते १०.००%पर्यंत कमी दर १% रक्कम)
८) निविदाधारकाचा देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा १० % पेक्षा जास्त दराने कमी असेल तर देकार १०% पेक्षा जेवढ्या जास्त दराने कमी आहे तेवढया रकमेचा वरील (४) प्रमाणे येणा-या रकमेसह पुणे येथे देय असलेला मुख्य लेखा व वित्त अधिकारी जि.प.पुणे खाते क्रं. २६/१ या नावाने काढलेला धनाकर्ष (डी. डी) (Demand Draft) जो परफॉर्मन्स सिक्युरिटी म्हणून लिफाफा क्रं. २ मध्ये सादर करावा. (उदा. १०% पर्यंत कमी दर १% व (१० %ते १५ % पर्यंत कमी दरनो प्रति टक्का १% दराने) ५ % असे एकूण ६ % रक्कम)
९) निविदा देकार अंदाजपत्रकीय दरपेक्षा १५ % पेक्षा कमी दराचा असल्यास देकार १५% पेक्षा जेवढया जास्त दराने कमी आहे. त्याच्या दोन पटीने वरील (५) प्रमाणे येणा-या रकमेसह मा. गटविकास अधिकारी पंचायत समिती शिरुर खाते क्रं. २६/१ या नावाने काढलेला धनाकर्ष (डी. डी) (Demand Draft) परफॉर्मन्स सिक्युरिटी म्हणून लिफाफा क्रं. २ मध्ये सादर करावा. (उदा. १५ पर्यंत कमी एकूण ६% रक्कम) व १९% पर्यंत कमी दर (१९ % - १५ % ) ४% X२ = ८%) असे एकूण १४% रक्कम सदर डी. डी. सादर केलेला नसलेस निविदा अवैध ठरविणेत येईल. १०) निविदा प्रपत्रातील व निविदा नोटीसमधील सर्व अटी व शर्ती कंत्राटदारांवर बंधनकारक राहतील. तसेच प्राप्त निविदांपैकी कोणतीही निविदा अथवा सर्व निविदा कोणतेही कारण ने देता फेटाळण्याचा अधिकार निम्न स्वाक्षरीत यांनी राखून ठेवला असून निविदा पाठविणा-या कोणत्याही व्यक्तीला/संस्थेला फेटाळल्य येणार नाही. उल्याबद्दल स्पष्टीकरण मागता येणार नाही.

**गटविकास अधिकारी (उ.श्रे)**
**पंचायत समिती शिरुर**


## डॉ. कल्याणी पवार यांच्या पुढाकाराने घरकाम करणाऱ्या मावशींचा साडी चोळी देऊन सन्मान

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**राजगुरूनगर** नवरात्रोत्सवात देवीच्या मूर्तीला अर्पण केलेल्या साडया नदीत विसर्जित केल्या जातात. खेड तालुक्यातील पूर येथील द्वारका सेवा फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. कल्याणी पवार यांनी 'एक हाथ मदतीचा' या उपक्रमा अंतर्गत या साडया गरजवंताना देण्याचे आवाहन केले. वाघोली येथील ऑक्सी अल्टीमा सोसायटीतील सदनिकाधारकांनी यास प्रतिसाद देत घरकाम करणाऱ्या मावशींना या साडी चोळी देऊन सन्मानित केले. याप्रसंगी गणेश मस्के, शिवरत्न बाडगुदे, संदीप तांबे, अनुराग पवार, मौनेश बडीगेर, रुपाली कराळे, संजीव वेदपाठक, गोविंद पाल, नवनाथ थोरवे, कैलास कुरळे आदी उपस्थित होते. यावेळी मान्यवरांनी डॉ. पवार यांच्या कार्याचे कौतुक करून फाउंडेशनला विविध उपक्रमांतून मदत करण्याचे आश्वासन दिले.





सिडको शहरांचे शिल्पकार
सत्यमेव जयते
नरेंद्र मोदी
पंतप्रधान
एकनाथ शिंदे
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य
नांदी अभिनव प्रकल्पांची, हमी उज्ज्वल भविष्याची
सिडकोच्या विविध प्रकल्पांचे भूमिपूजन,
उद्घाटन तथा लोकार्पण
शुभहस्ते
एकनाथ शिंदे, मुख्यमंत्री
वेळ व दिनांक
शुक्रवार, ११ ऑक्टोबर २०२४ रोजी दुपारी १२.३० वाजता
स्थळ
सिडको प्रदर्शन केंद्र, सेक्टर-३०, वाशी, नवी मुंबई
नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ येथे भारतीय वायु दलातर्फे सी-२९५ एअरक्राफ्टचे लँडिंग आणि सुखोई-३० एअरक्राफ्टचे फ्लायपास्ट
२६,५०२ सदनिकांच्या महागृहनिर्माण योजनेचा प्रारंभ
महाराष्ट्र भवनचे भूमिपूजन
१८ होलच्या आंतरराष्ट्रीय खारघर व्हॅली गोल्फ कोर्सचे उद्घाटन
नैना नगर रचना परियोजना ८ ते १२ मधील पायाभूत सुविधा विकास कामांचे भूमिपूजन
सेंटर ऑफ एक्सलन्स येथील दर्शक गॅलरीचे उद्घाटन
ठाणे नागरी पुनरुत्थान योजना (नवीन ३८३३ सदनिका) भूमिपूजन
ईर्शाळवाडी पुनर्वसन प्रकल्पाचे लोकार्पण
पश्चिम परिधीय मार्ग (नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ) भूमिपूजन
एकनाथ शिंदे
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य
देवेंद्र फडणवीस
उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य
अजित पवार
उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य
संजय शिरसाट
अध्यक्ष, सिडको
सिडको शहरांचे शिल्पकार
शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादित
नोंदणीकृत कार्यालय: निर्मल, २रा मजला, नरिमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१. दूरध्वनी: ०२२-६६५००९०० फॅक्स:०२२-२२०२२५०९
मुख्य कार्यालय: सिडको भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई - ४००६१४. दूरध्वनी: ०२२-६७९१८१०० फॅक्स: ०२२६७९१८१६६
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/२१३/२०२४-२५
www.cidco.maharashtra.gov.in



“ भारतीय क्रिकेटपटू हे फक्त मायदेशात अव्वल दर्जाचे नाहीत, तर जगामध्ये सर्वोत्तम आहेत. त्यांच्याकडे आमच्यापेक्षा जास्त अनुभव आहे. आमच्यापेक्षा चांगला खेळ त्यांच्याकडे करण्याची क्षमता आहे. भारतीय संघ सातत्याने १८० ते २०० धावा करीत असतो. आम्हाला आमच्या देशामध्ये १३० ते १४० धावांपर्यंत मजल मारता येते. आमच्या येथील खेळपट्ट्या भारतासारख्या नाहीत. आगामी काळात यामध्ये सुधारणा झाल्यास आम्हालाही १८० ते २०० धावा करता येऊ शकतील. तसेच, प्रतिस्पर्ध्यांना रोखता येऊ शकेल.

— तस्कीन अहमद

## पोलीस उपअधिक्षक म्हणून पदभार स्विकारला

# 'दबंग' मोहम्मद सिराज

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** भारताचा क्रिकेटपटू मोहम्मद सिराज याने शुक्रवारी तेलंगणाचे पोलीस महासंचालक (डीजीपी) यांना अहवाल दिल्यानंतर अधिकृतपणे पोलीस उपअधीक्षक (डीएसपी) म्हणून पदभार स्वीकारला. मोहम्मद सिराजसोबत खासदार एम. अनिल कुमार यादव, खासदार आणि TGMREIS चे अध्यक्ष मोहम्मद फहीमुद्दीन कुरेशी यावेळी होते. मुख्यमंत्री ए. रेवंत रेड्डी यांनी भारताचा जलदगती गोलंदाज सिराजला प्रतिष्ठित गट-१ सरकारी नोकरी मिळेल, असे याआधी जाहीर केले होते. मोहम्मद सिराज आज कर्तव्यावर रुजू झाला.

भारताच्या ट्वेंटी-२० वर्ल्ड कप विजेत्या संघाचा तो सदस्य होता. त्यानंतर हैदराबादमध्ये दाखल झाल्यावर त्याची जंगी मिरवणूक काढण्यात आली होती. ३० वर्षीय सिराजने २९ कसोटी, ४४ वन डे आणि १६ ट्वेंटी-२० सामन्यांत भारताचे प्रतिनिधित्व करताना १६३ आंतरराष्ट्रीय विकेट्स घेतल्या आहेत. कसोटी ( ६-१५) व वन डे ( ६-२१) फॉरमॅटमध्ये सहा विकेट्स ही त्याची सर्वोत्तम वैयक्तिक कामगिरी आहे.

हैदराबादमधील ऑटो रिक्षाचालकाच्या मुलाचा भारतीय संघापर्यंतचा प्रवास थक्क करणारा आहे. सातव्या इयत्तेपासून त्याने क्रिकेट खेळण्यास सुरूवात केली. २०१५ मध्ये त्याने पहिल्यांदा गोलंदाजी केली आणि २०१७ मध्ये त्याला इंडियन प्रीमिअर लीगमध्ये २.६ कोटीचा करार मिळाला. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने त्याला करारबद्ध केले. महिन्याभरात त्याने भारताकडून ट्वेंटी-२० क्रिकेटमध्ये न्यूझीलंडविरुद्ध पदार्पण केले.

## कसोटीत प्रथमच ५०० धावा केल्यानंतर डावाने पराभव

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** कसोटी क्रिकेटच्या इतिहासात पहिल्यांदाच एखादा संघ ५०० हून अधिक धावा करूनही सामना हरला. पाकिस्तान आणि इंग्लंड यांच्यात मुलतान येथे झालेल्या कसोटी सामन्यात हा विक्रम झाला.

या कसोटीत पाकिस्तानने पहिल्या डावात ५५६ धावा केल्या होत्या. यानंतर इंग्लंडचा डाव सुरू झाला. हॅरी ब्रूकच्या तिहेरी आणि जो रूटच्या द्विशतकाच्या जोरावर इंग्लंडने ८२३ धावा केल्या. इंग्लंडने पाकिस्तानवर २६७ धावांची आघाडी घेतली. पाकिस्तान दुसऱ्या डावात २२० धावांत सर्वबाद झाला. इंग्लंडने हा सामना एक डाव आणि ४७ धावांनी जिंकला. पहिली अधिकृत कसोटी १८७७ मध्ये पहिल्यांदा खेळली गेली. त्यानंतर प्रथमच एखाद्या संघाला अशा प्रकारे पराभव पत्करावा लागला आहे. पाकिस्तान संघाला गेल्या ४४ महिन्यांपासून घरच्या मैदानावर एकही कसोटी सामना जिंकता आलेला नाही. मुलतान कसोटी जिंकून इंग्लंडने ३ सामन्यांच्या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे.

## नवरात्र उत्सव उपवास रेसिपी

### ॲपल सफरचंद + खजूर खीर




**साहित्य :** मध्यम आकाराचे सफरचंद, दोन कप दुध,चार & पाच खजूर (बिया काढलेल्या) व चार चमचे साखर.

**कृती :** प्रथम दुध थोडंसं आटवून घ्याव.दोन कप दुध, दुधात अटवताना खजूर बारिक करून घालावी. दुधात साखर अगदी कमी घालावी. दुध थंड करण्यासाठी ठेवावे. एक मध्यम आकाराचे सफरचंद घ्यावे, सफरचंदाची साल काढावी व बारीक तुकडे करून एक चमचा तुपावर ते परतून घ्यावे.

जेंव्हा खायला घ्यायचे आहे,वाढायचे आहे तेंव्हा वाटीत अटवलेले दुध घ्यावे व त्यात परतलेले सफरचंद घालावे. मस्त उपवासाच्या गोड पदार्था वर ताव मारावा.

-निवेदिता कच्छवा

## सहारा क्रिकेट अकादमी संघाचा अंतिम फेरीत प्रवेश



**पुणे :** चॅम्प्स स्पोर्टस फाऊंडेशन यांच्या वतीने आयोजित चॅम्प्स करंडक १२ वर्षाखालील क्रिकेट स्पर्धेत साखळी फेरीत ओजस शेंद्रे(नाबाद ५८ धावा व ३-१५) याने केलेल्या अष्टपैलू खेळीच्या जोरावर सहारा क्रिकेट अकादमी संघाने व्हिबग्योर स्कूल बालेवाडी संघाचा ८ गडी राखून पराभव करत अंतिम फेरीत प्रवेश केला. सहारा क्रिकेट अकादमी संघाने सलग तीन विजयासह अंतिम फेरीत प्रवेश केला. धायरी येथील सहारा क्रिकेट मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत साखळी फेरीत प्रथम फलंदाजी करताना अर्जुन पवार ३३, शौनक डी १८, रेयांश म्हसे १३, अर्णव नल्हे १३ यांनी केलेल्या धावांच्या जोरावर व्हिबग्योर स्कूल बालेवाडी संघाने २५ षटकात ९ बाद १२८ धावा केल्या. सहारा क्रिकेट अकादमीकडून श्रेयस कुंभार(३-९), ओजस शेंद्रे(३-१५), अद्वैय तरले(१-६), आयुध सुर्यवंशी(१-१८)यांनी सुरेख गोलंदाजी केली. हे आव्हान सहारा क्रिकेट अकादमी संघाने १६.३ षटकात २ बाद १२९ धावा करून पूर्ण केले. यात ओजस शेंद्रेने ४४ चेंडूत १२ चौकाराच्या मदतीने नाबाद ५८ धावा, गजानन तडवळकरने ३५ चेंडूत ६ चौकारासह नाबाद ३५ धावा काढून संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला.

## बीसीसीआयने देशांतर्गत क्रिकेट स्पर्धेतील नियमांमध्ये केले बदल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**नवी दिल्ली :** भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) आजपासून सुरू झालेल्या रणजी ट्रॉफीसह देशांतर्गत सामन्यांच्या नियमांमध्ये बदल केले आहेत. हे नियम खेळाच्या विविध परिस्थीतीमध्ये लागू होतात, ज्यामध्ये मध्येच डाव सोडणे, चेंडूशी छेडछाड, चौकार स्कोअरिंग आणि कर्नल सीके नायडू ट्रॉफी (U-23)मध्ये गुण वाटप यांचा समावेश होतो.

सर्वात महत्वाचे म्हणजे डावाच्या मध्यात फलंदाजांना आता रिटायर्ड हर्ड होऊन परतता येणार नाही. दुखापत, आजार किंवा अपरिहार्य परिस्थितींव्यतिरिक्त इतर कारणांमुळे निवृत्त झालेला कोणताही फलंदाजाला ताबडतोब बाद केले केला जाईल. महत्त्वाचे म्हणजे, विरोधी कर्णधाराच्या संमतीनेही त्यांना फलंदाजीला परतण्याची परवानगी दिली जाणार नाही. हा नियम सर्व कसोटी आणि मर्यादित षटकांच्या सामन्यांना लागू होतो.

बीसीसीआयच्या आदेशात स्पष्टपणे असे म्हटले आहे, “दुखापत, आजार किंवा अपरिहार्य कारणाशिवाय इतर कोणत्याही कारणास्तव रिटायर्ड हर्ड होऊन परतणारा फलंदाज लगेचच बाद समजला जाईल आणि संमती घेऊनही फलंदाजीला परतण्याचा पर्याय नसेल. विरोधी कर्णधाराचा.

बॉल टॅम्परिंगला आळा घालण्यासाठी बीसीसीआयने कडक नियम लागू केला आहे. चेंडूवर थुंकी लावल्यास चेंडू बदलणे अनिवार्य केले आहे. याव्यतिरिक्त, नियम उल्लंघनासाठी जबाबदार असलेल्या संघाला दंड आकारला जाईल. जर ओव्हर थ्रो केलेला चेंडू चौकार गेला तर चार अतिरीक्त धावा मिळतील परंतु खेळाडूंनी धावून काढलेल्या धावा मोजल्या जाणार नाहीत.

## महाराष्ट्राचा उत्कर्ष पुणेवार इंडिया नंबर १, तर नैतिक वर्मा दुसऱ्या क्रमांकावर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**पुणे :** जम्मू येथे संपन्न झालेल्या ३६ व्या सब जुनियर राष्ट्रीय टेनिक्वाईट स्पर्धेत महाराष्ट्राच्या उत्कर्ष पुणेवार याने आपला सहकारी नैतिक वर्मा याचा अंतिम फेरीत २१ - १९, २१ -१८ असा पराभव करून राष्ट्रीय स्पर्धेचे एकेरीतील विजेतेपद मिळवले. त्याआधी उपांत्य फेरीत उत्कर्ष पुणेवार याने तमिळनाडूच्या पी. बाला दर्शन याचा २१- १३ , २१ -१४ असा सरळ पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला तर नैतिक वर्मा याने केरळच्या अदियांद टी याचा २१ - ७, २१- ९ असा सरळ पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश मिळवला होता.

याबरोबरच मुलांच्या सांघिक स्पर्धेमध्ये सुद्धा महाराष्ट्राने आंध्रप्रदेशचा ३-० असे हरवून ब्रॉझ पदक पटकावले. मुलींच्या दुहेरीत ईशीका मिश्रा व अंकीता बोंबाटे यांनी चतुर्थ क्रमांकावर तसेच मिश्र दुहेरी मध्येही कृष्णा चिलेवार व आस्था मिश्रा या जोडीने तामिळनाडूच्या एस.अंबुसेलवन व आर. सुदार यांचा २१-१७, २१-१५ असा पराभव करून ब्रांझ पदक पटकावले. संघाचे व्यवस्थापक चंद्रकांत पिंपळे .यशवंत वेदपाठक तसेच प्रशिक्षक महेश पोहेरवार व स्नेहा खोंड यांचे व संघाचे सचिव महाराष्ट्र टेनीक्वाईट असोसिएशन अनिल वरपे यांनी अभिनंदन केले.

## आंतरक्लब क्रिकेट स्पर्धेचे १३ ऑक्टोबरपासून आयोजन

**पुणे :** एसए-आरके अजिंक्यपद करंडक’ १२ वर्षाखालील मुलांच्या आंतरक्लब क्रिकेट (२५ षटके) स्पर्धेचे आयोजन एसए-आरके ॲकॅडमी तर्फे करण्यात आले आहे. २५-२५ षटकांची ही स्पर्धा १३ ऑक्टोबर ते २५ डिसेंबर २०२४ या कालावधीत होणार आहे. ही स्पर्धा मांजरी येथील पीजी क्रिकेट मैदान आणि हांडेवाडी येथील आरके स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स मैदानावर होणार आहे. या स्पर्धेबाबत अधिक माहिती देताना स्पर्धेचे संचालक रफिक करोटगी आणि शिवलिंग अन्शीरे यांनी सांगितले की, साखळी आणि बाद फेरीमध्ये होणाऱ्या या स्पर्धेत पुण्यासह पनवेल आणि गढहिंगल्ज् येथील एकूण १६ संघ सहभागी होणार आहेत. या आंतरक्लब स्पर्धेत पुण्यातील खेळाडूंना आपले कौशल्य दाखविण्यची संधी मिळणार आहे. लाल चेंडूवर होणाऱ्या या स्पर्धेत एकूण ४३ सामने होणार आहेत. हे सर्व सामने शनिवार आणि रविवार तसेच मुलांच्या शाळांच्या सुट्टयांमध्ये घेण्यात येणार आहेत. स्पर्धेत आयोजक एसए-आरके क्रिकेट ॲकॅडमी अ आणि ब, तसेच पनवेल येथील करण क्रिकेट ॲकॅडमी आणि गढहिंगल्ज् येथील सुनिल चौगुले क्रिकेट ॲकॅडमी यांसह पुण्यातील विराग क्रिकेट ॲकॅडमी, ब्रिलीयंट्स स्पोटर्स ॲकॅडमी, शिरूष स्पोटर्स क्लब, विनर्स क्रिकेट क्लब, क्रिकेट नेक्स्ट ॲकॅडमी, स्कोरर स्पोटर्स ॲकॅडमी, लिजंड्स क्रिकेट ॲकॅडमी, ट्रिनिटी क्रिकेट ॲकॅडमी, वैभव क्रिकेट ॲकॅडमी, सिल्व्हर क्रिकेट ॲकॅडमी, ढोलेपाटील क्रिकेट ॲकॅडमी, पुणे पोलिस बॉईज, आर्यन्स् क्रिकेट ॲकॅडमी, ए स्क्वेअर क्रिकेट ॲकॅडमी हे संघ विजेतेपदासाठी झुंझणार आहेत. स्पर्धेतील विजेत्या संघाला आणि उपविजेत्या संघाला मेडल्स् आणि करंडक मिळणार आहे. याशिवाय सर्वोत्कृष्ट फलंदाज, गोलंदाज, क्षेत्ररक्षक, यष्टीरक्षक याबरोबरच मालिकेचा सर्वोत्कृष्ट खेळाडू यांना रोख पारितोषिक आणि करंडक मिळणार आहे. प्रत्येक सामन्यासाठी सामनावीर अशी पारितोषिकांची रेलचेल स्पर्धेत असणार आहे.

## टेनिस स्कुल ब्राँझ सिरीज २०२४ स्पर्धेत ८६ खेळाडूंचा सहभाग

**पुणे :** पुणे मेट्रोपॉलिटन जिल्हा टेनिस संघटना(पीएमडीटीए) यांच्या तर्फे पीएमडीटीए मानांकन ओम दळवी मेमोरियल टेनिस स्कुल ८ व १० वर्षाखालील ब्रॉन्झ सिरिज टेनिस २०२४ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा ओम दळवी मेमोरियल टेनिस स्कुल, औंध येथील टेनिस कोर्टवर १२ ते १४ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत होणार आहे. स्पर्धेतील विजेत्या व उपविजेत्या खेळाडूंना करंडक व प्रशस्तिपत्रक अशी पारितोषिके देण्यात येणार आहे. प्रणव वाघमारे यांची स्पर्धा निरिक्षक म्हणून निवड करण्यात आली असल्याचे स्पर्धा संचालक उमेश दळवी यांनी सांगितले.

## वेदांगी व निधी यांचे सनसनाटी विजेतेपद; ईशान खांडेकरला तिहेरी मुकुट

# पुष्कर चक्रदेव व श्रेया कोठारी यांना एकेरीत अजिंक्यपद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क







**पुणे :** पुष्कर चक्रदेव व श्रेया कोठारी यांनी तेरा वर्षाखालील मुले व मुली गटाच्या एकेरीत विजेतपद मिळविले आणि बालुफ ऑटोमेशन चषक जिल्हास्तरीय पाचव्या मानांकन टेबल टेनिस स्पर्धेत कौतुकास्पद कामगिरी केली. वेदांगी जुमडे व निधी भांडारकर यांनी अनुक्रमे १५ व १७ वर्षाखालील मुलींच्या गटात अजिंक्यपद मिळवीत आश्चर्यजनक कामगिरी केली. ईशान खांडेकर याने तिहेरी मुकुट पटकाविला.

ही स्पर्धा पुणे जिल्हा टेबल टेनिस संघटना व फोनिक्स फ्लायर्स स्पोर्ट्स अकादमी यांनी संयुक्तपणे मेट्रो सिटी टेबल टेनिस सभागृह (कोथरूड) येथे आयोजित केली होती.

मुलांच्या १३ वर्षाखालील गटात सहाव्या मानांकित पुष्कर चक्रदेव याने अग्रमानांकित धैर्य शहा याच्यावर आश्चर्यजनक विजय नोंदविला. त्याने हा सामना ७-११,११-५, ११-५, ११-५ असा जिंकताना अष्टपैलू खेळाचा प्रत्यय घडविला. पहिली गेम गमावल्यानंतरही त्याने संयम व चिकाटी ठेवीत उर्वरित तीन गेम्स घेतल्या आणि विजेतेपदावर शिक्कामोर्तब केले.

मुलांच्या सतरा वर्षाखालील गटात खांडेकर याने आपला पारंपारिक प्रतिस्पर्धी व अग्रमानांकित खेळाडू कौस्तुभ गिरगावकर याच्यावर ८-११,११-६,११-५,१०-१२,११-४ अशी मात केली. या स्पर्धेतील त्याचे तिसरे विजेतेपद आहे. त्याआधी त्याने पुरूष व १९ वर्षाखालील मुले या गटातही अजिंक्यपद पटकावले होते. तो टॉस अकादमीत दीपेश अभ्यंकर यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करीत आहे.

मुलींच्या तेरा वर्षाखालील गटाच्या अंतिम फेरीत श्रेया हिने चौथ्या मानांकित शरण्या प्रधान हिच्यावर निसटता विजय नोंदविला हा सामना जिंकताना तिला खूपच संघर्ष करावा लागला. अटीतटीने झालेली ही लढत तिने ९-११,९-११, ११-८,११-९,११-५ अशी जिंकली. पहिल्या दोन गेम्स तिने गमावल्या मात्र नंतर तिने सामन्यावर नियंत्रण मिळत यश संपादन केले.

मुलींच्या पंधरा वर्षाखालील गटात बिगर मानांकित खेळाडू वेदांगी जुमडे हिने विजेते पद मिळवत सर्वांना आश्चर्याचा धक्का दिला तिने अंतिम लढतीत द्वितीय मानांकित खेळाडू आद्या गवात्रे हिचा ११-९,८-११,९-११,११-८, ११-९ असा पराभव केला.

## एसएनबीपी अखिल भारतीय हॉकी स्पर्धा; डॉन बॉस्को स्कूलकडून एसएनबीपीचे आव्हान संपुष्टात

# आर्मी बॉईज, एसजीपीसी उपांत्यपूर्व फेरीत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** गतविजेत्या आर्मी बॉईज स्पोर्ट्स कंपनीसह माजी विजेता शिरोमणी गुरुद्वारा प्रबंधक समिती (एसजीपीसी) अमृतसर आणि डॉन बॉस्को स्कूलने आठव्या एसएनबीपी अखिल भारतीय मुलांच्या (१६ वर्षांखालील) हॉकी स्पर्धेत उपांत्यपूर्व फेरी गाठली.

बालेवाडी-म्हाळुंगे येथील शिवछत्रपती क्रीडा संकुल येथे सुरू असलेल्या स्पर्धेत गुरुवारहा दिवस मात्र यजमानांच्या एसएनबीपी अकॅडमीसाठी वाईट ठरला. त्यांना डॉन बॉस्को स्कूलकडून ०-७ असा पराभव पत्करावा लागला. ई गटातील एकतर्फी सामन्यात डॉन बॉस्को स्कूलने रोहित हेमब्रम (४’), असित माझी (६’ - पीसी, २१’, ३६’), सुदीप मल्लिक (४०’) आणि आशिष लाक्रा (४३’ - पीसी, ४७’) यांच्या सर्वोत्तम कामगिरीच्या जोरावर यजमानांना डोके वर काढू दिले नाही.

तत्पूर्वी, दिवसातील पहिल्या सामन्यात २०२२ मधील विजेता शिरोमणी गुरुद्वारा प्रबंधक समितीने (एसजीपीसी) सर्वोत्तम फॉर्म राखताना ग्रासरूट्स हॉकीला ७-० अशा मोठ्या फरकाने हरवले.

शिवम शर्माने (४’, १५’ आणि ६०’) पेनल्टी कॉर्नरवरील गोल हॅटट्रिकसह आर्यन कुमारने (३६, ४५’, ४९’) तितकेच गोल करताना विजयात मोलाचा वाटा उचलला. त्याने पहिला मैदानी तर उर्वरित दोन गोल पेनल्टी कॉर्नरवर केले. सुधांशू कश्यपने (३८’).एक गोल करताना त्यांना चांगली साथ दिली. एफ गटामध्ये चुरशीच्या लढतीत, आर्मी बॉईज स्पोर्ट्स कंपनीने गगन बाबा साहिब दास अकॅडमीचे कडवे आव्हान २-१ असे मोडीत काढले. गोलशून्य मध्यंतरानंतर अर्जुन (३४’) आणि रवींद्र प्रधानने (४०’) सहा मिनिटांच्या फरकाने दोन गोल करताना आर्मी बॉईजना आघाडीवर नेले. अर्शदीप सिंगने (४७’) गगन बाबा साहिब दास अकॅडमीसाठी गोल केला तरी त्यांना प्रतिस्पर्धी संघ वरचढ ठरला. बुधवारी उशिरा झालेल्या सामन्यांत,अ गटामध्ये ध्यानचंद अकॅडमीने तामिळनाडू हॉकी अकॅडमीवर ५-० असा विजय मिळवून उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. तुषार शर्मा (५’) आणि सूरज कुमार पालमुळे (२०’) ध्यानचंद अकॅडमीने मध्यंतराला २-० अशी आघाडी घेतली.

दुसऱ्या सत्रात, सुमंत सिंग (४१’), रजतसिंग छिकारा (५५’), तुषार शर्मा (६०+’) यांनी पेनल्टी कॉर्नरवर गोल करून गोलपंचक पूर्ण केला. ब गटामध्ये पाटणा हॉकी इटावाने सामना सोडून दिल्याने आर.के. रॉय अकॅडमी संघउपांत्यपूर्व फेरीसाठी पात्र ठरला.

#रा

राष्ट्रसंचार
BREAKING NEWS AND MORE




# जागर नवदुर्गेचा


जागर नवदुर्गा या दैनिक राष्ट्र संचारच्या उपक्रम यंदा देखील उत्तम रित्या राबविण्यात आला. स्त्री ही गृहिणी असो की नोकरदार, तिच्या आयुष्यातील प्रत्येक क्षण तिची मुलं, कुटुंब आणि स्वकीयांसाठी समर्पित असतो. अनेक स्त्रियांना खडतर प्रवास करून यशस्वी होण्याचा मार्ग मिळतो, तर अनेक जणी आपल्या जिद्दीच्या जोरावर यश मिळवतात. अशाच काही महिलांशी राष्ट्र संचारच्या प्रतिनिधीनीं संवाद साधून त्यांचा प्रवास जाणून घेतला..


महिलांमध्ये उपजत असलेल्या कलागुणांना बाब मिळावा अशा महिलांना एकत्र करून त्यांना व्यासपीठ मिळवून देणे व स्वतःची कला ओळख समाजापुढे यावी या विचारातून महिला आर्टिस्ट ग्रुप स्थापन झाला. महिलांनी महिलांसाठी चालवलेला अभिनव उपक्रम म्हणजेच हा ग्रुप आहे हस्तकला चित्रकला शिल्पकला अशा विविध अंगी कलेवर प्रेम करणाऱ्या आणि त्यात पारंगत असणाऱ्या महिलांचा यामध्ये समावेश आहे अशा ग्रुपमधील काही कार्यरत महिलांनी राष्ट्र संचार च्या कार्यालयाला भेट दिली


कॉफी पेंटींग


म्युरल मिडियम फायबर



अ‍ॅक्रेलिक ऑन कॅन्व्हास


पेन्सिल ऑन टिन्टेड पेपर


ऑईल पेंटींग


अ‍ॅक्रेलिक ऑन कॅन्व्हास


अ‍ॅक्रेलिक ऑन फॅब्रिक


अ‍ॅक्रेलिक कलर ऑन हँडमेड पेपर

## मनापासून काम करा



नेहा महेंद्र गुदगे यांचे शिक्षण खरेतर मानसशास्त्र (एम.ए) फ्रीलान्स आर्टिस्ट यातून झाले. मानसशास्त्राचे शिक्षण घेतले तरी त्यात करिअर न करता कलाक्षेत्रात रमले. लहानपणापासूनच रांगोळी काढणे. ग्रिटींग्स् बनवणे. गणपती डेकोरेशन यात रस होता. आणि याच छंदाचे रूपांतर आज फ्रीलान्स आर्टिस्ट मधे झाले आहे. मी माझे पेंटींग्स अ‍ॅक्रेलीक कलर्स वापरून केलेले आहेत. मी वेगवेगळ्या थीममधे काम केले आहे. टेक्स्चर वापरले आहे. अ‍ॅबस्ट्रॅक्ट पेंटीग्स्, मार्डर्न आर्ट, गणपती, नेचर, फुले, झरोका स्टाईल अशी अनेक पेंटींग्स् बनवली आहेत. माझ्या या प्रवासात वुमेन्स आर्टिस्ट ग्रुपचा खुप मोठा वाटा आहे. गेल्या दहा वर्षापासून मी या ग्रुपची सभासद आहे. या ग्रुपमुळे मला अनेक कलाकार मैत्रीणी मिळाल्या. त्यांच्या मार्गदर्शनामुळे माझी कला अजुनच बहरत आहे. अनेक एक्झीबिशन मधे मी सहभागी आले आहे. ग्रुपचा सपोर्ट हा माझ्यासाठी एक एनर्जी बुस्टर आहे.

**- नेहा महेंद्र गुदगे**

## रंगकामात मन रमते



तेजस्विनी नंदकुमार जुजार यांचे शिक्षण बी.एस्सी. इन अ‍ॅनिमेशन आणि व्ही.एफ.एक्स. इंजिनिअरींग झाले आहे. लहानपणापासूनच यांना चित्रकलेची आवड आहे. अ‍ॅनिमेशन पूर्ण होईपर्यंत तो छंद ही चालू राहिला. नंतर काही वर्षांसाठी पूर्णच प्रॅक्टिस थांबली. पण लॉकडाऊनने पुन्हा एकदा यांच्यातील कलाकाराला जागं केलं. 'झेनटँगल आर्ट' तेजस्विनी यांची स्पेशालिटी आहे. यामध्ये त्यांनी वेगवेगळ्या सिरीज बनवल्या आहेत. RRR या मुव्ही च्या कलाकारांचे तर ऐंशी हून अधिक पोर्ट्रेटस् काढले आहेत. वुमेन्स आर्टिस्ट ग्रुप जॉईन करुन दीड वर्ष च झाले आहे पण ग्रुपच्या माध्यमातून अनेक गोष्टी शिकले आहे असे त्या म्हणाल्या. गुप मधील अनेक महान कलाकारांकडून खूप काही शिकायला मिळालं. यंदाच्या प्रदर्शनात मी पहिल्यांदाच रंगांचा वापर केला. बोल्ड कलर्स वापरुन सिमेट्रिकल असा एक नवीनच आर्ट फॉर्म सादर केला. मी कॅनव्हासवर अ‍ॅक्रेलिक पेंट्सचा वापर करून डिजीटल भासणाऱ्या कलाकृती बनवल्या आहेत.

**- तेजस्विनी नंदकुमार जुजार**

## पट्टचित्रला मागणी



स्वाती दिंडोरे यांचे शिक्षण एम् कॉम पर्यंत झाले असून त्या संस्कृत विशारद आहे. तसेच एक हौशी कलाकार आहे. त्यांनी आत्तापर्यंत वेगवेगळ्या प्रकारचे म्युरल्स केले आहेत. ग्लास पेंटिंग, कलर पेन्सिल वेडिंग, ऑईल पेंटिंग्ज केलेले आहेत. तसेच सिरॅमिक वर्क पॉट, क्लॉथ पेंटिंग् केले आहे. तसेच एम् डी एफ बोर्डवर एमसीलने काम करून वॉटर फॉल बनवले आहे. आणि या सर्व गोष्टींचे क्लासेस पण घेतले आहेत. सध्या मी या एक्झिबिशन साठी पट्टचित्र या शैलीत चित्रे काढली आहेत. या ग्रुपला मी दीड वर्ष झाली जॉईन झाले.

**-स्वाती दिंडोरे**

## मुलांनी चित्रात रमावे



ह्यांनी कला शिक्षिका म्हणून अकरा वर्षे विविध शाळांमध्ये काम केले आहे. त्यांची दिल्ली येथे शैक्षणिक विषयावरची चित्र प्रदर्शित झाली आहेत. धरोहर ह्या राष्ट्रीय स्तरावरील प्रदर्शनात सहभागी झाल्या आहेत. वुमन्स आर्टिस्ट ग्रुपच्या दहा वर्ष सदस्य आहेत.

**- सई वागळे**

## चित्रकला आणि भाषा जीवनाचा अविभाज्य अंग



श्रेया आपटे या फ्रीलान्सर आर्टिस्ट असून, त्यांनी मधुबनी, वारली, चित्तार, (हसे कला) मंडला, झेंटांगल या प्रकारांमध्ये चित्रकारी केली आहे. यांचे शिक्षण खरेतर एम. ए. संस्कृत मधून झाले असले तरी चित्रकलेच्या आवडीने त्यांना पेंटिंग करणे आवडते.

कलाकारांच्या कुटुंबात जन्म झाल्यामुळे आजोबांचा शिल्पकृती तयार करण्याचा छंद होता. दुसरे आजोबा विद्वांस आणि हरिकथा कीर्तनकार, काका नाटककार आणि भाऊ मूर्तिकार असा परिवाराचा वारसा. रांगोळी, फुलांची सजावट, शास्त्रीय संगीत यांच्यामध्ये वाढलेल्या श्रेया यांनी संस्कृत मधून एम. ए. पूर्ण केले. पण कला त्यांना खुणावत होती. बारा वर्षांपूर्वी वारली चित्रकला शिकल्या, त्याचबरोबर कर्नाटकाच्या हसे कला / चित्तर कलाशैलीचा अभ्यास केला. मधुबनी शैलीच्या रंगरेषामध्ये त्या गुंतून गेल्या. यादरम्यान वुमन्स आर्टिस्ट ग्रुपच्या सभासद झाल्या आणि कलेला वाव मिळाला. अनेक कलाकार मैत्रिणींची साथ लाभली. त्यांच्या सल्ला मार्गदर्शनामुळे अनेक नवनवीन कौशल्य तंत्र शिकत त्यांच्याबरोबर अनेक प्रदर्शनामध्ये भागही घेत आहेत. भाषातज्ञ म्हणून वेगवेगळ्या संस्थांबरोबर काम करत असून आता चित्रकला आणि भाषा या दोन्हीही जीवनाचा अविभाज्य अंग बनलेले आहेत, असे त्या म्हणाल्या.

**- श्रेया आपटे**

## रेषा बोलतात तेंव्हा ...



मी एक म्युरल कलाकार आहे. एस.एन.डी.टी कॉलेज पुणे येथे बॅचलर इन व्हिज्युअल आर्ट्स व मास्टर्स इन व्हिज्युअल आर्ट्स (म्युरलं) मध्ये सहा वर्षाचे पदवी व पदव्युत्तर शिक्षण वयाच्या चाळीसाव्या वर्षी घेतले आहे. ह्या पूर्वी अमरावती विद्यापीठ येथे बॅचलर इन कॉमर्स व बॅचलर इन लॉ ह्या दोन पदवी प्राप्त केल्या आहेत. विविध प्रकारच्या मटेरिअलचा वापर करण्यात यांचा हातखंडा आहे. या आतापर्यंत १६ वेळा विविध ठिकाणी चित्र प्रदर्शनात सक्रिय सहभागी झाल्या होत्या. त्यापैकी एक चित्राला FINEXT- mini art works भोपाळ, येथून राष्ट्रीय प्रदर्शनासाठी निवड केल्या गेले होते.

मोठ्या प्रमाणात केलेले चित्रं कामं ही अकॅरॅलीक व तैलचित्रं ह्या प्रकारातील असून sculpture सुध्दा केलेली आहे. तिने साकारलेली काही चित्रं मुंबई, टेक्सास, हेलसिंकि, पुणे, सातारा येथील नागरिकांच्या भिंतीवर सजवली गेली आहेत. या ह्याशिवाय उपलब्ध वेळेत वेगवेगळ्या अनाथाश्रम व अंध विद्यालयात कार्यशाळा घेतात. दरवर्षी शाडू माती पासून गणपती मुर्ती तयार करावयाच्या कार्यशाळा विशेष करून महिलांसाठी घेतात. महिला कलाकारांच्या वुमन्स आर्टिस्ट ग्रुपची मी १० वर्षापासून सभासद आहे. अकरा फूट उंचीचे एक म्युरलं महात्मा सोसायटी पुणे चित्रित केले आहे ते खूप वैशिष्ट्यपूर्ण ठरत आहे.

**-श्रुती आठल्ये**



अनुराधा यांनी केमिस्ट्री हा विषय घेऊन बी.एस.सी. केले. नंतर कमिन्स इंजीनियरिंग कॉलेज मधून तैलचित्राचे शिक्षण घेतले. अनेक प्रदर्शनात भाग घेतले. वुमेन्स आर्टिस्ट ग्रुप तर्फे झालेल्या सहा प्रदर्शनात मी सहभागी झाले. कॅनव्हास २०१६, नेशनल लेव्हल वुमेन्स आर्ट कॉम्पटीशन, कॅमलिन कोकीयो स्पर्धेमध्ये सहभागी झाले. मणीकर्णीका ऑनलाइन स्पर्धेमध्ये सिल्व्हर मेडल मिळाले. मला वेगवेगळे विषय हाताळण्याची आवड आहे.

**- अनुराधा मधुकर पोतनीस**

## यश मिळविण्यासाठी संयम राखा



पेंटिंग ही एक कलाकार आहे. मी एस.एन.डी.टी कॉलेज पुणे येथे बॅचलर इन व्हिज्युअल आर्ट्समध्ये सहा वर्षाच्या पदवीचे शिक्षण घेतले आहे. वारली चित्रकलेवर प्रकल्प केला असून गेल्या पंधरा वर्षापासून कॉफी पेंटिंग करीत आहे. कॉफी पेंटिंग ही कला म्युरल कलेचा भाग आहे. कॉफी पावडरच्या कोटिंगपासून सिरॅमिकमध्ये हे डिझाईन केलेले आहेत. कॉफी पेंटिंगमध्ये इजिप्शियन, मधुबनी, चीनी, वारली, हायडा आधी शैलींचा वापर खूपच सुंदर वाटतो.

कॉफी आणि अ‍ॅक्रेलिकच्या मिश्रणातून साकारली जाणारी चित्रे डोळ्यांना वेगळा अनुभव देणारी आहेत. आत्तापर्यंत अशा स्वरूपाचे दोनशे चित्रे पूर्ण केलेली आहेत. विद्यार्थी सहाय्यक समितीच्या लाला लजपतराय विद्यार्थी भवन वसतिगृहामध्ये २७ बाय ११ फूट एवढ्या मोठा आकाराची वारली पेंटिंग साकारण्याचा अनुभव काही निराळाच होता. भारत सरकारच्या वस्त्रोद्योग मंत्रालयातील विकास आयुक्त कार्यालयाने माझ्या या कार्याची नोंद घेतली असून, त्या विभागाचे ओळखपत्र देखील मिळालेले आहे. यावर्षीच्या वुमन्स आर्टिस्ट ग्रुपच्या प्रदर्शनामध्ये देवी आणि देवता ची थीम घेऊन फॅब्रिकवर पेंटिंग केले होते.

**- प्रियांका जगनगडा**

# आयुष्याच्या खडतर प्रवासावर मात करणारी दुर्गा

समाजात गरजवंत जसे आहेत तसे दानशूरही आहेत. या दोघांना एकत्र करत गेल्या २० वर्षात २७५ सामाजिक संस्था समाजापर्यंत पोहोचून कोटय़वधी रुपये समाजोपयोगी कामासाठी मिळवून देणाऱ्या वीणा गोखले 'गिरीसहल'च्या माध्यमातून कलात्मक पर्यटन घडवत वेगळं करिअरही करत आहेत. भावनेपेक्षा कर्तव्य मोठे ठरवणाऱ्या वीणा गोखले यांची राष्ट्र संचार ने मुलाखत घेतली. 'देणे समाजाचे' नावाच्या आगळ्यावेगळ्या प्रदर्शनातून गेली वीस वर्ष वीणा गोखले समाजातल्या दातृत्व लाभलेल्या मंडळींना गरजू मंडळींपर्यंत पोहोचवण्याचं मोठं काम करत आहेत. वैयक्तिक जगण्यातला संघर्ष पेलत असतानाच मनात आणलं तर काय उंचीचं काम उभं करता येणं शक्य आहे याचा चालताबोलता, सकारात्मक वस्तुपाठ म्हणजे वीणा गोखले असं म्हटलं तर ती अतिशयोक्ती ठरू नये.

वीणा गोखले सांगतात, "संगीत, कला, प्रवास अशा अनेक गोष्टींवर मनापासून प्रेम करणाऱ्या हौशी दिलीपशी लग्न झाल्यानंतर पहिली पाच वर्ष माझं आयुष्य कुठल्याही सर्वसामान्य लग्न झालेल्या तरुण मुलीचं असतं तसं होतं. भरपूर प्रवास करणं, उत्तम संगीत ऐकणं, चांगल्या कार्यक्रमांना हजेरी लावणं असा सुखाचा संसार होता. सोबतीला आमच्या भटकंतीच्या आवडीला साजेसा ट्रॅव्हल बिझनेसही आम्ही सुरू केला होता. कोकण या त्या काळात तुलनेने अनवट असलेल्या जागी शहरातील पर्यटकांच्या सहली नेणं, त्या सहलींमध्ये संगीत, नृत्य, वादन क्षेत्रांतल्या कलाकारांना सहभागी करून घेण्यातून आमच्या पर्यटकांना सहलीचाच एक वेगळा अनुभव देण्याचा प्रयोग आम्ही सर्वात आधी केला.

माझ्या वयाच्या तिशीत जुळ्या मुलींचा, सावनी आणि पूर्वीचा जन्म झाला. कुटुंब परिपूर्ण झालं असं वाटत असतानाच पूर्वीला मेनिंजायटीसचं निदान झालं, पुढे ती मतिमंद असल्याचं डॉक्टरांनी सांगितलं आणि संपूर्ण जागेवर असलेलं, फीट्स येणारं हे बाळ कसं सांभाळायचं या विचारांनी मी अस्वस्थ झाले. पण त्या परिस्थितीत दिलीपचं बरोबर असणं हा मोठा आधार होता. पूर्वीसारखी मुलं ज्या समाजसेवी संस्थांमध्ये सांभाळली जातात त्या संस्थांमधून काही मार्गदर्शन झालं तर पहावं म्हणून त्या काळात आम्ही काही संस्थांना भेटी दिल्या. त्या भेटींमधून किती




### टर्निंग पॉईंट :

२००८ मध्ये प्रदर्शन अवघ्या पंधरा दिवसांवर आलेलं असताना मला सगळ्यात मोठा धक्का बसला. दिलीप एकाएकी हे जग सोडून गेला. त्याच्या शिवाय हे प्रदर्शन पुढे नेणं ही कल्पनाही शक्य नसताना केवळ हा उपक्रम बंद पडू नये यासाठी मी कुठून आणि कसा धीर गोळा केला हे आता माझं मलाही समजत नाही. त्याच्या जाण्यानंतर अनेक जवळच्या नातेवाईकांनी पाठ फिरवली. प्रदर्शनाला केलेली आर्थिक मदत अचानक काढून घेतली. संकटांची मालिका समोर उभी राहिली; पण हे संकट ही संधी मानून 'देणे समाजाचे' पार पडलं. 'गिरीसागर'च्या निमित्ताने गाठीशी असलेला टूर्सचा व्यवसाय नव्या जोमाने सुरू करायचा निर्णय मी घेतला.

उत्तम काम वेगवेगळ्या स्तरांमध्ये सुरू आहे ते पाहून आम्ही चकित झालो. हे काम लोकांसमोर यायला हवं असं मनापासून वाटलं; त्यावरचं उत्तर दिलीपने शोधलं. दिलीपने समाजासाठी काम करणाऱ्या संस्थांचं काम प्रदर्शन रूपात लोकांसमोर आणायची कल्पना मांडली आणि माझ्या स्वभावाबरहुकूम मी त्याला विरोधच केला. तेव्हा शांतपणे विचार कर या दिलीपच्या शब्दांनी मी खरंच विचारात पडले. २००५ मध्ये 'देणे समाजाचे' या नावासह पहिलं प्रदर्शन आम्ही भरवलं. आमचे निकष ठरले होते- कुठल्याही संस्थेला पैसे घेऊन स्टॉल द्यायचा नाही. संस्थेचं काम प्रत्यक्ष पाहून ते जोखून मगच तिला प्रदर्शनात प्रवेश द्यायचा आणि प्रदर्शनाच्या ठिकाणी कसलीही खरेदी विक्री करायची नाही. त्यामुळे खरोखरंच विधायक काम करणाऱ्या १५० संस्था आतापर्यंत प्रदर्शनातून लोकांसमोर आल्या. मिळालेला प्रतिसाद भारावून टाकणारा होता. अडचणींना कुरवाळत बसू नका .... चालत रहा

# प्रवास एका जिद्दीचा



**मनीषा निश्चल**
प्रसिद्ध गायिका

> सर्व सांगीतिक प्रवासात मिस्टर निश्चल लताड़ यांची कायम मोलाची साथ असते. कुटुंबाचा भक्कम पाठींबा कार्यरत राहण्यासाठी उपयोगी ठरतो.

गायिका मनीषा निश्चल आपल्या गायन कारकिर्दीला ३० वर्षे पूर्ण केली आहेत. मराठवाडा व विदर्भात ४००० कार्यक्रम करून लहान मोठ्या शोज मध्ये स्वतःला सादर करुन आज विविध भव्य शोजच्या एक अविभाज्य भाग कधी बनले कळलेही नाही. पूर्ण नाव मनिषा निश्चल लताड परंतु कार्यरत क्षेत्रात "मनिषा निश्चल" या नावाने ओळखली जाते.


मनीषा केशवराव कान्हेगांवकर हे माहेरचे नांव होय. माझे शिक्षण एम.ए. (संगीत) व संगीत विशारद (गंधर्व महाविद्यालय) झाले असून दहावी पर्यंतचे शिक्षण शेवाळा, ता.कळमनुरी, जि.हिंगोली येथे झाले. व पुढे महाविद्यालयीन शिक्षणासाठी औरंगाबाद येथे आल्यानंतर संगीत या विषयात भविष्य घडवायचे असे ठरवले.

३० वर्षांत संपुर्ण देशभर कार्यक्रम करताना महाराष्ट्र, नवी दिल्ली, देहरादुन, हैद्राबाद, इंदौर, सुरत, बड़ौदा, अहमदाबाद, आनंद (गुजरात), बेंगलोर, मैसुर, जयपुर, जोधपुर, चेन्नई, जबलपुर, रायपुर, बैतुल, बेळगांव, गोवा या ठिकाणी सांगितीक प्रस्तुती करण्याचे भाग्य प्राप्त झाले.

या प्रवासात पद्मश्री हृदयनाथ मंगेशकर, लक्ष्मीकांत-प्यारेलाल या संगीतकार जोडीतील प्यारेलाल शर्मा, कल्याणजी आनंदजी या संगीतकार जोडीतील आनंदजी भाई, सुरेशजी वाडकर, बाबासाहेब पुरंदरे, मंगेश तेंडुलकर, उषाताई मंगेशकर, उषा खन्ना, लीना चंदावरकर, आशा काळे, सुमनताई कल्याणपुर, जगदीश खेबुडकर, रमेश देव, सीमा देव, विक्रम गोखले, रविंद्र महाजनी, अजित कडकडे, अनुप जलोटा, यशवंत देव, अनिल मोहिले, अमित कुमारजी, साधना सरगम, उत्तरा केळकर, अशोक पत्की, आनंद माडगुळकर, कुणाल गांजावाला, श्रेया घोश्याल, सचिन पिळगांवकर, आशा पारेख, स्वप्निल जोशी यांच्या बरोबर सादरीकरण करण्याचे भाग्य लाभले.

"मनिषा निश्चल्स महक कॉन्सर्टस", या आपल्या स्वतःच्या व्यासपीठावरुन लता मंगेशकर यांच्या ९० व्या वाढदिवसानिमित्त देशात एकाच वेळी एकच सॉंग लीस्ट असलेल्या "स्वरस्वती" या शो चे आयोजन करुन गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड केला आहे.

# कायम उत्साही रहा



**पूर्वा बेलवलकर - इंगळे**
लाईफ कोच

बापरे, माझ्या मोबाईलची बॅटरी आता फक्त १०% राहिली आहे. मला ऑफिसला जायला निघायचे आहे. जर आता लाइट आले नाहीत, तर माझ काही खर नाही. माझा सगळा दिवस मोबाईल चार्ज करण्यात जाईल आणि नाही करता आला तर काही खर नाही. आपला मोबाईल सकाळी निघताना चार्ज नसेल तर आपली पण काहीशी अशीच अवस्था होते बरोबर? हा मोबाईल जी व्यक्ति ऑपरेट करते त्या व्यक्तीच्या म्हणजे आपल्या स्वतः च्या चार्जिंगच काय ? स्वतः च चार्जिंग?? हो हो बरोबर वाचलं. मी सकाळी उठल्या उठल्या माझ चार्जिंग करते का? याचे उत्तर- नाही येते ... कारण ते कस करायच? कशाला करायच? संपलच माझ चार्जिंग तर थोडी ना मी स्विच ऑफ होईल? किंवा व्यायाम करते ना मी.

मला सांगा खालील पैकी किती समस्या तुम्हाला जाणवतात अणि त्या जाणवत असतील तर नक्की आपल्याला चार्जिंगची गरज आहे.

१) ताण, तणाव
२) काळजी
३) नकारात्मक विचार
४) ध्येय अनिश्चितता
५) सतत विचार करणे
६) भिती
७) आत्मविश्वास नसणे
८) निराशा

या आणि अशा अनेक नकारात्मक विचारांच्या विळख्यात आजकाल बहुतेक लोक अडकले गेले आहेत. त्या साठी प्रत्येकाची कारणे ही निरनिराळी आहेत. तर या सगळ्या गोष्टींसाठी जर मी सकाळी उठल्या उठल्या स्वतः च चार्जिंग केले तर ही नकारात्मकता माझ्या मधून जाऊन मी आनंदी, समाधानी, शांततापूर्ण, ध्येयाच्या दिशेने, आत्मविश्वासाने परिपूर्ण आयुष्य जगू शकेन.

### पण हे चार्जिंग कसे करायचे?

गेले मागचे काही वर्ष मी अणि माझी कम्युनिटी हे दैनंदिन सकाळी उठून स्वतःच चार्जिंग, सेर्व्हस या एका मॉर्निंग फ्रेमवर्क ने करत आहोत. या मॉर्निंग फ्रेमवर्क चे नाव सेर्व्हस (SAVERS) आहे. नावा प्रमाणेच माझ्या आयुष्यात सेर्व्हस हे जणू आयुष्य सेव्ह करण्यासाठीच आले. छोट्या छोट्या सवयी पासून ते मोठे मोठे निर्णय घेण. सकारात्मक राहून आव्हाने घेणे आनंदी राहणे हा आयुष्याचा अविभाज्य घटक आहे.

हे मॉर्निंग फ्रेमवर्क मी स्वतः रोज पहाटे ब्रह्म मुहूर्तावर उठून करते. या वेळेमधे असणारी आध्यात्मिक ऊर्जा, शांतता, शुद्ध हवा आपल्याला आपल्या ध्येयापर्यंत कमी वेळा मध्ये घेऊन जाते. सकाळी ५ वा. मला सिंहगड रोड ते स्टेशनला जायला ३० मी.लागतील तर मी संध्याकाळी ५ वा. निघाले तर मला १ ते सव्वा तास नक्की लागेल. पहाटे उठून स्वतःवर काम करणे, आपल्या स्वप्नांसाठी काम करणे हे देखील असेच आहे.

### तर नक्की करायच काय आहे?

**अत्यंत सोपे असे SAVERS technique**

**S- सायलन्स -मेडिटेशन** (Silence/ meditation)

कमी वेळे पासून चालू करून सोप्या अश्या पद्धतीने Meditation चालू केल्याने किंवा काही वेळ मौन अवस्थेत बसल्याने मला दिवसभरात मन शांत ठेवण्यासाठी खूप मदत होते

**A_ अफर्मेशन्स** (Affirmations)

आपण स्वतः साठी आपली स्वप्ने खरी झाली आहेत असे समजून सकारात्मक वर्तमान काळात goals लिहणे ज्यानी आपला मेंदू हा rewire होण्या साठी मदत होते.

अणि ती रोज म्हटल्याने लवकरात लवकर खरी देखील होतात.

**V- व्हिज्युअलायझेशन** ( visualization)

आपली स्वप्नं आपल्या डोळ्या पुढे एखाद्या चित्रपटा प्रमाणे पाहणे, व्हिजन बोर्ड बनवणे. असे रोज केल्याने आपण ज्या पद्धतीने आपले स्वप्नं रेखाटले आहे ते तसेच पूर्ण होते

**E - एक्ससरसाईज** (Exercises)-

रोज शारीरिक व्यायाम केल्याने शरीरा सोबत मन देखील उत्साही राहते.

स्क्रिबिंग जर्नालीन्ग Scribing/ Journaling- रोज उठल्यावर मी मला आयुष्यात मिळालेल्या १० गोष्टी ज्या बद्दल मी परमेश्वराची आभारी आहे हे लिहून काढल्याने नकारात्मक विचार जाऊन मी चांगल्या विचारांवर लक्ष केंद्रित करते अणि पर्यायाने त्या चांगल्या गोष्टींची माझ्या आयुष्यात वाढ होते.